# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २१ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०


# स्टँडअप कॉमेडीच करावी, रोजगार तरी मिळेल

## फडणवीसांचा राहुल गांधींना टोला



**नागपूर/प्रतिनिधी : :** मध्यप्रदेशातील इंदूर येथे आयोजित 'छात्रों की गूंज' या विशेष कार्यक्रमातून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांनी शनिवारी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राहुल गांधी मंचावर उपस्थित असतानाच स्टँडअप कॉमेडियन पुलकित मणीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बोलण्याच्या आणि वागण्याच्या पद्धतीची नक्कल करीत स्टँड़अप कॉमेडीचा प्रकार केला. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी नागपुरात राहूल गांधी यांना टोला लगावला.

नागपूर, बुटीबोरी येथे उद्योजकांसोबत संवाद पार पडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमा सोबत संवाद साधला. यावेळी माध्यमांनी राहूल गांधी यांच्या शनिवारी झालेल्या कार्यक्रमाकडे लक्ष वेधले असता मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मला वाटते की आता राहुल गांधींकडे हेच काम शिल्लक आहे. त्यांनी स्टँड अप कॉमेडीचे काम हाती घेतले आणि मिमिक्री केली तर त्यांना चांगला रोजगार मिळू शकेल. पक्षाला त्यांनी बेरोजगार केले आहेच, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

**समृद्धी महामार्गाला समांतर रेल्वे-** यावेळी समृद्धी महामार्गाला समांतर रेल्वे सुरू होण्याचे स्पष्ट संकेत दिले. ते म्हणाले, समृद्धी महामार्गाला समांतर रेल्वेच्या विस्तृत आराखड्यावर काम सुरू आहे. महाराष्ट्र रेल कंपनीला आराखड्याचे काम देण्यात आले आहे. समृद्धी महामार्ग तयार करण्यात आला, त्याचवेळी रेल्वे मार्गासाठी जागा सोडली आहे. आता मालवाहू रेल्वेचीही गरज आहे. 'जेएनपीटी'वरून नाशिक, जालना ते वर्धा येथील ड्राय पोर्टपर्यंत व येथून गडचिरोलीपर्यंत समर्पित मार्ग तयार केला जाईल. याचा संपूर्ण महाराष्ट्राला लाभ होईल, राज्यात उद्योग वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जळगावात कृषिमंत्र्यांचे भरीत वांग्यांनी स्वागतष्ठ शेतकऱ्यांची जिल्हा बँकेविषयी 'ही' तक्रार

पेट्रोलपंप मालकांनीही यूपीआयवरील शुल्क वाढीला विरोध केल्याकडे माध्यमांच्या प्रतिनिधींनी लक्ष वेधले असता मुख्यमंत्री म्हणाले, विरोधी भूमिका घेणे अयोग्य आहे. यूपीआयमुळे त्यांचा व्यवसाय वाढला आहे. सामान्य नागरिकही त्याचा वापर करीत आहे. यूपीआयवरील शुल्क अतिशय नाममात्र आहे. संसदेच्या समितीने या शुल्काची शिफारस केले असून त्यात ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांच्यासह ☞(पान २ वर)

# पंजाबमध्ये भाजपाचा महाराष्ट्र अन् बिहार पॅटर्न

## युतीच्या चर्चेत अकाली दलासमोर ठेवली अट



**अमृतसर/वृत्तसंस्था-** पंजाबमध्येभाजपा आणि अकाली दल यांच्या आघाडीशी चर्चा सुरू आहे. त्यातच भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी समसमान जागा वाटपाची मागणी केली आहे. पंजाबमध्ये ११७ विधानसभेच्या जागा आहेत. त्यातील निम्म्या जागांवर भाजपाने दावा केला आहे. पंजाबमध्ये भाजपासाठी पूर्वीचा २२ जागांचा फॉर्म्युला चालणार नाही असं स्थानिक नेत्यांनी म्हटलं आहे. आता भाजपा लहान भाऊ म्हणून भूमिका निभावणार नाही असं नेत्यांकडून स्पष्ट करण्यात आले. याआधी जेव्हा भाजपा अकाली दलासोबत आघाडी करत होते तेव्हा शहरी भागातील २२ ते २३ जागांवर भाजपा निवडणूक लढवत होती. आता भाजपाने गेल्या काही वर्षात ग्राऊंडवर ताकद वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे भाजपाचे सूर बदलले आहेत.

महाराष्ट्र आणि बिहारच्या धर्तीवर भाजपाने पंजाबमध्येही भूमिका बदलण्याचं ठरवले आहे. गेली कित्येक दशके महाराष्ट्रात आणि बिहारमध्ये भाजपा लहान भावाच्या भूमिकेत होती. परंतु मोदी आणि अमित शाह यांनी पक्षाची सूत्रे हाती घेतली आणि भाजपाचा स्वभावही बदलला. त्यामुळे आज महाराष्ट्रात भाजपाचा मुख्यमंत्री आणि सर्वाधिक आमदार आहेत. हीच स्थिती बिहारमध्येही आहे. पहिल्यांदाच ☞(पान २ वर)

# 'आम्ही शेतकऱ्यांचीच मुले, त्यांचे दुःख व नुकसान समजू शकतो!'- कृषीमंत्री भरणे



**बुलढाणा /प्रतिनिधी :** आम्ही शेतक-यांचीच मुले आहोत.त्यामुळे अवर्षणाने त्यांना झालेले दुःख व नुकसान आम्ही समजू शकतो.संकटाच्या काळात बळीराजाने खचून जाऊ नये,शासन खंबीरपणे त्यांच्या पाठिशी उभे आहे. अशा शब्दात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी अवर्षणामुळे खचलेल्या शेतक-यांना दिलासा दिला.

आज रविवारी खामगांव तालुक्यातील पिंप्राळा येथे शेताच्या बांधावर पोहोचून शेतक-यांच्या भेटी घेतल्या. एल निनोच्या प्रभावाने पावसात पडलेल्या खंडामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. अशावेळी नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी तातडीने व अचूक पंचनामे पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल.अशी ग्वाही कृषिमंत्री भरणे यांनी शेतक-यांना दिली.

पावसातील खंड, अनियमित पर्जन्यमान आणि त्याचा पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम यामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत कृषिमंत्री भरणे यांनी पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

नुकसानग्रस्त भागातील प्रत्येक पात्र शेतकऱ्याचा पंचनामा अचूकपणे होईल, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देशही मंत्री भरणे यांनी दिले. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आणि थेट मदत पोहोचविण्यासाठी शासन खंबीरपणे कार्यरत आहे,असेही मंत्री भरणे यांनी सांगितले.☞(पान २ वर)

# रस्त्याच्या कडेला थांबलेली कार ट्रकने उडवली

## १३ वर्षीय चिमुरडीसह दोघांचा अंत

### विरली बुद्रुक येथील बेद्रे कुटुंबावर काळाचा घाला; चार जण जखमी; दोघांवर नागपुरात उपचार



**भंडारा/वृत्तसंस्था-** लाखांदूर तालुक्यातील विरली बुद्रुक येथील एका कुटुंबावर काळाने घाला घातला असून, नागभीड तालुक्यातील कोरधा गावाजवळ झालेल्या भीषण अपघातात १३ वर्षीय बालिकेसह एकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनाला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, विरली बुद्रुक येथील हिमेश बेद्रे हे कुटुंबीयांसह बल्लारशा येथे बहिणीकडे कामानिमित्त गेले होते. काम आटोपून ते रात्रीच्या सुमारास आपल्या वाहनाने परत येत होते. प्रवासादरम्यान एका हॉटेलमध्ये जेवण केल्यानंतर काही अंतरावर कोरधा गावाजवळ चेहऱ्यावर पाणी मारण्यासाठी त्यांनी रस्त्याच्या कडेला वाहन थांबविले होते. त्याच वेळी मागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, वाहनातील १३ वर्षीय बालिका श्रावणी तसेच मेहुणे नितीन भरे यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात हिमेश बेद्रे, त्यांची पत्नी मेथला बेद्रे, मुलगा शौर्य बेद्रे तसेच नितीन भरे यांच्या पत्नी जखमी झाल्या आहेत. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील☞(पान २ वर)

# 'विरोधकांना पुढील अडीच-तीन वर्षे काम नाही'

## दुष्काळाच्या मुद्द्यावर मंत्री चंद्रकांत पाटलांचा विरोधकांना टोला



**सांगली /वृत्तसंस्था-** 'राज्यातील विरोधकांना पुढील अडीच ते तीन वर्षे कोणतेही काम उरलेले नाही, त्यामुळे त्यांना केवळ बोलत राहावे लागणार आहे,' अशा शब्दांत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दुष्काळाच्या मुद्द्यावरून सरकारवर टीका करणाऱ्या विरोधकांवर टीका केली. सांगली दौऱ्यावर असताना ते पत्रकारांशी बोलत होते.मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, '५ ऑक्टोबर हा दुष्काळ जाहीर करण्याचा कोणताही मुहूर्त नाही. दुष्काळ जाहीर करण्यापूर्वी काही कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. सध्या शासन स्तरावर त्या सर्व प्रक्रियांचे काम वेगाने सुरू आहे.' विरोधकांना आता तीन वर्षे काहीतरी चालू ठेवावे लागणार आहे. निंदकाचे घर असावे शेजारी, असा टोलाही पाटील यांनी लगावला.'दुष्काळाबाबतचा कोणताही निर्णय हा शासनाच्या अधिकृत निकषांनुसारच घेतला जाईल. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, पावसाच्या खंडामुळे शेतकऱ्यांचे जे काही नुकसान झाले आहे, त्याची योग्य ती ☞(पान २ वर)

# नीला विखे यांचा खासदार म्हणून स्वीडन संसदेत प्रवेश

## विखे कुटुंबीयांची ख्याती आता आंतरराष्ट्रीय पातळीवर




**राहाता /वृत्तसंस्था-:** शिक्षण, सहकार, आणि आरोग्य क्षेत्राशी घट्ट नाते असलेल्या विखे पाटील कुटुंबाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. अहिल्यानगर ते स्वीडनची संसद असा प्रवास करणाऱ्या महाराष्ट्राच्या कन्या निला विखे पाटील यांची स्वीडनच्या संसदेत खासदार म्हणून निवड झाली आहे. ग्रीन पार्टीच्या नेत्या असलेल्या निला यांनी स्टॉकहोम सिटी मतदारसंघातून विजय मिळवला आहे.

निला या शिक्षण तज्ज्ञ डॉ. अशोक विखे पाटील यांच्या कन्या आणि आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याची उभारणी करणारे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या त्या पणती, माजी केंद्रीय मंत्री दिवंगत बाळासाहेब विखे पाटील यांची नात व जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे यांची पुतणी आहेत. दि. १३ सप्टेंबरच्या निवडणुकीत स्टॉकहोम शहर मतदारसंघातून ४१ वर्षीय नीला विखे पाटील यांनी विजय मिळवला. त्यांनी स्टीफन लोफवेन☞(पान २ वर)

# आमदार असल्याचा बनाव पडला महागात

## काळया काचा,बनावट स्टिकर लावणारा तोतया आमदार अटकेत



**शिरवळ /वृत्तसंस्था-:,** स्वतःच्या कारवर 'महाराष्ट्र विधानसभा सदस्य' (आमदार) असल्याचा बनावट लोगो चिकटवून, काळ्या काचा लावून टोलमाफीसह व्हीआयपी सवलती लाटणाऱ्या एका तोतयाचा रुबाब शिरवळ पोलिसांनी उतरवला आहे. शिरवळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश इंगळे यांच्या चाणाक्ष नजरेमुळे ही कारवाई करण्यात आली असून संबंधित कार जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी विशाल राजेंद्र यादव (वय ३५, रा. केदारेश्वर नंदनवन अपार्टमेंट, शिरवळ, ता. खंडाळा) याच्याविरुद्ध शिरवळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ☞(पान २ वर)

# ओबीसींवर अन्याय न होता मराठा समाजाचा प्रश्न सोडवू : उदय सामंत



**रत्नागिरी/वृत्तसंस्था- :** मराठा समाजाच्या आरक्षणासह अन्य प्रश्नांवर ओबीसी समाजावर अन्याय न होता तोडगा काढण्याची सरकारची भूमिका आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या काळात सरकारसाठी समन्वयाची भूमिका घेतली आणि त्याला यश आले. आता ९० दिवसांनंतर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. रत्नागिरी येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सुरू असलेल्या आंदोलनाचा आपण साक्षीदार असल्याचे सांगत सामंत म्हणाले, सरकारने सर्व नेत्यांशी संपर्क साधून समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. जरांगे यांच्याशीही आपण समन्वयाची भूमिका बजावली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वातावरण बिघडू नये, यासाठी त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. सरकारच्या विनंतीला त्यांनी प्रतिसाद दिला. त्यामुळे या प्रक्रियेत सरकारची भूमिका यशस्वी झाली. मराठा समाजाच्या प्रश्नावर ☞(पान २ वर)






# तुमसर उपजिल्हा रुग्णालयात

## गर्भवतीच्या जेवणात अळया; रुग्णांच्या आरोग्याशी खेळ!

### पालघरच्या कंत्राटदाराचा भोंगळ कारभार उघड; जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संदीप गजभिये यांच्याकडे तक्रार



**भंडारा :** येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शासकीय उपजिल्हा रुग्णालयातील भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. रविवारी गर्भवती महिलांच्या वार्डात पुरवण्यात आलेल्या अन्नामध्ये (वरण आणि भात) अळ्या निघाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रुग्णांच्या जिवाशी खेळणाऱ्या या गंभीर प्रकारामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महिलांना रविवारी नेहमीप्रमाणे आहार पुरवण्यात आला. मात्र, जेवण करत असताना वरण आणि भातात अळ्या असल्याचे रुग्णांच्या नातेवाईकांच्या निदर्शनास आले. नातेवाईकांनी तातडीने हा दूषित आहार रुग्णालयाच्या मुख्य कार्यालयात नेऊन उपस्थित डॉक्टरांना दाखवला. डॉक्टर आयुषी कृंजेकर यांनी तो आहार आपल्या ताब्यात घेतला असला, तरी रुग्णालयातील निकृष्ट☞(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दूध आणण्यासाठी निघालेल्या आर्यनला ट्रकची धडक

## महेंद्र कॉलनीतील घटना; पायाला गंभीर दुखापत

**अमरावती/प्रतिनिधीः-** दूध आणण्यासाठी सायकलवरून घराबाहेर पडलेल्या १३ वर्षीय बालकाला भरधाव ट्रकने धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला. हा अपघात रविवारी २० सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास महेंद्र कॉलनी परिसरात घडला. आर्यन अजय पाथरे (वय १३, रा. महेंद्र कॉलनी) असे जखमी बालकाचे नाव आहे. या अपघातात त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून, नागरिकांनी त्याला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.मिळालेल्या माहितीनुसार, आर्यन हा सायकलवरून दूध आणण्यासाठी जात होता. महेंद्र कॉलनी परिसरातून तो सायकलने जात असताना एमएच ०२ एफजी ५१६४ क्रमांकाच्या ट्रकची त्याच्या सायकलला धडक बसली. धडकेची तीव्रता एवढी होती की, आर्यन सायकलसह रस्त्यावर कोसळला. त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी आर्यनला तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. आर्यन हा ग्रामीण पोलीस दलातील एका कर्मचाऱ्याचा मुलगा असल्याची माहिती आहे. दरम्यान,



अपघाताची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अपघातग्रस्त ट्रक ताब्यात घेतला. या प्रकरणी ट्रकचालकाविरुद्ध अपघाताच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

गाडगेनगरचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रकची सायकलस्वार बालकाला धडक बसल्याने त्याच्या पायाला दुखापत झाली. या प्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, ट्रक पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

# उद्योग व व्यापार क्षेत्र देशाच्या आर्थिक समृद्धीचे महत्त्वाचे आधारस्तंभ : विनोद कलंत्री

## -नांदगाव पेठ एमआयडीसी असोसिएशनतर्फे विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ एमआयडीसी असोसिएशनच्या एस.एच. इंडस्ट्रीज येथील कार्यालयात भगवान विश्वकर्मा जयंती श्रद्धा व उत्साहात साजरी करण्यात आली. याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिनही साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लघु उद्योग भारती, अमरावती विभागाचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक अमित आरोकार होते. CAIT विदर्भ प्रांताचे अध्यक्ष विनोद कलंत्री प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लघु उद्योग भारतीचे विभागीय सचिव महेंद्र तलरेजा तसेच CAIT महिला विंगच्या अध्यक्षा व उद्योजिका डॉ. कुंजन वेद विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन व आरतीने करण्यात आली. त्यानंतर प्रसादाचे वितरण करण्यात आले. नांदगाव पेठ एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष तथा लघु उद्योग भारतीचे अमरावती जिल्हा महामंत्री अफाक सुबेदार यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. तसेच असोसिएशनतर्फे उद्योग व उद्योजकांच्या हितासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना CAIT विदर्भ प्रांताचे अध्यक्ष विनोद कलंत्री म्हणाले की, भगवान विश्वकर्मा हे केवळ देवशिल्पी नसून निर्माण, कौशल्य, तंत्रज्ञान आणि सृजनशीलतेचे प्रतीक आहेत. विश्वकर्मा जयंती हा उद्योग, श्रम, कौशल्य आणि कष्टाला सन्मान देण्याचा दिवस आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७ सप्टेंबर २०२३ रोजी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सुरू करून पारंपरिक कारागीर व शिल्पकारांच्या कौशल्याला प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. ते पुढे म्हणाले की, 'व्होकल फॉर लोकल' आणि 'लोकल टू ग्लोबल' ही संकल्पना आजच्या उद्योगविश्वासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. एमएसएमई, लघुउद्योग, उद्योजक आणि कामगार हे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देणारे महत्त्वाचे घटक आहेत. स्थानिक उत्पादन, स्थानिक उद्योग आणि स्थानिक रोजगाराला प्रोत्साहन दिल्यास भारताची अर्थव्यवस्था अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर होऊ शकते.

लघु उद्योग भारतीचे विभागीय सचिव महेंद्र तलरेजा यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, १९९४ मध्ये स्थापन झालेली लघु उद्योग भारती आज देशभरातील लघुउद्योग व उद्योजकांच्या हितासाठी कार्यरत आहे. संघटनेचे सुमारे ६५ हजार सदस्य असून महिला उद्योजिकांकडून ६० शाखांचे संचालन केले जात आहे. संघटनेच्या विविध उपक्रमांची तसेच उद्योजकांसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची त्यांनी माहिती दिली. डॉ.कुंजन वेद यांनी भगवान विश्वकर्मा यांच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना सांगितले की, भारतीय परंपरेत भगवान विश्वकर्मा यांना देवशिल्पी तसेच निर्माणकौशल्याचे प्रतीक मानले जाते. त्या म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून महिलांना व्यवसाय, आर्थिक समावेशन, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अमित आरोकार यांनी सांगितले की, उद्योगविश्व झपाट्याने बदलत असून उद्योजकांनी काळानुरूप नवीन तंत्रज्ञान आणि कार्यपद्धती स्वीकारणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित त्रिवेदी यांनी केले, तर आभार प्रदर्शन असोसिएशनचे सहसचिव निलेश काकिर्डे यांनी केले. यावेळी नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पुनीत कुलट, जगदीश वाधवानी, तुषार अग्रवाल, अशोक मेठानी, शैलेश अग्रवाल, साहेब हुसैन सुबेदार, गोविंद अग्रवाल, सुशील कासट, पंकज चिंचवलकर, संदीप नाहाटा, वेदांत अग्रवाल, अख्तर बेग, अजहर हबीब, वसीम सिद्दीकी, पूजा मगोरिया, अफसर बेग, सोहेल खान, समीर खान, नेहाल खान, राजीक खान यांच्यासह एमआयडीसी असोसिएशन, लघु उद्योग भारती आणि CAIT चे पदाधिकारी, उद्योजक तसेच उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# युवकावर चौघांचा चाकूहल्ला

## -लोहार लाईनमध्ये रात्रीचा थरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** जुना वाद मिटविण्यासाठी समोरासमोर बोलणी करण्यासाठी गेलेल्या २३ वर्षीय युवकावर चौघांनी चाकूने हल्ला केल्याचा आरोप आहे. लोहार लाईन, विलासनगर परिसरात शनिवारी रात्री हा प्रकार घडला. हल्ल्यात नहुष किशोर दिघडे (वय २३, रा. शिवाजी चौक, राहटगाव) जखमी झाला असून, त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गाडगेनगर पोलिसांनी तिघांची नावे निष्पन्न केली असून दोन अनोळखींसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांत नोंदविलेल्या जबाबानुसार, नहुष अभियांत्रिकीच्या चौथ्या वर्षात शिकत आहे. बारावीत असताना मित्राच्या माध्यमातून त्याची गजेंद्र आणि अजय यांच्याशी ओळख झाली होती. काही दिवसांपूर्वी नहुषचा चुलत भाऊ यांच्या चारचाकीचे गजेंद्र आणि अजय यांनी नुकसान केल्याचा आरोप आहे. त्यानंतर झालेल्या वादात नहुषने संगम यांना माहिती दिल्याचा संशय आरोपींना होता. या कारणातून त्याच्याविषयी वैर निर्माण झाल्याचे जबाबात नमूद आहे. दरम्यान, गजेंद्र आपल्याला इजा करणार असल्याची माहिती मिळाल्याने नहुष घाबरला होता. त्यामुळे वाद मिटविण्याच्या उद्देशाने त्याने मित्र हर्ष याला लोटस इन येथे बोलावले. हर्षने गजेंद्र आणि अजय यांनाही तेथे बोलावले. त्यांच्यासोबत आणखी दोघे आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. नहुषने जुन्या प्रकाराबद्दल माफी मागून वाद संपविण्याची विनंती केल्यानंतर सर्वजण पंचवटी चौकातील नाईस डे बारमध्ये गेले. रात्री सुमारे ११ वाजता ते लोहार लाईन परिसरात पोहोचले. तेथे वाहनातून उतरल्यानंतर चौघांनी शिवीगाळ करत चाकूने हल्ला केल्याचा आरोप आहे. गजेंद्रने पाठीवर व मांडीवर, तर अजयने हातावर व पाठीवर वार केल्याचे जबाबात नमूद आहे. हर्षने मध्यस्थीचा प्रयत्न केला; मात्र परिस्थिती बिघडल्याने तो मदतीसाठी पोलिसांकडे धावला. नागरिक जमा झाल्यानंतर आरोपी पसार झाल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी बीएनएस कलम १०९(१), ३(५) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

# १ व १० वरील उर्वरित

### स्टँडअप कॉमेडीच करावी

काँग्रेसचे चार मोठ्या नेत्यांचा समावेश आहे. हे शुल्क सर्वांवर नाही. परंतु त्याविरोधात वातावरण निर्माण केले जात आहे. आज देशात व्यापार वाढला, भ्रष्टाचार कमी झाला, या मागे यूपीआय आणि डिजिटल व्यवहार आहे, हे समजून घेतले पाहिजे. नाममात्र शुल्क देण्याबाबत व्यापारी किंवा पेट्रोल पंप वाल्यांनी विरोध करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

झोपडपट्टीमुक्त मुंबईसाठी प्रयत्न

मुंबईसाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. कोस्टर रोड, टनेल्स, उड्डाणपूलाचे जाळे उभारण्यात येत आहे. मुंबईची जीवनदायिनी असलेल्या उपनगरीय रेल्वेलाही पुढील २-३ वर्षात मेट्रोसारखे कोचेस लावण्यात येईल. त्यामुळे मुंबईचा संपूर्ण कायापलट होत आहे. मुंबईला झोपडपट्टीमुक्त शहर करण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे. या प्रक्रियेला दहा-बारा वर्ष त्याला लागतील. परंतु त्याची सुरुवात आम्ही केली असल्याचे ते म्हणाले.

### पंजाबमध्ये भाजपाचा

बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री बनला आहे आणि तो लहान भावाच्या भूमिकेत नसून सर्वात मोठा पक्ष आहे. आता पंजाबमध्येही हे चित्र भाजपाला लागू करायचं आहे.

दरम्यान, भाजपाला मतांचे हस्तांतरण करण्यासाठी अकाली दलासोबत भागीदारी करायची आहे, पण त्यांना आपला वाटाही कमी करायचा नाही. २०२२ च्या निवडणुका अकाली दलासाठी खूप निराशाजनक ठरल्या होत्या. अकाली दलाने केवळ तीन जागा जिंकल्या तर भाजपाने दोन जागा जिंकल्या. यामुळे दोन्ही पक्षांमधील जागांचे अंतर कमी झाले. लोकसभा निवडणुकीतही अकाली दलाला लक्षणीय प्रभाव पाडण्यात अपयश आले. त्यामुळे भाजपाला अकाली दलाच्या या कमकुवतपणाचा पुरेपूर फायदा घेऊन बिहार आणि महाराष्ट्राप्रमाणे पंजाबमध्येही विस्तार करण्याचा प्रयत्न करायचा आहे.

### 'आम्ही शेतकऱ्यांचीच मुले,

पाणी, चारा आणि वीजपुरवठ्याला प्राधान्य

पीक नुकसानीसोबतच पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा आणि वीजपुरवठा या मूलभूत बाबींवर प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करावी, अशा सूचना भरणे यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या. या पाहणीचा सविस्तर अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात येईल. त्यानंतर शेतकऱ्यांना आवश्यक मदत व दिलासा देण्यासाठी शासनस्तरावर योग्य निर्णय घेण्यात येईल,असे कृषीमंत्र्यांनी यावेळी दिले

या पाहणी दौऱ्यात त्याच्यासमवेत कामगार मंत्री आकाश फुंडकर, कृषी आयुक्त सुरज मांडरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डांबरे , उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी आदी उपस्थित होते.

### रस्त्याच्या कडेला थांबलेली

नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना तातडीने उपचारासाठी ब्रह्मपुरी येथील रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी गंभीर असलेल्या मेथला बेद्रे यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले असून, हिमेश बेद्रे आणि त्यांचा मुलगा शौर्य यांच्यावर ब्रह्मपुरी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, या भीषण अपघाताची बातमी विरली बुद्रुक गावात पोहोचताच संपूर्ण गावावर शोककळा पसरली. या अपघाताचा पुढील तपास संबंधित पोलीस करीत आहेत.

### 'विरोधकांना पुढील अडीच-

भरपाई नियमांनुसार निश्चितपणे दिली जाईल, अशी ग्वाहीदेखील मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिली.

### नीला विखे यांचा खासदार

यांच्या कार्यकाळात पंतप्रधान कार्यालयात सल्लागार म्हणून काम करतांना अर्थ, कर व गृहनिर्माण विषय हाताळले आहे. स्टॉकहोम सिटी कौन्सिलवर त्यांची निवड झाली. त्यांनी शहरातील ग्रीन पार्टीच्या निवडणूक समितीत काम केले. निला यांनी गोथेनबर्ग स्कूल ऑफ बिझनेसमधून अर्थशास्त्र आणि कायद्याचा अभ्यास केला असून, माद्रिद येथील कॉम्प्लुटेन्स विद्यापीठातही शिक्षण घेतले आहे.

### आमदार असल्याचा बनाव

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खंडाळा तालुक्यातील केसुर्डी गावच्या हद्दीत सर्व्हिस रोडवर एक संशयित कार (क्रमांक: श्प-०९-३७-६६८८) 'महाराष्ट्र विधानसभा सदस्य' असा लोगो लावून फिरत असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश इंगळे आणि गस्तीवरील पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तात्काळ संबंधित कार थांबवून चालक विशाल यादव याच्याकडे चौकशी केली. चौकशीदरम्यान त्याने मद्यप्राशन केल्याचे निष्पन्न झाले.

कारची तपासणी केली असता, तिच्या पुढील व मागील काचेवर वर्तुळाकार हिरव्या रंगाचा लोगो, त्यावर पांढऱ्या अक्षरांमध्ये 'महाराष्ट्र विधानसभा सदस्य' आणि हिरव्या रंगातील अशोक स्तंभावर पांढऱ्या रंगात 'आमदार' असा मजकूर असलेला स्टिकर चिकटवलेला आढळला. स्वतः अथवा कुटुंबातील कोणतीही व्यक्ती आमदार नसतानाही टोलमाफी व व्हीआयपी सवलती मिळवण्यासाठी त्याने हा बनावट लोगो लावल्याची कबुली दिली.

### ओबीसींवर अन्याय न

सरकार कटिबद्ध आहे. मात्र त्यासाठी ओबीसी समाजावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. ओबीसी समाजामध्ये काही गैरसमज असतील तर त्यावर मार्ग काढला जाईल. ओबीसी प्रश्नांवर सविस्तर बैठक घेण्यात यावी, अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. तसेच गैरसमज दूर करण्यासाठी एकनाथ शिंदे यांनीही बैठक घ्यावी, अशी विनंती केली आहे. ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मार्ग काढला जाईल, असेही ते म्हणाले. राज्य सरकार पाच सॅटेलाईट तयार करण्याच्या दिशेने काम करीत असून त्यासाठी सुमारे

१८ महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे सामंत यांनी सांगितले. या सॅटेलाईटचा उपयोग कृषी, उद्योग, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, शहरी नियोजन व आरोग्य नियोजनासारख्या क्षेत्रांना होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बळीराजाला वाऱ्यावर सोडणार नाही

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार बळीराजाला वाऱ्यावर सोडणार नाही. नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर योग्य ती मदत महाराष्ट्र सरकार करेल. अधिवेशनाबाबत मुख्यमंत्री निर्णय घेतील, असे सामंत यांनी सांगितले.

न्यायालयीन प्रकरणांवर बोलणार नाही

संजय राऊत तसेच दिशा सालियन प्रकरणाबाबत विचारलेल्या प्रश्नांवर सामंत यांनी न्यायालयीन बाब असल्याचे सांगत भाष्य करण्यास नकार दिला. न्यायालयावर आमचा पूर्ण विश्वास आहे. न्यायालयीन प्रकरण सुरू असताना कोणाच्या संदर्भात बोलू नये, ही एकनाथ शिंदे यांनी आम्हाला दिलेली शिकवण आहे. समोरच्याने काहीही बोलले तरी वैयक्तिक पातळीवर मी आणि माझा पक्ष त्यावर बोलणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांनी 'संकटमोचक' म्हणून विचारलेल्या प्रश्नावर सामंत यांनी मिश्कील टिप्पणी केली. 'संकटमोचक नाही, सध्या मोदकाचा जमाना आहे,' असे ते म्हणाले.

### तुमसर उपजिल्हा रुग्णालयात

दर्जाच्या अन्नाबाबत रुग्ण प्रशासनाकडे सातत्याने तक्रारी करत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप रुग्णांनी केला आहे.

विशेष म्हणजे, या रुग्णालयात अन्न पुरवठ्याचे कंत्राट मे. राजर्षी शाहू नगरी सेवा सहकारी संस्था, लिमिटेड पालघर (ठाणे) यांच्याकडे आहे. कंत्राटदाराच्या या निष्काळजीपणामुळे रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे स्पष्ट झाले असून याप्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संदीप गजभिये यांच्याकडे थेट तक्रार करण्यात आली आहे.

### शेतक-यांच्या अडचणी संवेदनशीलतेने

यांच्यासह अनेक पदाधिकारी व अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.

या बैठकीत पाचही जिल्ह्यातील ५६ तालुक्यांतील पर्जन्यमान, पावसातील खंड, पीक स्थिती, पिण्याचे पाणी, चारा आदींचा तपशीलवार आढावा घेण्यात आली. जिल्हाधिका-यांनी आपापल्या जिल्ह्यातील स्थितीबाबत सादरीकरण केले. त्यानंतर लोकप्रतिनिधींनी निवेदन करून परिस्थिती सांगितली.

अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, हरीश पिंपळे, नितीन देशमुख, प्रकाश भारसाकळे यांनी जिल्ह्यातील परिस्थिती विशद केली. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सादरीकरण केले.

कृषी मंत्री भरणे म्हणाले की, एल निनोच्या संकटामुळे पश्चिम विदर्भात सर्वत्र पर्जन्यमानात खंड, असमानता दिसून येते. सोयाबीन, कापूस, तूर, मूग व उडीद या पीकांचे नुकसान झाले आहे. शासन शेतक-यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, निश्चितपणे भरीव मदत करण्यात येईल. यंत्रणांनीही शेतक-यांचे प्रश्न संवेदनशीलतेने सोडवून, त्यांना दिलासा द्यावा. मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना अंमलात आणली आहे. यानंतर २ लाखावरच्या थकित कर्जधारकांना पन्नास हजार रुपये प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे.

'महावितरण'कडून ट्रान्सफॉर्मर वेळेत न मिळाल्याने वीजपुरवठा सुरळीत होत नाही आणि पाणी उपलब्ध असलेल्या सिंचनाची अडचण होते, अशी तक्रार अनेक लोकप्रतिनिधींनी यावेळी केली. निरंतर योजनेतून नवे ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून द्यावेत. नादुरूस्त ट्रान्सफॉर्मर तत्काळ दुरूस्त व्हावेत. डीपी उघड्या व धोकादायक अवस्थेत असू नयेत.तिथे तत्काळ उपाययोजना करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

### बंड सन्स पेट्रोल पंपावर मध्यरात्री

मात्र, ग्राहक भूमिगत टाकीत गळती असल्याच्या मुद्द्यावर ठाम राहून व्यवस्थापकासोबत वाद घालत तेथून निघून गेला.

या वादाच्या दुसऱ्याच दिवशी पेट्रोल पंपावर तोडफोड झाल्याने व्यवस्थापनाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संबंधित ग्राहकावर संशय व्यक्त केला आहे. राजापेठ पोलिसांनी तक्रारीवरून तपास सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयिताची ओळख पटविण्याचे तसेच तोडफोडीमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

### बिबट्याचा वावर आता

स्पष्ट केले आहे. दरम्यान, बिबट्याचा वावर लक्षात घेता शेतकरी व शेतमजुरांनी एकट्याने शेतात जाऊ नये, रात्रीच्या वेळी अनावश्यकपणे बाहेर पडू नये असे आवाहन करण्यात येत आहे.

बिबट्याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याचा दावा-

प्रत्यक्षदर्शी शेतकरी अरुण गावंडे यांनी सांगितले की, शनिवारी सकाळी मजुर महिलांसोबत शेतात गेलो असता नाल्याच्या वरच्या भागातून एक बिबट्या खाली उतरतांना दिसला. काही क्षणांतच तो तेथून पळून गेला. अचानक बिबट्याचे दर्शन झाल्याने शेतमजुरांमध्ये भिती निर्माण झाली. या परिसरातील अनेक शेतकऱ्यांची जनावरे शेतातच असल्याने त्यांच्या सुरक्षेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

### नापिकी-कर्जाच्या कोंडीत

पाठविण्यात आला. सुरेश यांच्या पश्चात पत्नी रूपाली, मुलगी वैष्णवी, मुलगा गौरव आणि आई-वडील असा परिवार आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी त्यांच्यावर असल्याने त्यांच्या मृत्यूने कुटुंबीयांवर मोठे संकट ओढवले आहे. या प्रकरणी पोलिसांनी नोंद करून तपास सुरू केला आहे. मृत्यूमागील नेमकी परिस्थिती तपासातून स्पष्ट होणार आहे.

### बेपत्ता युवकाचा मृतदेह विहिरीत

पोलिसांनी मर्ग गुन्हा दाखल करून पुढील तपास आरंभीला आहे.

मृतक अमोलने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली तर त्याच्या तोंडातून जीभ बाहेर का निघाली? याबाबत गावातील नागरिकांमध्ये उलट सुलट चर्चा सुरू आहे.

### मेळघाटातील शिवसेना संघटन

नुकसान होत आहे. या प्रश्नावर वन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यासोबतच कायमस्वरूपी उपाययोजनांसाठी आंदोलन उभारण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक नागरिकांना वनपट्ट्याबाबतचे अधिकार आणि प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्याने गावागावात जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरिकांना वनपट्ट्याशी संबंधित आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले. मेळघाटात लवकरच बच्चू कडू यांचा जनता दरबार आयोजित करण्यात येणार असून, या माध्यमातून नागरिकांच्या विविध प्रश्नांची थेट माहिती घेऊन त्यांचा शासनस्तरावर पाठपुरावा केला जाणार आहे. त्यामुळे संघटन विस्तारासोबतच जनतेच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ उपलब्ध करून देण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. २८ सप्टेंबरच्या शिवसेना संघटन विस्तार अभियानाच्या आरंभासाठी मेळघाटातून व्यापक सहभाग राहावा, यासाठी गावागावात संपर्क, बैठका आणि नियोजन सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. त्यामुळे धारणीतील बैठकीतून मेळघाटातील शिवसेना संघटन विस्ताराला अधिक व्यापक स्वरूप देण्याची दिशा निश्चित झाली आहे. बैठकीस गोपाल धुर्वे, अनिल गायकवाड, अभियंता जयदीप तांडिल, ॲड. गोविंद सावलकर, सूरज मालवीय, सूरज मावस्कर, सोहनलाल, सुरेश जावरकर, किशोर भिलावेकर, सुग्रीव धुर्वे, भारत सोनवणे, राजू परिहार, संजू बेठेकर, श्रीकांत पांडे, डॉ. शैलेश जिरापे, दिनेश मावस्कर, रामू जावरकर, शालीकराम बेठेकर, किरणकुमार भिलावेकर, प्रेमलता मावस्कर, राकेश मावस्कर, शरद पाटील, मुन्ना दहिकर, सुजलाल जावरकर, बाबू मावस्कर, रामकिशन कास्देकर, हारी सावलकर, भागतराम पटोरकर, नितीन राठोड, संतोष चव्हाण, सुखदेव बेठेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

जाणार आहेत. प्रशासनातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी या जनसंवाद कार्यक्रमाची नोंद घेऊन आपल्या समस्या मांडण्यासाठी उपस्थित राहावे.

### भरधाव चारचाकी वाहन पलटी

चक्काचूर झाला. या भीषण अपघातात सुमित कुमरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. जखमी सागर शेंडे याला तातडीने वडनेर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच वडनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

### फोटो- व्हिडिओच्या धमकीने तरुणीला

इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच या घटनेचे फोटो व व्हिडिओ काढून ते समाजमाध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर फोटो-व्हिडिओच्या नावाने धमकावत तरुणीकडून तिच्या शिष्यवृत्तीची १ लाख ३२ हजार रुपयांची रक्कम फोन-पेद्वारे घेतल्याचा आरोप आहे. त्यापैकी १० हजार रुपये परत केल्यानंतर उर्वरित रक्कम मागितल्यावर पुन्हा धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे घाबरलेल्या तरुणीने वसतिगृहात विषारी औषध प्राशन केले. उपचारानंतर पोलिसांनी तिचा जबाब नोंदवून संबंधित २६ वर्षीय संशयिताविरुद्ध बीएनएसच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### कार डिव्हायडरवर चढली;

घेण्यासाठी पोलिसांकडून माहिती संकलित केली जात असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जाण्याची शक्यता आहे. अपघात नेमका कशामुळे झाला, तसेच वाहन चालविताना चालकाची स्थिती काय होती, याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

### रोडवर पडलेल्या खचक्यामुळे दुचाकीचा

डहाके व बहिणी नम्रता विजय डहाके (वय १९) यांच्यासोबत कारला येथे जात होते. दरम्यान टेंभुर्णी गावाजवळ रोडवर पडलेल्या खचक्यामध्ये गाडी गेल्याने प्रज्वल डहाके याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे सदर वाहन रोडवर जाऊन आदळले. मृतकाच्या डोक्याला गंभीर दुःखपात झाल्यामुळे त्यांना चांदुर रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. विजयाच्या डोक्याला गंभीर मार लागल्यामुळे त्याचा मृत्यू झाला तर त्याची आई व बहीण यांना गंभीर अवस्थेत जिल्हा सामान्य रुग्णालय येथे पाठवण्यात आले. पुढील तपास चांदूर रेल्वे येथील पोलीस निरीक्षक मंगेश मोहोड, हेड कॉन्स्टेबल अतुल क्षीरसागर व पासपोर करत आहे.

### रॉयल्टीविना रेती वाहतूक; पाच

रॉयल्टी नसल्याचे कारवाईदरम्यान निष्पन्न झाले. चालकाने टिप्पर भाड्याने घेतल्याचे पोलिसांना सांगितले. आर्थिक फायद्यासाठी रेतीची वाहतूक करीत असल्याचेही त्याने सांगितल्याचे पोलिसांच्या नोंदीत नमूद आहे. पोलिसांनी अंदाजे पाच लाख रुपये किमतीचा टिप्पर आणि सुमारे आठ हजार रुपये किमतीची एक ब्रास रेती असा ५ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. याप्रकरणी चालकाविरुद्ध बीएनएस कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि सहायक पोलीस अधीक्षक ईशानी आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार आधारसिंग सोनोने यांच्या नेतृत्वात रवी बावणे, आशिष राऊत, जितेश सावरकर, सुहास पोटे व वैभव आकोटकर यांच्या पथकाने केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# दुष्काळाचा प्राथमिक अहवाल पुढील आठवड्यात- मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर -** दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात येत असून सर्वच मंत्र्यांना आपापल्या जिल्ह्यात अभ्यास करून प्राथमिक अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. पुढील आठवड्यात प्राथमिक अहवालाचा आढावा घेणार असून पंचनाम्यानंतर तातडीची मदत करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

यावर्षी 'एल निनो'चे संकट येणार असल्याची कल्पना असल्याने वैरण विकासाचा कार्यक्रम हाती घेतला. चाऱ्याची लागवड करून ठेवली आहे, असेही त्यांनी सांगितले.

**'शेतकऱ्यांना मदतीसाठी राज्य सरकार कटिबद्ध'**



५ ऑक्टोबरपर्यंतचे पंचनामे झाल्यानंतर मदतीबाबत केंद्राला प्रस्ताव पाठवावा लागेल.त्या आधारे शेतकऱ्यांना मदत मिळू शकते. नुसता दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी करून राजकारण करण्यात काही उपयोग नाही, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

राष्ट्रीय आपत्ती मदत निधीच्या मदतीची वाट न पाहता जी काही मदत करता येईल, ती करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

मराठवाड्यातील काही भागात दुष्काळी परिस्थिती आहे. तिथली धरणे छोटी आहेत, त्यामध्ये पाणी कमी आहे. मोठ्या धरणांचे पाणी पिण्यासाठी राखून ठेवले आहे, असेही ते म्हणाले.

**'प्रशासनाने अधिक संवेदनशील राहावे'**

नांदेडमधील दुष्काळी आढावा बैठकीत नेतेमंडळी आणि अधिकाऱ्यांनी काजू, बदामावर ताव मारल्याकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले असता, ते म्हणाले, प्रशासनाने अशा गोष्टी प्रकर्षाने टाळल्या पाहिजेत.

साधारणपणे आपल्याकडे बैठकीत सुका मेवा ठेवण्याची पद्धत आहे. परंतु, प्रशासनाने परिस्थिती लक्षात घेऊन संवेदनशील राहावे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. प्रत्येक गोष्टीचे राजकारण करण्याची विरोधकांना सवय आहे, हे काही योग्य नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

# जरांगे पाटलांसमोर सरकार पुन्हा झुकले-विजय वडेट्टीवार

**मुंबई -** मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन स्थगित करण्यामागे नक्कीच सरकार आणि त्यांच्या 'गुप्त समझोता' झाला असावा, असा संशय व्यक्त करत काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी आज सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. 'मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांपासून मंत्र्यांपर्यंत सर्वांच्या शिव्या खाऊनही शिष्टमंडळ पाठवून मागण्या मान्य करणारे हे देशातील एकमेव सरकार आहे. शिव्या खाल्ल्याशिवाय या सरकारचे पोटच भरत नाही अशी परिस्थिती झाली आहे,'असा टोलाही वडेट्टीवार यांनी लगावला. नागपुरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी जरांगे पाटलांचे आंदोलन, मराठवाड्यातील दुष्काळ यावरून सरकारवर टीका केली.

वडेट्टीवार म्हणाले, 'जरांगे पाटलांचे आंदोलन स्थगित होण्याची ही पहिली वेळ नाही. यापूर्वीही मुंबईत जाताना व मुंबईत गेल्यानंतरही सरकार त्यांच्यापुढे झुकले. सरकार त्यांना मूर्ख बनवते की हे महाराष्ट्राला मूर्ख बनवत आहेत? आता तर जरांगेंनी मंत्र्यांकडून वाटेल ते लिहून घेतले आहे. हैदराबाद गॅझेट आणि व्हॅलिडीटीसाठी नवा कायदा करण्याच्या या अटींमुळे महाराष्ट्रातील ओबीसींचे वाटोळे होणार आहे.

आम्ही मराठा आरक्षणाला कधीही विरोध केला नाही, मात्र राज्यातील ३४८ ओबीसी जातींपैकी २०० जातींचे दरडोई उत्पन्न २ हजार रुपयेही नाही. तिजोरी रिकामी करून ओबीसींना भिकेला लावले जात असेल, तर महाराष्ट्रातील ओबीसी जनता या सरकारला कधीही माफ करणार नाही, असा इशाराही वड्डेटीवार यांनी दिला.

# दिशा सालियन प्रकरणावर नितेश राणेंचे वक्तव्य

**मुंबई -** दिशा सालियान मृत्यू प्रकरणामुळे गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठ्या आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या गेल्या. मुंबईतील ठाकरे कुटुंबाचे निवासस्थान असलेल्या 'मातोश्री' बंगल्याच्या गेटबाहेर शनिवारी दुपारी जोरदार हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. दिशा सालियनचे वडील सतीश सालियान हे स्वतः वकिलांच्या टीमसह आमदार आदित्य ठाकरे यांना कायदेशीर नोटीस देण्यासाठी मातोश्रीवर दाखल झाले. आदित्य ठाकरे यांनी दिशा सालियन प्रकरणी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टनंतर सतीश सालियान यांनी आदित्य ठाकरे आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरोधात



अब्रुनुकसानीचा दावा ठोकला आहे. त्यासंदर्भातील नोटीस देण्यासाठी सतीश सालियान हे मातोश्रीवर दाखल झाले होते. या सर्व घडामोडींनंतर आज भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी सोशल मिडीयावरती काही शब्दात आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

# विकास मानवाधिकारांपासून वेगळा करणे अशक्य- माजी सरन्यायाधीश भूषण गवई



**मुंबई :** मानवाधिकार हे सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या प्रश्नांपासून वेगळे करता येणार नाहीत, असे मत देशाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केले.

मूलभूत स्वातंत्र्य आणि शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये यांच्यातील सखोल संबंधांचे परीक्षण करताना न्यायमूर्ती गवई यांनी हे मत व्यक्त केले.

एखाद्या व्यक्तीकडे औपचारिकपणे राजकीय स्वातंत्र्य असू शकते, परंतु, ती व्यक्ती अन्न, शिक्षण, आरोग्यसेवा, उपजीविका किंवा प्रतिष्ठेने जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत गरजांपासून वंचित राहते, तेव्हा त्या स्वातंत्र्याचे वास्तविक मूल्य कमी होते. त्यामुळे हक्क केवळ अमूर्त संकल्पना म्हणून अस्तित्वात असू शकत नाहीत, असेही गवई यांनी यावेळी प्रामुख्याने स्पष्ट केले. के. सी महाविद्यालयात पार पडलेल्या नवव्या मुख्य न्यायमूर्ती एम. सी. छागला स्मृती व्याख्यानादरम्यान मूलभूत स्वातंत्र्य आणि शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये यांच्यातील सखोल संबंधांवर न्यायमूर्ती गवई यांनी मार्गदर्शन केले.

त्यावेळी त्यांनी, उपरोक्त मत व्यक्त करताना मानवी प्रगती मोजण्यासाठी केवळ आर्थिक वाढ अपुरी असल्यावरही भर दिला.

आपण विकासाबद्दल बोलतो, तेव्हा हा विकास कोणासाठी आहे, कोणत्या उद्दिष्टासाठी आहे आणि कोणत्या किंमतीवर आहे ? असा प्रश्न न्यायमूर्ती गवई यांनी विचारला. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या हरितपीठाचे अध्यक्षपद भूषवतानाच्या आपल्या अनुभवांना उजाळा दिला.

हरितपीठापुढील न्यायालयीन निर्णयप्रक्रिया म्हणजे एकीकडे पर्यावरण व परिसंस्था आणि दुसरीकडे शाश्वत विकास यांच्यात संतुलन साधण्यासाठीची तारेवरची कसरत असते, असे देखील त्यांनी म्हटले.वन्यजीव अभयारण्यांजवळ पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रे स्थापन करून आणि कामगारांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी माथेरानमध्ये माणसांनी ओढलेल्या रिक्षा टप्प्याटप्प्याने बंद करून बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांना प्राधान्य देऊन न्यायव्यवस्थेने पर्यावरण संरक्षण आणि सामुदायिक उपजीविका यांच्यात कसा समतोल साधला हे न्यायमूर्ती गवई यांनी यावेळी अधोरेखित केले.

आर्थिक विकासाने मानवी प्रतिष्ठेला हातभार लावलाच पाहिजे हे नमूद करताना, पर्यावरण संरक्षणाने पिढ्यान पिढ्या जीवनमान टिकवून ठेवले पाहिजे. आपण भावी पिढ्यांसाठी संसाधने विश्वस्त म्हणून सांभाळत आहोत.

सार्वजनिक संस्थांनी नागरिकांना त्या निवडींमध्ये सहभागी होण्यास आणि त्यांच्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास दाद मागण्यास सक्षम केले पाहिजे, असेही माजी सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले.

# एसटी बसची कमाल, खासगी आराम बससेवेला दमदार टक्कर

**मुंबई -** महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वसामान्यांची विश्वासार्ह लोकवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाने आता लांब पल्ल्याच्या आरामदायी प्रवासाच्या क्षेत्रातही नवी झेप घेण्याची तयारी केली आहे. खासगी आराम बससेवांकडे वळणाऱ्या प्रवाशांना एसटीकडे आकर्षित करण्यासाठी लवकरच महामंडळाच्या ताफ्यात स्वमालकीच्या २०० अत्याधुनिक, वातानुकूलित व्होल्वो बसेस दाखल करण्यात येणार आहेत. यात १७० आसनी आणि ३० शयनयान बसेसचा समावेश असणार आहे. सुरक्षितता, आरामदायीपणा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दर्जेदार प्रवासी सेवेचा संगम या नव्या सेवेत पाहायला मिळेल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच एसटी महामंडळाच्या टप्प्यामध्ये व्होल्वो बसेस समाविष्ट होत आहेत. मंत्री सरनाईक म्हणाले की, लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सध्या अनेक प्रवासी अधिक भाडे देऊन खासगी आराम बससेवेला पसंती देतात. वातानुकूलित सुविधा, आरामदायी आसनव्यवस्था, कमी प्रवास वेळ आणि रात्रीच्या प्रवासातील सुविधा यामुळे खासगी आराम बससेवेचा स्वतंत्र प्रवासी वर्ग निर्माण झाला आहे. या प्रवाशांना एसटीकडे आकर्षित करण्यासाठी केवळ पर्याय उपलब्ध करून न देता खासगी आराम बससेवेच्या तोडीची आधुनिक, विश्वासार्ह आणि प्रवाशांच्या अपेक्षा पूर्ण करणारी सेवा देण्याचे उद्दिष्ट एसटीने ठेवले आहे.

२५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराच्या किमान पाच ते सहा तासांच्या प्रवासासाठी आरामदायी ४५ आसनी बसेस, तर रात्रीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी ३० किंवा ४५ शयनयान क्षमतेच्या बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

त्यामुळे दिवसा तसेच रात्रीच्या प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

# महाराष्ट्र सोडा विखे-पाटलांच्या घराण्याचा स्वीडनच्या संसदेत डंका

**मुंबई -** महाराष्ट्राच्या सहकार आणि राजकीय क्षेत्राला मोठी ओळख करून देणाऱ्या विखे-पाटील घराण्याच्या नावाचा तुरा आता आंतरराष्ट्रीय पातळीवर खोवला गेला आहे. महाराष्ट्रातील नामांकित शिक्षणतज्ज्ञ अशोक विखे पाटील यांच्या सुपुत्री नीला विखे पाटीलयांची स्वीडनच्या खासदारपदी निवड झाली आहे. १३ सप्टेंबर रोजी झालेल्या स्वीडनच्या सार्वत्रिक निवडणुकीत स्टॉकहोम शहर मतदारसंघातून ४१ वर्षीय नीला यांनी भव्य विजय मिळवला.



या ऐतिहासिक यशाबद्दल त्यांचे काका आणि महाराष्ट्राचे महसूल व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनस्वी आनंद व्यक्त केला असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रवरानगर येथील पद्मश्री विठ्ठलराव विखे सहकारी साखर कारखान्याच्या बॉयलर अग्निप्रदीपन सोहळ्यात हजेरी लावल्यानंतर राधाकृष्ण विखे पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

ते म्हणाले, 'नीला स्वीडनच्या खासदारपदी निवडून आल्याचा मला मनस्वी आनंद झाला आहे. ती सुरुवातीपासूनच सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात अत्यंत सक्रिय होती. तिने यापूर्वी स्वीडनच्या पंतप्रधानांची राजकीय सल्लागार म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. निलाकडून मला मोठ्या अपेक्षा आहेत.'

पुढे बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील राजकारणावरही टिप्पणी केली. 'आता नीलाला मी काही सल्ला देण्याची गरज उरलेली नाही. आपल्याकडची आणि तिकडची कार्यपद्धती अतिशय वेगळी आहे. आपल्याकडे व्यक्तीद्वेषाने भरलेले राजकीय वातावरण आहे, त्यामुळे सामाजिक आणि राजकीय जीवनात मोठी आव्हाने असतात,' असे मत त्यांनी व्यक्त केले.

आशियातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या नीला या पणती आहेत. तसेच माजी केंद्रीय मंत्री दिवंगत बाळासाहेब विखे पाटील यांच्या त्या नात आहेत.

# एलपीजी सिलिंडर बुकिंगचा नियम बदलणार

**मुंबई -** घरगुती एलपीजी सिलिंडर वापरणाऱ्या ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. १ ऑक्टोबर २०२६पासून अनुदानासह नियंत्रित किरकोळ दरात एलपीजी रिफिल बुक करण्यासाठी 'बायोमेट्रिक आधार प्रमाणीकरण' अनिवार्य असणार आहे, अशी घोषणा पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने केली आहे. मंत्रालयाच्या माहितीनुसार, १९ सप्टेंबरपर्यंत २७.४३ कोटी सक्रिय घरगुती एलपीजी ग्राहकांनी म्हणजेच ८९.९ टक्के ग्राहकांनी 'बायोमेट्रिक आधार प्रमाणीकरण' पूर्ण केले आहे. या ग्राहकांना पुन्हा कोणतीही प्रक्रिया करण्याची गरज नाही. याबद्दल सविस्तर वृत्त दी इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

ज्या ग्राहकांनी अद्याप बायोमेट्रिक आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेले नाही, त्यांच्या सोयीसाठी प्रशासनाकडून अनेक पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सिलिंडरच्या डिलिव्हरीवेळी डिलिव्हरी कर्मचाऱ्यामार्फत तेल कंपनीच्या मोबाईल ॲपद्वारे हे प्रमाणीकरण पूर्ण करू शकतात, अथवा आपल्या



**१ ऑक्टोबरपासून आधार बायोमेट्रिक अनिवार्य**

संबंधित गॅस वितरकाच्या शोरूममध्ये थेट जाऊन ही प्रक्रिया पार पाडू शकतात. याशिवाय, घरबसल्या स्वतःहून कारवाई करायची झाल्यास, संबंधित तेल विपणन कंपनीच्या अधिकृत मोबाईल ॲपद्वारेही हे प्रमाणीकरण सहजपणे करता येऊ शकते.

एलपीजी मिळणे बंद होणार नाही. मात्र अनुदानाचा लाभ घेण्यासाठी बायोमेट्रिक आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक असेल. ज्या ग्राहकांना बायोमेट्रिक आधार प्रमाणीकरण करायचे नाही किंवा काही कारणामुळे ते पूर्ण करता येत नाही, ते आपल्या ओएमसीच्या डिजिटल माध्यमातून आपली निवड नोंदवू शकतात. यासाठी वेब पोर्टल, मोबाइल ॲप, व्हॉट्सॲप चॅटबॉट किंवा आयव्हीईआरएसचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. अशा पद्धतीने नोंदणी करणाऱ्या ग्राहकांना अनुदानाशिवाय, बाजारभावाने उपलब्धतेनुसार ५ किलो किंवा १० किलो वजनाचे एलपीजी सिलिंडर दिले जातील.पेट्रोलियम मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, अनुदानाचा लाभ खऱ्या आणि पात्र घरगुती ग्राहकांपर्यंतच पोहोचावा, हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे. तसेच, दुबार किंवा अपात्र जोडण्यांची ओळख पटवणे आणि अनुदानित घरगुती एलपीजी सिलिंडर्सचा व्यावसायिक किंवा औद्योगिक वापरासाठी होणारा वळवणीचा प्रकार रोखणे, हा देखील याचा उद्देश आहे.


# विसर्जनासाठी गेला अन् अनर्थ घडला

**रत्नागिरी:** कोकणात घरगुती गणपतीच्या विसर्जनादिवशी रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर माभळे गावात एक दुर्दैवी घटना घडली आहे. विसर्जनावेळी नदीत बाप लेक बुडाले. स्थानिकांच्या प्रयत्नानंतर वडिलांना वाचवण्यात यश आलं, मात्र मुलाचा दुर्दैवीरित्या मृत्यू झाला आहे. काही दिवसांपूर्वीही ठाणे येथील इंजिनिअर असलेल्या एका युवकाचा खाडीत बुडाल्याने मृत्यू झाला होता. त्यामुळे नदीत विसर्जनावेळी अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संगमेश्वर तालुक्यातील माभळे इथं गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी बावनदीत विसर्जनासाठी उतरलेल्या पिता-पुत्रावर मोठा जीवघेणा प्रसंग ओढवला होता. विसर्जनादरम्यान पाण्याचा अंदाज चुकल्याने पुरुषोत्तम गुणाजी घडशी आणि त्यांचा मुलगा प्रज्ज्वल घडशी नदीच्या प्रवाहात बुडाले. ग्रामस्थांच्या प्रसंगावधानामुळे पुरुषोत्तम यांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मात्र त्यांचा मुलगा प्रज्ज्वलचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने माभळेसह संपूर्ण संगमेश्वर तालुक्यावर शोककळा पसरली.प्रज्ज्वल याच्या पश्चात आई-वडील, आजोबा असा परिवार आहे. प्रज्ज्वल हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली येथे बी फार्मसीचे शिक्षण घेत होता. गणेशोत्सवासाठी तो गावी आला होता. अभ्यासात हुशार असलेला प्रज्ज्वल बी फार्मसीच्या शेवटच्या वर्षाला होता. मात्र शिक्षण पूर्ण होण्याआधीच त्याचे मेडिकल विषयातील स्वप्न नियतीने हिरावून घेतले आहे.



# बीएससीमध्ये शिकणाऱ्या तरूणीचा जीव धोक्यात

**हाथरस -** उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका घरात लपलेल्या सापाने बीएससीमध्ये शिकणाऱ्या तरूणीला ३ दिवसांत तिनदा दंश दिला. गेल्या दीड महिन्यात या तरूणीला ७ वेळा सापाने चावा घेतल्याचा दावा तिच्या वडिलांनी केला आहे. वारंवार होणाऱ्या या प्रकारामुळे संपूर्ण कुटुंब दहशतीत आहे. या मुलीला हॉस्पिटलला दाखल करण्यात आले असून तिच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत आहे.शनिवारी सकाळी बाथरूममध्ये अंघोळ करताना या तरूणीला शेवटचे सापाने चावले होते. तरुणीचा आवाज ऐकून तिचे आई वडील धावत गेले. त्यानंतर तिला तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी तिच्यावर तातडीने औषधोपचार केले आणि आता तिच्या प्रकृतीत सुधार होत आहे.



# वाराणसीत पोलिसांसोबत चकमक

**वाराणसी :** वाराणसीमध्ये उत्तर प्रदेश पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत झारखंडमधील बंदी घातलेल्या नक्षलवादी संघटनेचा एक कमांडर ठार झाला आहे. रविवारी पहाटे रामनगर परिसरात ही कारवाई करण्यात आली. ब्रिजेश गंजू उर्फ गोपाल सिंग भोक्ता असे ठार झालेल्या कमांडरचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गंजू हा मोटारसायकलवरून आपल्या एका साथीदारासोबत तेगारा क्रॉसिंगहून रामनगरमार्गे मुघलसरायच्या दिशेने जात होता. यावेळी पोलिसांच्या पथकाने त्याला अडवून अटक करण्याचा प्रयत्न केला. मात्र, गंजूने पोलिसांवर गोळीबार केल्याचा दावा पोलिसांनी केला. त्यानंतर पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात गंजू गंभीर जखमी झाला.या चकमकीत यूपी एटीएसचे उपअधीक्षक विपिन राय आणि हेड कॉन्स्टेबल नितेंद्र कृष्णा यांनाही गोळ्या लागल्या. मात्र, बुलेटप्रूफ जॅकेटमुळे त्यांना गंभीर दुखापत झाली नाही. चकमकीनंतर गंजूला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



# बेरोजगार तरुणांना मोठ्या कंपन्यांमध्ये नोकरीची हजारो संधी!

**पुणे :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागामार्फत 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-२०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत राज्यभरात २९ सप्टेंबरला एकाच दिवशी पाचशेहून अधिक रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार आहेत. त्यात पुणे जिल्ह्यात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने ३० शैक्षणिक संस्थांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. या रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून मोठ्या कंपन्यांमध्ये तरुणांना रोजगाराच्या हजारो संधी उपलब्ध होणार आहेत.



# निकष शिथिल करून शेतकऱ्यांना मदत द्या- खा. अशोक चव्हाण

**नांदेड :** पावसाचा खंड आणि तुटीमुळे संपूर्ण मराठवाड्यात पिकांची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. यंदा पेरणीचे क्षेत्रही घटले आहे. सध्याच्या या गंभीर परिस्थितीची दखल घेत शासनाने नेहमीचे निकष शिथिल करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी भाजपा नेते खासदार अशोक चव्हाण यांनी केली. नांदेड येथे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विभागाची आढावा बैठक पार पडली. यावेळी ते दुरदृश्यप्रणालीद्वारे बोलत होते. खा.चव्हाण म्हणाले की, सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सोयाबीन पिवळे पडले असून वाढ खुंटल्यामुळे यंदा कापसाचे पीकही हाती येण्याची शक्यता दुरावली आहे.



# ८ महिन्यांची चिमुकली बेपत्ता

**नांदगाव -** तालुक्यातील मन्याड चौकी परिसरातील बाभुळवाडी येथून आठ महिन्यांची चिमुकली बेपत्ता झाल्याच्या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतलं आहे. मध्यरात्री घरातून चिमुकली बेपत्ता झाल्यानंतर पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. मात्र, तपासादरम्यान एका संशयिताचा मृत्यू आणि आता चिमुकलीचे आजोबाही बेपत्ता असल्याने या प्रकरणातील गूढ आणखी वाढले आहे. १७ तारखेच्या मध्यरात्री आठ महिन्यांची चिमुकली अचानक बेपत्ता झाल्याचं कुटुंबीयांच्या लक्षात आले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## चिप स्वावलंबन

जागतिक अर्थव्यवस्थेत तेलाचे जे स्थान विसाव्या शतकात होते, तेच स्थान एकविसाव्या शतकात सेमीकंडक्टरला मिळत आहे. मोबाईल फोन, मोटारीत, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर्स, वैद्यकीय उपकरणे, संरक्षण सामग्री आणि उपग्रहांपासून दळणवळण यंत्रणेपर्यंत आधुनिक अर्थव्यवस्थेचा प्रत्येक महत्त्वाचा भाग या अतिसूक्ष्म चिपवर अवलंबून आहे. सेमीकंडक्टर उत्पादन हा उद्योगाबरोबरच आर्थिक सुरक्षितता, तंत्रज्ञानातील स्वायत्तता आणि निर्यातभिमुखतेचा विषय बनला आहे. सध्या सुरू असलेल्या 'सेमीकॉन इंडिया २०२६'कडे या परिप्रेक्ष्यातून पाहावे लागेल. टपाल तिकिटापेक्षाही लहान आकाराच्या सिलिकॉनच्या तुकड्यावर असणारे अब्जावधी ट्रान्झिस्टर आणि त्यांची प्रत्येक सेकंदाला अब्जावधी वेळा होणारी चालू-बंद प्रक्रिया यांमध्ये दडलेले अर्थकारणाचे गुपित भारताला तुलनेने उशिरा समजले. १९४७ मध्ये ट्रान्झिस्टरचा शोध लागला. १९५०-६०च्या दशकात इंटिग्रेटेड सर्किट, सिलिकॉन तंत्रज्ञान पुढे मायक्रोप्रोसेसर विकासातून अमेरिकेने या क्षेत्रात आघाडी घेतली. इंटेल, टेक्सास इन्स्ट्रुमेंट्स, एएमडी या कंपन्यांनी या औद्योगिक क्रांतीला आकार दिला. क्वालकॉम, एनव्हिडिया, ब्रॉडकॉम, एएमडी कंपन्यांनी चिप डिझाईनमध्ये अमेरिकेचे वर्चस्व कायम ठेवले. जागतिकीकरणात या कंपन्यांनी चिप डिझाईन, संशोधनावर भर देत प्रत्यक्ष उत्पादनाचा मोठा भाग आशियाकडे जाऊ दिला. तैवानने याचा फायदा घेण्यासाठी ७०च्या दशकात इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर क्षेत्राला राष्ट्रीय औद्योगिक धोरणाचा भाग बनविले. टीएसएमसीच्या स्थापनेनंतर चिप डिझाईन करणाऱ्या कंपन्यांना अब्जावधी डॉलरचे कारखाने उभारण्याची गरज राहिली नाही. अमेरिका डिझाईनमध्ये आणि तैवान उत्पादनात प्रबळ होण्यामागे या मॉडेलचा मोठा वाटा आहे. भारताकडे अनेक वर्षांपासून सेमीकंडक्टर डिझाईनसाठीचे मुबलक अभियांत्रिकी मनुष्यबळ आहे; परंतु मोठ्या प्रमाणात व्यावसायिक चिप उत्पादन परिसंस्था विकसित झाली नव्हती. यात बदल घडविण्याचा प्रयत्न 'सेमीकॉन इंडिया'नंतर सुरू झाला. डिसेंबर २०२१मध्ये ७६,००० कोटी रुपयांच्या तरतुदीसह पहिल्या कार्यक्रमाला मंजुरी दिली. जुलै २०२६ मध्ये 'सेमीकॉन २.०'साठी १,२७,५०० कोटी रुपये मंजूर केले. त्यात चिप डिझाईन, उत्पादन, पॅकेजिंग, उपकरणे व साहित्य, संशोधन आणि मनुष्यबळ या संपूर्ण परिसंस्थेवर भर आहे. चालू वर्षीच्या मध्यापर्यंत ६ राज्यांमध्ये १२ सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्प मंजूर झालेत. त्यातील गुंतवणूक १.६४ लाख कोटी रु. आहे. परकीय गुंतवणूक, कर आणि सीमाशुल्क संबंधित सुधारणांमुळे कंपन्यांना भारतात व्यवसाय करणे सुलभ झाले. जगातील मोठ्या इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांनी भारतात उत्पादन सुरू केले. त्याचे परिणाम दिसत आहेत. २०१४-१५मध्ये भारतात सुमारे १.९ लाख कोटी रुपयांच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे उत्पादन होत होते. २०२५-२६पर्यंत ते सात पटींनी वाढून १३.११ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. इलेक्ट्रॉनिक्सची निर्यातही सुमारे ३८,००० कोटी रुपयांवरून ११ पटींनी वाढून ४.२४ लाख कोटी रुपयांवर पोहोचली. मोबाईल फोनचे उत्पादन १८,००० कोटी रुपयांवरून ३३ पटींनी वाढून ६.२७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. यातून भारताची मोठ्या प्रमाणावर तांत्रिक उत्पादन क्षमतेची प्रतिमा बनली. त्यापुढचा टप्पा सेमीकंडक्टरचा होता. २०२१ मध्ये 'सेमीकॉन इंडिया'चे मुख्य उद्दिष्ट संपूर्ण सेमीकंडक्टर परिसंस्था तयार करणे हेच होते. चिप डिझाईन आणि उत्पादनापासून पॅकेजिंग, टेस्टिंग, यंत्रसामग्री, कच्चा माल आणि कुशल कर्मचारी अशा संपूर्ण मूल्यसाखळीचा समावेश त्यात होता. सेमीकॉन इंडिया २०२६ च्या उद्‌घाटनप्रसंगी पंतप्रधानांनी सांगितले की, एक लाख अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना या क्षेत्रासाठी प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट असून आतापर्यंत ७० हजार तरुणांना प्रशिक्षण दिले. म्हणजेच भारताचे सेमीकंडक्टर धोरण केवळ कागदावर राहिलेले नाही, तर चिपनिर्मिती प्रत्यक्षात सुरू झाली आहे. गुजरात, आसाम, ओडिशा, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पंजाब या राज्यांमध्ये प्रकल्प उभारणी सुरू आहे. त्यामुळे सेमीकंडटर क्षेत्र विस्तारत आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी भारतात २०२६मध्ये स्वदेशी उच्च-तंत्रज्ञान चिपचे उत्पादन सुरू होईल, असे म्हटले होते. भारत त्याही पुढे गेला असून अनेक प्रकल्पांनी व्यावसायिक उत्पादन सुरू केलेय. एकट्या साणंदच्या प्रकल्पाची वार्षिक क्षमता सुमारे २० कोटी चिप होती ती ५०० कोटी चिप प्रतिवर्षापर्यंत वाढवली. ही भरारी अर्थव्यवस्था, रोजगारजगत यांसाठी महत्त्वाची आहे.जागतिक राजकारण, अर्थकारण बदलत आहे. राष्ट्रांचा संकुचिततावाद, राष्ट्रवाद, आत्मकेंद्रीपणा वाढत आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी रोखली त्याचप्रमाणे चीननेही दुर्मीळ खनिजांबाबत भूमिका घेतली होती. अमेरिकेसह पश्चिमी राष्ट्रांनी कोरोना काळात लसींबाबत हाच दृष्टिकोन अवलंबला. यातून भारताला मोठा धडा मिळाला. तो म्हणजे इंधन, नैसर्गिक वायू, औषधे या घटकांबाबत आत्मनिर्भर होणे. सेमीकंडक्टरचाही यामध्ये समावेश आहे. त्यामुळे भारताने स्वावलंबी बनण्यासाठी पावले टाकली. मागील तीन औद्योगिक क्रांतींमध्ये भारत प्रेक्षक होता. आता चौथ्या औद्योगिक क्रांतीचा एक मोठा भाग बनण्याचा भारताचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने सेमीकंडक्टर निर्मितीतील झेप महत्त्वाची आहे. भारताला या क्षेत्रातील रिसर्च अँड डेव्हलपमेंटची इकोसिस्टीम तयार करायची आहे. यासाठी उच्च शिक्षणावर भर द्यावा लागणार आहे. सेमीकंडक्टर उद्योगासाठी अत्यंत शुद्ध पाणी, अखंड, वीजपुरवठा, विशेष रसायने, अत्याधुनिक यंत्रसामग्री, प्रशिक्षित अभियंते आणि संशोधनाची भक्कम साखळी आवश्यक असते. चिपनिर्मितीत वापरली जाणारी मशिनरी आणि महत्त्वाची सामग्री मोजक्याच देशांकडे आहे. त्यामुळे भारताला स्वदेशी क्षमता वाढवावी लागेल. हे करताना चिप आणि तंत्रज्ञानाची पुरवठा साखळी मोजक्या देशांच्या किंवा कंपन्यांच्या हातात मर्यादित राहू नये, कोणत्याही देशाला आर्थिक दबावासाठी या पुरवठा साखळीचा वापर करता येऊ नये, तसेच या महत्त्वाच्या तंत्रज्ञानाचे नियंत्रण खुल्या आणि लोकशाही देशांकडे राहावे, ही भूमिकाही भारत मांडत आहे; पण संपूर्ण चिप साखळी एका देशात उभी करणे व्यवहार्य नाही. डिझाईन एका देशात, उत्पादन दुसऱ्या, यंत्रसामग्री तिसऱ्या देशातून, रसायने चौथ्या देशातून आणि पॅकेजिंग अन्यत्र अशी या उद्योगाची रचना आहे. त्यामुळे जागतिक पुरवठा साखळीत अपरिहार्य भागीदार बनणे हे भारताचे उद्दिष्ट या क्षेत्रातील आपला प्रभाव वाढवणारे आहे. या उद्योगात १५ ते २० वर्षांचा दृष्टिकोन आवश्यक असतो. सरकार बदलले, अर्थचक्र बदलले किंवा मंदी आली, तरी संशोधन, कौशल्य आणि पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक थांबता कामा नये. सातत्याने नवे तंत्रज्ञान आत्मसात करून जागतिक स्पर्धेत टिकून राहणे हीच या क्षेत्रातील खरी परीक्षा असते. त्यामध्ये आगामी काळात भारताचा उत्तीर्णतेचा आलेख कसा राहतो, यावर सेमीकंडक्टरमधील आत्मनिर्भरतेचे यशापयश अवलंबून असेल.

# सरकारी संवेदनशीलतेचाच दुष्काळ!

**सरकारने पंचनाम्याची तारीख ठरवण्यापेक्षा मदत वाटपाची सुरुवात करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकऱ्याचे नुकसान दिवसेंदिवस वाढत असताना सरकारने ५ ऑक्टोबरची वाट पाहणे म्हणजे दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांची गंमत पाहण्याचा प्रकार आहे**

सणावारांचा काळ असल्याने राज्याच्या शहरी भागात सध्या मोठ्या उत्सवाचे वातावरण आहे. मुंबई, पुणे यांसारख्या महानगरांमध्ये गणेशोत्सवाचे मोठमोठे सोहळे होत आहेत. मंत्री, नेत्यांच्या घरच्या गणरायांचे सोहळे ही अगदी भव्यदिव्य प्रकारात मोडणारे आहेत, तर दुसरीकडे मराठवाडा, विदर्भासह उत्तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पावसासाठी आभाळाकडे डोळे लावून बसलेली अभागी जनता वृत्तवाहिन्यांवरील सोहळे पाहून दिवस ढकलत आहे. आभाळ कोरडे आहे, शेतकरी हवालदिल आहे, पिके करपली आहेत. सरकार उत्सवात मग्न आहे. मोदींच्या वाढदिवसासाठी भाजप तेलाचे दिवे लावण्याचे आवाहन करत आहे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाजप नेत्यांपेक्षा मोठमोठ्या जाहिराती वृत्तपत्रात देत आहेत. गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येऊन हिंदी भाषेचे महत्त्व सांगून नवा वाद पेटविण्याचा प्रयत्न करतात. या सर्वांना महाराष्ट्र दुष्काळात होरपळतोय याची कल्पना तरी आहे का? असा प्रश्न सामान्य माणसाला पडलाय. कारण यापैकी कोणीही शेतकऱ्यांवर आलेल्या या भीषण संकटाबद्दल तोंडातून चकार शब्द काढत नाही. मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय होत नाही, मदत जाहीर करत नाही. फक्त चिंता व्यक्त केली जात आहे. ही सर्व परिस्थिती पाहून 'अपना काम बनतां भाड में जाये जनता' अशा पद्धतीने सरकारचे काम सुरू असल्याचे दिसत आहे.

### दुष्काळ राष्ट्र

सरकारी आकडेवारीनुसार राज्यातील १९ जिल्ह्यांतील किमान ८३ तालुक्यांमध्ये २० दिवसांपेक्षा अधिक काळ पावसाचा खंड आहे. अनेक तालुक्यांत हा खंड ३० ते ४० दिवसांपुढे गेला आहे. २० जिल्ह्यांमध्ये २० टक्क्यांपेक्षा अधिक पर्जन्यतूट आहे. धाराशिवमध्ये तर सुमारे ८० दिवस पावसाचा अभाव असल्याने खरिपाची सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, मका, बाजरी ही पिके करपून गेली आहेत, फळबागा वाळत आहेत, तलाव-नद्यांची पात्रे कोरडीठाक पडली आहेत. विहिरी, बोअरवेल्सची पाणीपातळी घटली आहे, अनेक कोरड्या पडल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हजारो लाखो शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. पण सरकार आणि प्रशासन नावाची यंत्रणा कुठेही दिसत नाही. पालकमंत्री जिल्ह्यात जात नाहीत, दुष्काळी स्थितीचा आढावा घेत नाहीत, मंत्रिमंडळ बैठकीत काही बोलत नाहीत. सरकार जिवंत आहे का, असा प्रश्न पडावा इतकी भीषण शांतता दुष्काळाच्या बाबतीत सरकारी दप्तरी दिसत आहे.

### पिकांसोबत सरकारची संवेदनशीलताही करपली

महायुतीने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र सत्तेत आल्यानंतर या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने शेतकऱ्यांवर खरीप हंगामाची पेरणी करण्यासाठी पुन्हा कर्ज काढण्याची वेळ आली. बी-बियाणे, खते, कीटकनाशके आणि मशागतीसाठी शेतकऱ्यांनी कर्जाचा आधार घेतला. कर्जाच्या पैशातून पेरणी केली, शेताची मशागत केली आणि पोटच्या लेकरांप्रमाणे पिकांची काळजी घेतली. मात्र ऐन हंगामात पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्याच्या डोळ्यांसमोर त्याचे उभे पीक करपून जात आहे. ज्या पिकातून कर्ज फेडण्याची आणि कुटुंबाचा संसार चालवण्याची आशा होती, तेच पीक आता हातातून निसटताना पाहण्याशिवाय शेतकऱ्याच्या हाती काही उरलेले नाही. निसर्गाने संकट उभे केले असताना सरकारकडून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा असताना सरकारची मदतही अद्याप प्रतीक्षेत आहे. निसर्गाने पिकांवर संकट आणले; पण पिकांसोबत सरकारची संवेदनशीलताही करपली आहे का? हा आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोर उभा राहिलेला गंभीर प्रश्न आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आभाळाकडे पावसासाठी आणि सरकारकडे मदतीसाठी पाहत आहे; मात्र दोन्हीकडून प्रतीक्षाच पदरी पडत आहे. सर्वसामान्य शेतकरी सध्या अस्वस्थ झाला आहे, त्याचा धीर सुटत आहे. आणखी किती काळ त्याने वाट पाहायची?



### दुष्काळ जाहीर करण्यासाठी आणखी किती पुरावे हवेत?

एका बाजूला दीर्घ पावसाचा खंड, दुसऱ्या बाजूला पर्जन्यतूट, तिसऱ्या बाजूला करपणारी खरीप पिके आणि चौथ्या बाजूला खालावत जाणारी भूजलपातळी संकट इतके स्पष्टपणे समोर असताना सरकार आणखी कोणत्या पुराव्याची वाट पाहत आहे? शेतकऱ्याची पिके हातातून गेली आहेत तरी सरकारला दुष्काळ कसा दिसत नाही? दुष्काळाची घोषणा ही केवळ सरकारी कागदावरील शिक्का नाही. ती संकटग्रस्त शेतकऱ्याला आधार देण्याची सुरुवात असते. त्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची वाट पाहण्याऐवजी सरकारने उपलब्ध आकडेवारीच्या आधारे तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. शेतकऱ्याच्या हातात आज उत्पन्नाची खात्री नाही, पिकाची खात्री नाही, पाण्याची खात्री नाही आणि पुढील हंगामाचीही खात्री नाही. मात्र त्याच्या डोक्यावर कर्ज आहे, वीजबिल आहे, घरखर्च आहे, मुलांच्या शिक्षणाचा खर्च आहे आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आहे. म्हणजे संकट आता केवळ शेताच्या बांधावर राहिलेले नाही; ते शेतकऱ्याच्या घरात पोहोचले आहे.

### किमान एवढे तरी करा

सरकारने आता प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आली आहे, पण अद्याप सरकार साधा आढावाही घ्यायला, पंचनामे करायला, पाहणी करायलाही तयार नाही. दीर्घ पावसाचा खंड असलेल्या तालुक्यांमध्ये पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून अंतरिम आर्थिक मदत द्यावी. गंभीर परिस्थिती असलेल्या तालुक्यांना दुष्काळसदृश मदतीचे निकष लागू करावेत. पीककर्जाच्या वसुलीला स्थगिती देऊन शेतकऱ्यावरील व्याजाचा भार कमी करण्यासाठी निर्णय घ्यावा. जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करून द्यावा आणि गरज असलेल्या ठिकाणी चारा छावण्या सुरू कराव्यात. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्याऐवजी संभाव्य टंचाईग्रस्त गावांसाठी आतापासूनच पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. खरीप पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीची नुकसानभरपाई मिळावी आणि पीकविमा कंपन्यांकडून दाव्यांची प्रक्रिया वेगाने पूर्ण करून शेतकऱ्यांना विम्याची रक्कम वेळेत मिळेल, याची सरकारने खात्री करावी.

### वाट पाहू नका, तत्काळ मदत द्या!

यावर्षी एल-निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी होणार आहे याची पूर्ण माहिती सरकारला होती. त्यामुळे सरकारने अगोदरच उपाययोजना करायला हव्या होत्या. पाऊस पाडणे सरकारच्या हातात नाही. पण पाऊस पडला नाही तेव्हा शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहणे सरकारच्या हातात आहे. निसर्गाच्या दुष्काळावर सरकारचे नियंत्रण नसते; पण मदतीचा दुष्काळ पडू न देणे सरकारच्या हातात असते. आता शेतकऱ्याला भाषणे, आश्वासने, बैठका आणि कागदी आराखडे नाही मदत हवी आहे, आत्ताच हवी आहे आणि प्रत्यक्ष हवी आहे.

### ५ ऑक्टोबरची लक्ष्मणरेषा कशाला?

मुख्यमंत्री म्हणतात, एनडीआरएफच्या नियमानुसार ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी परिस्थितीचे पंचनामे सुरू केले जातील. मात्र सरकारच्या या निर्णयावरच गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. पाऊस ऑगस्टपासून दडी मारून बसला आहे, अनेक भागांत पावसाचा प्रदीर्घ खंड पडला आहे, पिके करपून गेलेली आहेत. ५ ऑक्टोबरपर्यंत ही वाळलेली पिके सरकारच्या पंचनाम्याची वाट पाहात थांबणार आहेत का? उपाशी जनावरे त्या तारखेपर्यंत चारा न खाताही जगणार आहेत का? पंचनामा ही नुकसान नोंदवण्याची प्रशासकीय प्रक्रिया आहे; पण संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला तातडीचा दिलासा देण्याची प्रक्रिया त्यापेक्षा आधी सुरू होणे अपेक्षित आहे. सरकारने पंचनाम्याची तारीख ठरवण्यापेक्षा मदत वाटपाची सुरुवात करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकऱ्याचे नुकसान दिवसेंदिवस वाढत असताना सरकारने ५ ऑक्टोबरची वाट पाहणे म्हणजे दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांची गंमत पाहण्याचा प्रकार आहे.

**-ॲड. श्रीनिवास बिक्कड**

## .....तर बाप्पाची अवकृपा होण्यास वेळ लागणार नाही !

श्रीगणेशमूर्तीच्या आगमनादरम्यान होणाऱ्या अपघातात यंदा याआधीच्या तुलनेत प्रचंड वाढ झाली. मुंबईतील भुलेश्वरच्या राजाची २२ फुटी मूर्ती मंडपात येण्याआधीच कोसळून मोठा अपघात झाला ज्यामध्ये मंडळाच्या अध्यक्षांसह २ जण ठार तर ५ जण घायाळ झाले. नालासोपारा येथील मोरेगाव सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते बाप्पाची मूर्ती ट्रॉलीवरून आणत असताना अचानक मुसळधार पाऊस आणि वेगवान वारा सुरू झाला. मूर्तीला पावसापासून वाचवण्यासाठी प्लास्टिकचे आच्छादन घालण्याचा प्रयत्न करत असताना ट्रॉलीचा तोल बिघडला आणि गणेशमूर्ती कार्यकर्त्यांच्या अंगावर कोसळली. मुंबईतील धारावी परिसराजवळही आगमन सोहळ्यादरम्यान 'प्रेम नगरचा राजा' या मंडळाची सुमारे १५ फुटांची गणेशमूर्ती कोसळल्याची घटना घडली. कुर्ल्यातील शीतल तलावाजवळ सुद्धा गणेशमूर्तीची ट्रॉली गतिरोधकात अडकून मूर्ती खाली कोसळली. याखेरीज यंदा श्रीगणेशमूर्तींच्या आगमनादरम्यान अनेक लहान मोठे अपघात घडले ज्यामुळे मूर्तीच्या उंचीबाबतचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

गणेशोत्सवात मूर्तीची उंची खरंच भव्य दिव्य असणे गरजेचे आहे का असा प्रश्न आता पुन्हा एकदा भाविकांकडून विचारला जाऊ लागला आहे. ज्या बाप्पाला गणेशोत्सवादरम्यान आपण वाजत गाजत श्रद्धेने मंडपात आणतो त्याच्यासाठी अनेक रात्री जागून सुंदर आरास तयार करतो. त्याच्या १० दिवस मुक्कामाचे उत्तम नियोजन करतो अशा बाप्पाचा आगमनादरम्यान अपघात घडणे किती मोठे दुर्दैव आहे आणि याला जर आपणच कारणीभूत असू तर त्याचे पातक आपण कसे फेडणार आहोत ? मूर्तीच्या उंचीबाबतचा मुद्दा चर्चेत असतानाच मागच्या वर्षी प्रसिद्ध मूर्तिकार अरुण दत्ते यांनी परळचा महाराजा मंडळासाठी बॅलन्सिंग मूर्ती तयार केली ज्याचे त्यावेळी अनेकांनी कौतुक केली. ही बॅलन्सिंग मूर्ती पाहण्यासाठी देशभरातून भाविक परळचा महाराजाला भेट देण्यासाठी आले. या कलाकृतीमुळे अरुण दत्ते यांचे नाव देशभर चर्चेत आल्याने यंदा त्यांच्याकडे बॅलन्सिंग गणेशमूर्ती तयार करण्याच्या ५० हुन अधिक ऑर्डर्स आल्या. अन्य मूर्तिकारांकडेही यंदा अनेक मंडळांनी बॅलन्सिंग मुर्त्यांची मागणी केली त्यामुळे त्यांनीही यंदा तसे प्रयत्न केले परिणामी यावेळी मुंबईसह ठाणे आणि पुण्यातही बहुतांश ठिकाणी बॅलन्सिंग बाप्पा पाहायला मिळत आहेत. कलाकृती म्हणून बॅलन्सिंग बाप्पाचे कौतुक केले जात असले तरी जो देव साऱ्या विश्वाला बॅलन्स करतो त्याला अशा प्रकारे स्वतःचा तोल सावरताना १० दिवस उभा राहिलेला दाखवणे कोणत्याही गणेशभक्तासाठी क्लेशदायकच आहे. हे सर्व बॅलन्सिंग बाप्पा आज गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांत विराजमान झाले असले, तरी अनंत चतुर्दशीला जेव्हा विसर्जनासाठी समुद्राकडे मार्गस्थ होतील तेव्हा मंडळांच्या कार्यकर्त्यांची खरी कसोटी लागणार आहे.

समुद्राकडे प्रयाण करताना बाप्पांना तीव्र चढ-उतार असलेले उड्डाणपूल, चिंचोळे रस्ते यांसह ठिकठिकाणी रस्त्यांवरील गतिरोधकांना सामोरे जात मार्गक्रमण करायचे आहे त्यामुळे या ठिकाणी कार्यकर्त्यांना आपल्या उत्साहाचा तोल सावरणे अत्यंत गरजेचे असणार आहे. ज्या परळच्या महाराजाची चर्चा गतवर्षी देशभर झाली त्या गणेशमूर्तीचा दुसऱ्या दिवशी समुद्रावर तोल ढळताना साऱ्या महाराष्ट्राने पाहिले. गेल्यावर्षी लालबागचा राजाला सकाळी समुद्रावर यायला विलंब झाला ज्यामुळे राजाचे विसर्जन लांबले याचे समस्त वृत्तवाहिन्यांवर थेट चित्रिकरण पाहताना एका बाजूला परळचा महाराजा मंडळाची बॅलन्सिंग मूर्ती हळूहळू कलंडताना पाहून मनाला अतीव दुःख होत होते. दुर्दैवाने यंदा अशा अनेक मुर्त्या पाहाव्या लागणार आहेत. गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव आहे देखाव्याचा नव्हे. काहीतरी वेगळे करून लोकांना आकर्षित करणे आणि मंडपातील गर्दी वाढवणे यासाठीच लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरु केला होता का ? ज्या देवाच्या नावाने हा उत्सव साजरा केला जातो त्याला काय आवडते ? त्याच्यासाठी काय केले तर तो आपल्यावर कृपा करेल याचा विचार न करता आपण उत्सवाच्या निमित्ताने उंचच्या मुर्त्या आणून त्यांच्या विटंबनेस कारणीभूत ठरत असू, वर्गणीसाठी लोकांची पिळवणूक करत असू, मिरवणुकीत कर्णकर्कश आवाजात डीजे वाजवून इतरांना त्रास देत असू, मंडपात जागरणाच्या निमित्ताने जुगार खेळत असू तर त्या गणपती बाप्पाची आपल्यावर अवकृपा होण्यास वेळ लागणार नाही!

**- जगन घाणेकर**
मो. ९६६४५५९७८०

## खादीचे खच्चीकरण कितपत योग्य?

देशाच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या राष्ट्रव्यापी आंदोलनात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी खादीच्या कपड्यांचे महत्व अधोरेखित केले होते. खादी हे त्या काळी स्वदेशी आणि भारतीयांच्या स्वावलंबनाचे महाप्रतीक झाले होते. स्वातंत्र्यानंतरदेखील खादीला चांगले दिवस आले होते. आता मात्र खादी केवळ राजकीय पुढाऱ्यांची ओळख होत चालली आहे की काय, अशी शंका निर्माण होत आहे. खादीचे कापड वापरूनच आपला राष्ट्रध्वज तयार केला जात आहे. त्यामुळे खादीविषयी सर्वसामान्यांच्या मनात अतिशय आदर निर्माण झाला होता. मात्र, तसे होऊ शकले नाही. त्यामागची कारणे शोधत बसण्यापेक्षा अद्यापही वेळ गेलेली नाही. शासन पातळीवर खादीला पुनःप्रतिष्ठा मिळवून देण्याचे अभियान राबवले पाहिजे.महाराष्ट्रातील मराठवाडा खादी ग्रामोद्योग संघ, नांदेडला सध्या उतरती कळा लागल्याचे सांगितले जात आहे. या उद्योगामुळे अनेक कारागिरांचा उदरनिर्वाह चालत होता. महाराष्ट्रासह कर्नाटक मध्य प्रदेश,छत्तीसगढ, गुजरात या राज्यातही भारतीय मानक संस्थेने आखून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार राष्ट्रध्वज तयार करणारे फक्त मोजकेच कारागीर उरले असल्याची धक्कादायक बाब आहे. महात्मा गांधीजींनी खादी निर्मितीसाठी चरख्याचे निवडलेले प्रतीक देशाच्या स्वातंत्र्य युद्धासाठी अतिशय मोलाचे ठरले होते. या पार्श्वभूमीवर आजही खादी उद्योगाला शासनाकडून पाठबळ मिळणे काळाची गरज आहे. त्यातून हजारो कारागिरांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो, याचाही विचार होण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

## काँग्रेससमोरील राजकीय आव्हाने

भारतीय राजकारणाच्या पटावर काँग्रेस पक्ष सध्या एका अत्यंत विचित्र आणि आव्हानात्मक वळणावर उभा आहे. एका बाजूला पक्ष सलगच्या निवडणुकीतील पराभवांच्या धक्क्यातून सावरण्याचा आणि आपला गमावलेला जनाधार पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे, तर दुसरीकडे पक्षाचे सर्वोच्च नेते राहुल गांधी यांच्या काही वादग्रस्त वक्तव्यांमुळे आणि राजकीय शैलीमुळे कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जात असल्याचे चित्र निर्माण होत आहे. अशा वेळी विरोधी पक्षाकडून अपेक्षा अशी असते की, त्यांनी या मुद्द्यांवर केवळ सरकारला न घेरता अत्यंत ठोस, अभ्यासू आणि स्पष्ट पर्यायी धोरण देशासमोर मांडायला हवे. लोकशाहीत पक्ष आणि नेते येतात-जातात; परंतु देशातील सामान्य जनतेचे प्रश्न आणि अपेक्षा कायम राहतात. त्यामुळे काँग्रेस पक्षाने केवळ तात्कालिक राजकीय वादांमध्ये किंवा विरोधासाठी विरोध करण्यात न अडकता, वैयक्तिक टीकेच्या पलीकडे जाऊन देशाच्या विकासाचा एक स्पष्ट, विश्वासार्ह आणि अभ्यासू दृष्टिकोन जनतेसमोर ठेवणे हीच काळाची गरज आहे. मुख्य जनहिताच्या मुद्द्यांवर सातत्यपूर्ण अभ्यास, धोरणात्मक स्पष्टता आणि आक्रमक संघटन यांची योग्य सांगड घातली, तरच काँग्रेस पुन्हा एकदा जनतेचा खरा आणि मजबूत पर्याय म्हणून देशाच्या राजकारणात स्वतःचे भक्कम स्थान निर्माण करू शकेल.

**अविनाश देशपांडे**

## जलजीवन योजनेचा फज्जा उडाला

भारतासारख्या कृषीप्रधान आणि विकसनशील देशात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा केवळ एक प्रशासकीय किंवा तांत्रिक मुद्दा राहिलेला नसून तो थेट मानवी हक्काशी आणि सामाजिक न्यायाशी जोडलेला अत्यंत संवेदनशील विषय बनला आहे. स्वातंत्र्याची पंच्याहत्तर वर्षे उलटून गेल्यानंतरही देशातील आणि राज्यांच्या ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांना विशेषतः महिलांना आजही पाण्यासाठी दाही दिशा वणवण भटकंती करावी लागत असेल तर हि अत्यंत लज्जास्पद बाब म्हणावी लागेल भारत सरकारची महत्वकांशी जलजीवन योजना पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिसून येते आहे. यासाठी केंद्र सरकारने कोट्यावधी रुपयांचा चुराडा केला आहे. देशातील जनतेला शुद्ध पिण्याचे पाणी देण्याच्या अनुषंगाने हि योजना राबवली गेली असली तरी प्रत्यक्षात वास्तव वेगळे आहे.आजही काही भागात जेष्ठ नागरिकांना पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ त्यांच्या मनावर आणि शरीरावर मोठा ताण आणणारी आहे. डोक्यावर पाण्याचा हंडा घेऊन मैलोन्मैल चालणाऱ्या महिलांचे चित्र आपल्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे करत नाही का? तर दुसरीकडे आपल्याच देशातील लोकांना पाण्यासाठी वणवण करावी लागते हा विरोधाभास मनाला वेदना देणारा आहे.

**- राजू जाधव,** बेळगांव

सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# घरकुलांच्या मस्टरवर साडेतीन कोटींच्या कथित गैरव्यवहाराचा आरोप!

## १,२०० लाभार्थ्यांच्या मजुरीची रक्कम परस्पर काढल्याचा दावा; त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशीची मनसेची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दारव्हा, दि. २० :** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) तसेच इतर घरकुल योजनेंतर्गत दारव्हा तालुक्यातील लाभार्थ्यांच्या मस्टरच्या रकमेत मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शेतकरी चळवळीच्या वतीने करण्यात आला आहे.

तब्बल १,२०० घरकुल लाभार्थ्यांच्या मस्टरच्या रकमेसंदर्भात तक्रारी असून, या व्यवहाराची अंदाजे साडेतीन कोटी रुपयांची व्याप्ती असल्याचा दावा करण्यात आला आहे. याप्रकरणी मनसेचे दारव्हा तालुकाध्यक्ष लाला पांडे आणि शेतकरी चळवळीचे संयोजक ईश्वर राठोड यांच्या नेतृत्वाखाली १८ सप्टेंबर रोजी पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन देऊन तातडीने स्वतंत्र चौकशीची मागणी करण्यात आली. घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना शासनाकडून घरकुलासाठी विविध टप्प्यांत निधी उपलब्ध करून दिला जातो. त्याचबरोबर घरकुल बांधकामाशी संबंधित अकुशल मजुरीसाठी मनरेगा अंतर्गत रोजगारदिवसांची तरतूद आहे. केंद्राच्या PMAY-G मार्गदर्शक माहितीनुसार घरकुल बांधकामासाठी मनरेगामधून निर्धारित अकुशल श्रमदिवसांची मजुरी देण्याची तरतूद आहे. मात्र, दारव्हा तालुक्यात काही लाभार्थ्यांच्या नावावर मस्टर काढण्यात आल्याचे दाखवून प्रत्यक्षात संबंधित लाभार्थ्यांना पूर्ण रक्कम मिळाली नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. काही लाभार्थ्यांना त्यांच्या नावावर किती दिवसांचे मस्टर काढण्यात आले, किती मजुरी मंजूर झाली आणि रक्कम कोणत्या खात्यात जमा करण्यात आली, याची पुरेशी माहिती मिळत नसल्याची तक्रार असल्याचे निवेदनात नमूद आहे. लाभार्थ्यांच्या खात्यात नेमके किती पैसे जमा झाले? या प्रकरणात सन २०२३ ते २०२६ या कालावधीतील दारव्हा पंचायत समितीअंतर्गत सर्व घरकुल लाभार्थ्यांची गावनिहाय आणि लाभार्थीनिहाय तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### पालकमंत्र्यांकडे थेट दाद

**गरीब घरकुल लाभार्थ्यांच्या हक्काच्या पैशांशी संबंधित हा गंभीर विषय असल्याने पालकमंत्री संजय राठोड यांनी तातडीने दखल घेऊन २०२३ ते २०२६ या कालावधीतील सर्व घरकुल लाभार्थ्यांची प्रत्यक्ष चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, तसेच चौकशीचा अहवाल सार्वजनिक करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.**

**या प्रकरणात आरोपांची सत्यता चौकशीतून स्पष्ट होणार असून, संबंधित मस्टर, बँक व्यवहार आणि अधिकृत शासकीय नोंदींची तपासणी झाल्यानंतरच प्रत्यक्ष आर्थिक अनियमिततेची व्याप्ती निश्चित होऊ शकते.**

**निवेदन देताना पदाधिकारी उपस्थित : पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन देताना नगराध्यक्ष सुनील चिरडे, मनसेचे दारव्हा तालुकाध्यक्ष लाला पांडे, शेतकरी चळवळीचे संयोजक ईश्वर राठोड, मनसे संघटक गुड्डू वजरकर, मनसे शहर उपाध्यक्ष रणजित चव्हाण, राजू वानखेडकर, प्रथमेश उरकुडे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

प्रत्येक लाभार्थ्याच्या नावावर काढण्यात आलेले मस्टर, मस्टरवरील रोजगारदिवस, मंजूर मजुरी, प्रत्यक्ष जमा झालेली रक्कम, बँक व्यवहार, पेमेंटची नोंद आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. लाभार्थ्यांच्या नावावर रक्कम दाखवून ती प्रत्यक्षात लाभार्थ्यांना मिळाली नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधितांकडून रक्कम वसूल करून ती लाभार्थ्यांना देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. स्थानिक यंत्रणेकडून नव्हे, त्रयस्थ पथकाकडून चौकशीची मागणी या प्रकरणाची चौकशी दारव्हा पंचायत समितीच्या स्थानिक यंत्रणेमार्फत न करता जिल्हास्तरावरील स्वतंत्र व त्रयस्थ चौकशी पथकामार्फत करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. चौकशीत अधिकारी, कर्मचारी किंवा अन्य संबंधित व्यक्तींच्या भूमिकेत अनियमितता आढळल्यास शासनाच्या नियमानुसार प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक लाभार्थ्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्याचे म्हणणे नोंदवावे, त्याच्या नावावर मस्टर काढण्यात आले होते का, प्रत्यक्षात किती दिवस काम दाखवण्यात आले, किती मजुरी मंजूर झाली आणि किती रक्कम खात्यात जमा झाली, याची स्वतंत्र पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# सामाजिक कार्याची दखल, रुपेश मोडक यांना ‘महाराष्ट्र रत्न’ पुरस्कार

## धनगर समाज व युवकांच्या प्रश्नांसाठी केलेल्या कार्याचा गौरव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २० :** उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील धनगर समाजाचे युवा नेतृत्व रुपेश मोडक यांना सामाजिक व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ‘महाराष्ट्र रत्न’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथील पत्रकार भवनात आयोजित विशेष सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

रुपेश मोडक हे शिवसेना जिल्हा विद्यार्थी सेनेचे पश्चिम विदर्भ संपर्कप्रमुख म्हणून यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, वाशिम व अकोला जिल्ह्यांत संघटनात्मक कार्य करीत आहेत. विद्यार्थी आणि युवकांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठविण्यासह धनगर समाजाच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम त्यांनी केले आहे. युवकांचे संघटन आणि सामाजिक प्रश्नांवरील सक्रिय भूमिकेमुळे त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. या सन्मान सोहळ्याचे निमंत्रक आंतरराष्ट्रीय मानव अधिकार राजदूत संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष तथा युवा महाराष्ट्र फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अविनाश धनंजय सकुंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. महेश थोरवे, डॉ. आदित्य पतकराव, आनंद यादव, बापूसाहेब भोसले, हेमंत जाधव व रवी अग्रवाल यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पुरस्कारानंतर उमरखेड परिसरात समर्थक व समाजबांधवांकडून रुपेश मोडक यांचे अभिनंदन करण्यात आले.

## थोडक्यात

### पुसद शहरात अनधिकृत बॅनर, होर्डिंग्ज मुळे शहराचे विद्रुपीकरण..!

**लाखोचा टॅक्स बुडीत नगर प्रशासनाने दुर्लक्ष कसे?**



**पुसद:** शहरात गणेशोत्सव,राजकीय कार्यक्रम, शुभेच्छा,वाढदिवस तसेच विविध सार्वजनिक उपक्रमांच्या नावाखाली अनेक भागांत मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बॅनर्स व होर्डिंग्ज लावण्यात येत आहेत. रस्त्यांच्या कडेला, एस.टी.बस स्थानक, मुख्य चौकातील महामानवाच्या पुतळ्याजवळ, विद्युत वितरण कंपनीच्या खांबांवर, पदपथांवर तसेच इमारतींच्या प्रवेशद्वाराजवळ लाकडी व लोखंडी सांगाडे उभारून होर्डिंग्ज लावले जात असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. एखादा सांगाडा कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असतांनाही संबंधित नगरपरिषद यंत्रणेकडून याकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची नागरिकांकडून ओरड सुरू आहे. शहरात सर्वत्र पाहता या बॅनर व्यवसायकांनी नगरपरिषदेचा लाखो रुपये कर बुडवून विनापरवाना बॅनर व होर्डिंग्ज लावण्याचा धडका सुरू केला आहे, या व्यवसायातून लाखोंची मिळकत होत असल्यामुळे या व्यवसायाकडे तरुणाचा मोठा कल असल्याचे दिसून येत आहे.या डिजिटल बॅनर व्यवसायामधुन लावणाऱ्या तरुणामध्ये गटबाजी तयार होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे. काही बॅनर व्यवसायिक नगरपरिषद मधील कर्मचाऱ्यांना हाताशी धरून त्यांना चिरीमिरी देऊन विनापरवानगी अवैधपणे बॅनर होर्डिंग्ज लावत असल्याचेही शहरात जोरदार चर्चा सुरू आहे त्यामुळे यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केल्या जात नाही असे सुज्ञ नागरिकांचे मत आहे. पुसद नगरपरिषद मध्ये काही केलेल्या डिजिटल बॅनर कामाच्या (देयक)बिल मध्ये बराच घोळ असल्याचे बोगस बिल काढण्याचा सपाटा सुरू असल्याबाबत उघडपणे सांगण्यात येत आहे, शहरात या बॅनर मुळे अनेक ठिकाणच्या मुख्य रस्त्यावर असलेल्या बॅनर होर्डिंग्जमुळे नागरिकांचे लक्ष विचलित होऊन अपघाताचे प्रमाण सुद्धा वाढले आहे, महाराष्ट्रात मोठ मोठ्या शहरात लावलेले डिजिटल बॅनर व होर्डिंग्ज रस्त्यावर कोसळल्यामुळे अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. तोच प्रकार पुनश्च पुसद शहरात घडू नये याची खबरदारी म्हणून अशा जिवितहाणी होणाऱ्या नागरिकांच्या प्रश्नावर त्वरित शासन व प्रशासनाने कडक नियम करून या अनाधिकृत लावण्यात येत असलेल्या डिजिटल बॅनर, होर्डिंग्जवर प्रतिबंध घालावे असे काही सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त केले आहे. त्यामुळे नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी शहरात अनाधिकृत विनापरवानगी नगरपरिषेचा कर बुडून लागत असलेल्या अवैध बॅनर व होर्डिंग्जवर कारवाई करून जप्त करण्यात यावे अशी शहरातील सुज्ञ नागरिकांची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### अभियंता दिनाला सामाजिक उपक्रमांची जोड, ज्येष्ठ कंत्राटदारांचा सन्मान

**रेनवॉटर हार्वेस्टिंग जनजागृती व गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव..**



**पुसद :** अभियंता दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीची जोड देत विश्वेश्वरया इंजिनिअर्स अँड आर्किटेक्ट असोसिएशन, पुसदच्या वतीने अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. गणोबा मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात रेनवॉटर हार्वेस्टिंग जनजागृती, आरोग्य तपासणी, रक्तदान, ज्येष्ठ कंत्राटदारांचा सन्मान आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अ‍ॅड. निलय नाईक होते. प्रमुख पाहुणे म्हणून डीवायएसपी अमर मोहिते, कार्यकारी अभियंता महेश माथुरकर, असोसिएशनचे अध्यक्ष सय्यद अन्वर अली आणि सचिव गजानन देशमुख उपस्थित होते. दीपप्रज्वलन व भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरया यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. असोसिएशनकडून मागील १२ वर्षांपासून अभियंता दिनानिमित्त सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. यंदा पाणी बचतीसाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग जनजागृती व्हिडिओ तयार करून शहरात प्रसारित करण्यात आला. नागरिकांना या विषयावर मोफत मार्गदर्शन देण्याची ग्वाही अध्यक्ष सय्यद अन्वर अली यांनी दिली. यावेळी त्यांनी वर्षभरातील सामाजिक व संघटनात्मक कामांचा आढावाही मांडला. कार्यक्रमात सिया वैभव बजाज, आयुष योगेश पांडे, सार्थक राजेश पालिकोंडावार आणि स्वानंद स्वप्नील चिंतामणी या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अभियंता क्षेत्रातून नगरसेवक म्हणून निवडून आलेले सुरेंद्र कोडगीरवार, मझहर खान पठाण आणि ऐश्वर्या निखिल बोरकर यांचा सन्मान करण्यात आला. पुसदच्या बांधकाम क्षेत्राला दिशा देणाऱ्या ज्येष्ठ निवृत्त कंत्राटदारांचाही शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. डीवायएसपी अमर मोहिते यांनी सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले, तर कार्यकारी अभियंता महेश माथुरकर यांनी अभियंते व कंत्राटदारांमधील समन्वयातून दर्जेदार कामाचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय मनोगतात अ‍ॅड. निलय नाईक यांनी ज्येष्ठ कंत्राटदारांच्या योगदानाचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरगुलवार व राजेश पालिकोंडावार यांनी केले. आभार गजानन देशमुख यांनी मानले. अल्ट्राटेक सिमेंट कार्यक्रमाचे प्रायोजक होते.

# पुर प्रतिबंधक बांधाची जेसीबीने विल्हेवाट, पुसद शहराच्या सुरक्षेचा प्रश्न

## बाबासाहेब मुखरे यांनी श्रमदानातून उभारलेल्या बांधाचे अस्तित्व धोक्यात..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २० :** पुसद शहराला पूस नदीच्या पुराच्या पाण्यापासून संरक्षण मिळावे, यासाठी बाबासाहेब मुखरे यांनी १९५२ मध्ये अथक परिश्रम व श्रमदानातून उभारलेला ऐतिहासिक पुरप्रतिबंधक बांध सध्या जेसीबीच्या घावांनी उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.

गेल्या आठ दिवसांपासून बांधाला जेसीबीच्या साहाय्याने कोरण्याचे काम सुरू असल्याचा आरोप होत असून, शहराच्या सुरक्षेसाठी उभारलेल्या या बांधाची अशा पद्धतीने विल्हेवाट लावण्यास परवानगी कुणी दिली, असा गंभीर प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पूस नदीच्या पुरापासून पुसद शहराचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने उभारण्यात आलेला हा बांध मजबूत असल्याचे सांगितले जाते. मात्र, सध्या सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामादरम्यान जेसीबीच्या माध्यमातून बांधाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात असल्याचे चित्र आहे. संबंधित विभागाने किंवा पुलाच्या बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराने बांधाचा भाग फोडण्यासाठी अधिकृत परवानगी घेतली आहे का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. परवानगीशिवाय हे काम सुरू असल्यास संबंधितांवर कारवाई कोण करणार, असा सवाल उपस्थित होत आहे. काही काळापूर्वी राजकीय हस्तक्षेपातून या पुरप्रतिबंधक बांधाचा काही भाग फोडून एका विशिष्ट वस्तीला रस्ता उपलब्ध करून देण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यानंतर बांधाला अतिक्रमणाचे ग्रहण लागल्याचे बोलले जाते. आता पुलाच्या बांधकामाच्या निमित्ताने बांधाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला असताना नगरपरिषद प्रशासनाकडून याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही होत आहे. शहराच्या सुरक्षेशी संबंधित असलेल्या या बांधाची देखभाल व संरक्षण करण्याची जबाबदारी कोणाची, याचे उत्तर प्रशासनाने देणे आवश्यक आहे. पुरप्रतिबंधक बांधाचे नुकसान झाल्यास भविष्यात पूस नदीच्या पुराचे पाणी शहरात शिरण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे. बांधावर सुरू असलेल्या जेसीबीच्या कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे विचारणा केली असता, दोन्ही विभागांनी आपली जबाबदारी झटकल्याचा दावा करण्यात येत आहे. परिणामी, बांध फोडण्याचे काम नेमके कोणाच्या आदेशाने सुरू आहे आणि त्याची जबाबदारी कोणाकडे आहे, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सदर रस्ता राज्यमार्ग असून, पूस नदीच्या तीरावर पुलाचे बांधकाम सुरू आहे. हे बांधकाम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने दररोज छोटे-मोठे अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मागील चार वर्षांपासून सुरू असलेले पुलाचे बांधकाम अद्याप पूर्ण झाले नसल्याने, आणखी किती काळ नागरिकांना या समस्यांना सामोरे जावे लागणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# पावसाच्या खंडाने शेतकरी संकटात,भरीव मदतीचे कृषिमंत्र्यांचे आश्वासन!



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

### फेक दुष्काळ यादीविरोधात कठोर कारवाईचा इशारा

**समाजमाध्यमांवर दुष्काळग्रस्त तालुक्यांची खोटी यादी प्रसारित करण्यात आली असून, शासनाने अद्याप अशी कोणतीही यादी जाहीर केलेली नाही, असे कृषिमंत्री भरणे यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.**

**यवतमाळ, दि. २० :** एल निनोच्या संकटामुळे पावसात पडलेला खंड, असमान पर्जन्यमान आणि पिकांचे नुकसान यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शासन शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी असून, नुकसानग्रस्तांना भरीव मदत करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात अमरावती विभागासह यवतमाळ जिल्ह्यातील पीक परिस्थितीचा आढावा घेताना त्यांनी सरकारी यंत्रणांना शेतकऱ्यांच्या समस्या संवेदनशीलतेने सोडविण्याचे निर्देश दिले. या बैठकीला कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्यासह विभागीय आयुक्त नयना गुंडे, कृषी आयुक्त परिमल सिंह, खासदार, आमदार, पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्यासह काही पदाधिकारी ऑनलाइन सहभागी झाले. बैठकीत पाचही जिल्ह्यांतील ५६ तालुक्यांमधील पर्जन्यमान, पावसातील खंड, पीकस्थिती, पिण्याचे पाणी आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला. सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद या पिकांवर परिणाम झाल्याचे कृषिमंत्र्यांनी नमूद केले. मुदतपूर्व पीक पाहणी वेळेत पूर्ण करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना राबविण्यात येत असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकित कर्जधारकांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी देण्याची माहिती बैठकीत देण्यात आली. महावितरणकडून ट्रान्सफॉर्मर वेळेत मिळत नसल्याने सिंचनासाठी वीजपुरवठा खंडित होत असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी केली. नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर तातडीने दुरुस्त करावेत, निरंतर योजनेतून नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून द्यावेत आणि उघड्या, धोकादायक डीपींबाबत तत्काळ उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले.

# शिक्षण, स्वाभिमान अन् आरक्षणाची जाणीव, ‘सावित्रीच्या लेकीं’नी पाहिला जयंती-२!

## पारधी समाजातील मुलींच्या डोळ्यांत अश्रू, तर काहींना आरक्षणाचा अर्थ उमगला

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २० :** रानावनात भटकंती, पारधी बेड्यांवरील अस्थिर जीवन आणि शिक्षणापासून वंचित राहण्याच्या परिस्थितीवर मात करीत स्वाभिमानाने उभ्या राहणाऱ्या पारधी समाजातील ‘आम्ही सावित्रीच्या लेकी’ आश्रयालयाच्या मुलींनी यवतमाळच्या सरोज टॉकीजमध्ये ‘जयंती-२’ चित्रपटाचा अनुभव घेतला. सामाजिक न्याय, शिक्षण, आरक्षण आणि महापुरुषांच्या विचारांचा संदेश देणारा हा चित्रपट मुलींसाठी केवळ मनोरंजन न ठरता, त्यांच्या संघर्षाचे प्रतिबिंब ठरला.

सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षक इशू माळवे आणि पपीता माळवे यांनी पारधी समाजातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध बेड्यांवर जाऊन पालकांशी संवाद साधला. ‘तुमची मुले आमच्याकडे द्या; आम्ही त्यांना सावित्रीच्या लेकी बनवू,’ या विश्वासातून उभ्या राहिलेल्या आश्रयालयाने अनेक मुलींना शिक्षण आणि सुरक्षित भवितव्याची दिशा दिली. समता पर्व प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून चित्रपटाचे आयोजन करण्यात आले. पडद्यावर जातीय भेदभाव, शिक्षणासाठीचा संघर्ष आणि सामाजिक हक्कांचे प्रश्न उलगडताना काही मुलींच्या डोळ्यांत अश्रू तरळले. आरक्षणाची गरज, महापुरुषांचा संघर्ष आणि संविधानिक हक्क याबाबत काही मुलींना नव्याने समज मिळाली. दरम्यान, पारधी समाजातील मुलांच्या पुनर्वसनासाठी प्रा. अंकुश वाकडे यांच्यासह विविध कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रयत्नांतून अकोला मुकिंदपूर येथील १८ मुलांसाठी शिक्षण व पुनर्वसनाचा मार्ग खुला झाला असून, त्यापैकी ११ जणांना रोजगाराच्या प्रवाहात आणण्यात यश आले आहे. ‘आता आपली लढाई आपल्यालाच लढावी लागणार’, हा संदेश मुलींच्या मनावर ठसला. भिकेच्या कटोरीऐवजी शिक्षण, स्वाभिमान आणि हक्कांची भाषा बोलणाऱ्या या मुलींचा चित्रपटगृहातील अनुभव सामाजिक परिवर्तनाची आशादायी कहाणी ठरला.

# न्यायालयीन आदेश कागदावरच,वाढीव मोबदल्यासाठी शेतकऱ्यांची फरफट!

## मुख्यमंत्र्यांकडे निवेदन, बावनकुळेंचे कार्यवाहीचे निर्देश,तरीही मृद व जलसंधारण विभागाकडून दिरंगाईचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे



**यवतमाळ, दि. २० :** न्यायालयाने वाढीव मोबदला देण्याचे आदेश देऊनही संबंधित शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळत नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करण्याऐवजी संबंधित विभागाकडून वेळकाढूपणाची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप होत असून, यामुळे बाधित शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणात शासनस्तरावर निवेदने व कार्यवाहीचे निर्देश देऊनही प्रत्यक्ष न्याय मिळत नसल्याने मृद व जलसंधारण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नेर तालुक्यातील मौजा वाळकी येथील लघु प्रकल्पासाठी सन २००५ मध्ये काही शेतकऱ्यांची जमीन लघु सिंचन विभाग, वर्क क्र. १, यवतमाळ यांच्यामार्फत संपादित करण्यात आली. वाढीव मोबदल्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी सन २०१२ मध्ये न्यायालयात LAC No. ९२०/२०१२ प्रकरण दाखल केले होते. या प्रकरणात EXH No. ३२ अन्वये ८ ऑगस्ट २०१८ रोजी न्यायालयाने वाढीव मोबदला देण्याचे आदेश दिल्याचे निवेदनातून स्पष्ट होते. मात्र, आदेशाला अनेक वर्षे उलटूनही मोबदल्याची रक्कम मिळाली नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर १६ मार्च २०२६ रोजी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन सादर करून न्यायालयीन आदेशानुसार तातडीने मोबदला देण्याची मागणी करण्यात आली. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १ मे २०२६ रोजी संबंधित निवेदनावर नियमोचित कार्यवाही व सहकार्य करण्याबाबत पत्र दिले. या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी यवतमाळ तसेच मृद व जलसंधारण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत. मात्र शासनस्तरावरील पत्रव्यवहारानंतरही शेतकऱ्यांना प्रत्यक्ष न्याय मिळत नसल्याचा आरोप कायम आहे. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री नामदार संजय राठोड यांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा मागवावा आणि आपल्या मतदारसंघातील नेर तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी पुढे येत आहे. अन्यथा संबंधित शेतकरी संघटना व सामाजिक संघटनांकडून आंदोलन छेडून हा प्रश्न मंत्रालयापर्यंत नेण्याची भूमिका घेतली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी, मोबदला वितरणातील विलंबाची कारणे आणि जबाबदारी निश्चित करण्याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करणे आवश्यक ठरणार आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, अवधूतवाडी व यवतमाळ शहरातील गुन्हे उघडकीस

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. २० :** शहरातील वाढत्या घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली असताना, स्थानिक गुन्हे शाखेने दोन घरफोडीच्या गुन्ह्यांचा छडा लावला आहे. या कारवाईत दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना निष्पन्न करून त्यांच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोकड, लॅपटॉप व चार्जरसह एकूण १ लाख १८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

यवतमाळ शहरातील घरफोडी व जबरी चोरीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास करून ते उघडकीस आणण्याचे आदेश पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अ गस्त व तपास करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले. पंचांसमक्ष केलेल्या अंगझडतीत एका बालकाकडून सोन्या-चांदीचे दागिने व ८ हजार रुपयांची रोकड, असा एकूण ११ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. तर दुसऱ्या बालकाकडे असलेल्या बॅगेत लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप, चार्जर व ४९ हजार ६०० रुपयांची रोकड आढळून आली. या मुद्देमालाची एकूण किंमत ९९ हजार ६०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत पोलीस ठाणे अवधूतवाडी व पोलीस ठाणे यवतमाळ शहर येथील प्रत्येकी एक, अशा दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल संबंधित गुन्ह्यांतील चोरीचा असल्याचे पोलिसांच्या तपासातून निष्पन्न झाले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष गावंडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन राजमल्लू, पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे तसेच पोलीस अंमलदार अजय डोळे, प्रशांत हेडाऊ, रूपेश पाली, योगेश डगवार, निलेश राठोड, सुनील पैठणे, आकाश सूर्यवंशी, देवेंद्र होले व प्रतीक नेवरे यांनी पार पाडली.

# ‘माना’ जातीला ओबीसी त दाखविण्याचा दावा चुकीचा..!

## प्रा. डॉ. भगवान नन्नावरे यांची पत्रकार परिषदेतून भूमिका, माजी आमदार व आमदारांचा पत्रव्यवहार मागे घेण्याचे मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २० :** ‘माना’ जमातीला इतर मागासवर्गीय (ओबीसी) यादीतील अनुक्रमांक २६८ मध्ये पूर्ववत समाविष्ट करण्याची मागणी चुकीच्या वस्तुस्थितीवर आधारित असल्याचा दावा करीत, संबंधित पत्रव्यवहार तात्काळ मागे घेण्याची मागणी प्रा. डॉ. भगवान विठुजी नन्नावरे यांनी केली.

माजी आमदार प्रा. वसंत पुरके आणि आमदार राजू तोडसाम यांनी शासनाकडे केलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही भूमिका मांडली. प्रा. नन्नावरे यांच्या मते, ‘माना’ जमातीला राष्ट्रपतींच्या अधिसूचनेनुसार अनुसूचित जमातीचा (एसटी) घटनात्मक दर्जा प्राप्त असून, महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या यादीत तिचा अनुक्रमांक १८ आहे. संविधानाच्या अनुच्छेद ३४२ नुसार अनुसूचित जमातींच्या यादीत बदल करण्याचा अधिकार संसदेला आहे. त्यामुळे राज्यस्तरीय यंत्रणांच्या माध्यमातून या वैधानिक दर्जाबाबत संभ्रम निर्माण होऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले. मंडल आयोगाच्या मूळ यादीत अनुक्रमांक १५४ तसेच ९ ऑगस्ट १९९५ च्या अधिकृत ओबीसी यादीत अनुक्रमांक २६८ वर ‘मागा’ अशी नोंद आहे, ‘माना’ अशी नोंद नाही, असा दावा पत्रकार परिषदेत करण्यात आला. त्यामुळे नाम साधर्म्याच्या आधारे ‘मागा’ आणि अनुसूचित जमातीतील ‘माना’ यांचा संबंध जोडणे अयोग्य असल्याचे नन्नावरे यांनी सांगितले. तसेच, १३ ऑक्टोबर १९६७ रोजीच्या कथित ३३९ जातींच्या यादीबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. संबंधित यादी अधिकृत अभिलेखांनुसार १८० जातींची असल्याचा दावा करीत, शासनाने दस्तऐवजांची पडताळणी करून आवश्यक शुद्धिपत्रक काढावे, अशी मागणी करण्यात आली. माना जमातीच्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी चुकीच्या तक्रारी व पत्रव्यवहारा विरोधात कायदेशीर कार्यवाही करण्याचा इशाराही देण्यात आला. पत्रकार परिषदेला विठ्ठल राऊत, विष्णू नारनवरे, दिनेश दांडेकर, प्रा. सुहानंद ढोणे, ओम शेंडे, नंदकिशोर चौधरी यांच्यासह विविध प्रतिनिधी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## टाकरखेडा संभू गणेश दर्शन




नेताजी गणेश उत्सव मंडल टाकरखेड़ा शंभू, वर्ष ६५



आदर्श मंडळ गणेश मंड्ळ, वर्ष ३०



अंकुर गणेश उत्सव मंडळ , वर्ष २२



बाल गणेश मंडळ, वर्ष २४



नवरंग गणेशोत्सव मंडळ वर्ष ३५



श्रीराम गणेशोत्सव मंडळ, वर्ष १८

# आधीच पेरणी क्षेत्र घटले, आता उत्पादनही घटणार

## जिल्ह्यात सोयाबीनची बिकट अवस्था, ३५ ते ४० दिवसांपासून पावसाचा खंड

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात सोयाबीनची अवस्था बिकट झाली आहे. आधीच पावसाच्या विलंबामुळे पेरणी क्षेत्र तब्बल ४० हजार हेक्टरने घटले असताना त्यात आता पावसाचा मोठा खंड निर्माण झाला आहे. त्यामुळे सोयाबीन पिके मरणावस्थेत असून उवरीत पिकांमध्ये तब्बल ३० ते ४० टक्क्यांवर घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

जिल्ह्यात मागील तीन वर्षांपासून सोयाबीनकरिता अनुकूल वातावरण निर्माण होत नसल्याने यंदा शेतकऱ्यांनी सोयाबिला दुसरी पसंती देत पेरणी क्षेत्र घटविले आहे. मागील वर्षी अडीच लाख हेक्टरवर पेरणी असलेले सोयाबीनचे क्षेत्र यंदा २ लाख ९ हजार हेक्टरच आले आहे. सुमारे ४० हजार हेक्टर पेरणी क्षेत्र घटले आहे. त्यापैकी सुमारे ७ ते ८ हजार हेक्टरवरील सोयाबीन उगवलेच नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या होत्या. बियाण्याच्या संकटातून शेतकरी सावरत नाही तोच पावसाने पाठ फिरविल्याने संकट अधिक गडद झाले. दरम्यान, १० आणि ११ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील बहुतांश भागात पावसाने हजेरी लावली.



या पावसाचा भारी जमिनीतील सोयाबीनला काही प्रमाणात फायदा झाला. मात्र, हलक्या जमिनीतील तसेच सिंचनाची सुविधा नसलेल्या शेतांमधील पिकाला त्याचा फारसा लाभझाला नाही. सिंचनाची सोय असलेल्या शेतकऱ्यांनी पाणी देऊन पीक वाचविण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांनाही अपेक्षित उत्पादन मिळण्याची शक्यता कमी असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

सोयाबीनच्या फुलोऱ्याचे शेंगांमध्ये रूपांतर होण्याच्या काळात जमिनीत पुरेसा ओलावा असणे अत्यंत महत्त्वाचे असते.याच कालावधीत पावसाचा मोठा खंड पडल्याने अनेक ठिकाणी फुलगळ झाली. त्यामुळे उत्पादनावर थेट परिणाम होणार असल्याचे तज्ञांकडून सांगितले जात आहे. परिणामी, जिल्ह्यात सोयाबीनच्या उत्पादनात किमान ३० ते ४० टक्के घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.सोबतच कापसामध्ये देखील २० ते २५ टक्के घट होण्याची शक्यता आहे.

## तलाठी कार्यालयाच्या इमारतीसाठी निधीची मागणी

## माजी उपसरपंच प्रदीप शेंडे यांचे महसूल मंत्र्यांना निवेदन

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभू तलाठी कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी माजी उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे नागपूर येथील कार्यालयात जावून केली आहे. टाकरखेडा संभू हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून तलाठी कार्यालयातील कामकाजासाठी सध्या पुरेशी व स्वतंत्र इमारत उपलब्ध नाही. त्यामुळे ग्रामस्थ, शेतकरी तसेच विविध कामांसाठी येथे येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. ग्रामसभेने नवीन ग्रामपंचायत इमारतीसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. सादर जागेवर



इमारत उभारण्यासाठी आवश्यक अंदाजपत्रक तहसीलदार,भातकुली यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सादर करण्यात आले आहे. मात्र, इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध नसल्याने काम रखडले आहे. याकरिता प्रदीप शेंडे यांनी जिल्हाधिकारी, आमदार, खासदार यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. तसेच पालकमंत्री यांना देखील निधी उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन दिले आहे.त्यानंतरही याची दखल घेतल्या गेली नाही. अखेर महसूलमंत्री बावनकुळे यांना पून्हा नागपूर येथे जावुन प्रदीप शेंडे यांनी संबंधित विभागाला आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. नवीन इमारत उभारल्यास तलाठी कार्यालयाचे प्रशासकीय कामकाज अधिक सुरळीत होऊन ग्रामस्थांची गैरसोय दूर होण्यास मदत होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## आष्टी बसथांब्यावर अंधार; रात्रीच्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

परतवाडा-अमरावती या मुख्य मार्गावरील आष्टी बसथांब्यावर गेल्या १५ ते २० दिवसांपासून पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे या बसथांब्यावर ये-जा करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, विशेषतः महिला प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आष्टी, हातखेळा, टाकरखेडा संभू, देवरी निपाणी, अनकवाड़ी, परिसरातील अनेक नागरिक नोकरी किंवा व्यवसायानिमित्त बाहेरगावी ये-जा करतात. रात्री उशिरा काम आटोपून परतणाऱ्या प्रवाशांना बसथांब्यावर उतरावे लागते.मात्र, परिसरात पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्याने अंधारात रस्त्यावरून मार्ग काढताना भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. महिला प्रवाशांसाठी तर हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. संबंधित विभागाने तातडीने पथदिवे सुरू करून व प्रवासी निवारा दुरुस्ती करून व स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

### प्रवासी निवाऱ्याचीही दुरवस्था

बसथांब्यावर प्रवाशांसाठी असलेल्या सुविधांचीही दुरवस्था झाली आहे. पाऊस व उन्हापासून बचाव करण्यासाठी पुरेसा प्रवासी निवारा नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. त्यातच स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नसल्याने विशेषतः महिला प्रवाशांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.परतवाडा-अमरावतीसारख्या प्रमुख मार्गावरील हा बसथांबा असूनही मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

## ऋतुराज वाढोडकर बॉक्सिंगमध्ये विभागीय स्तरावर

**अमरावती**-प्रसिद्ध नारायणा विद्यालयमच्या ऋतुराज वाठोडकर याने बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय स्तरावर धडक मारली आहे. अमरावती येथील क्रीडा संकुलात झालेल्या जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत ५५ किलो वजन गटात ऋतुराजने सुवर्णपदक पटकावले.या दमदार कामगिरीमुळे आगामी विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी ऋतुराज वाठोडकर अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्याच्या या यशाबद्दल नारायणा विद्यालयमचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. ऋतुराजच्या यशामागे त्याचे प्रशिक्षक, शिक्षक तसेच वडिलअमित सू.वाठोडकर व आई जोशना अ.वाठोळकर मार्गदर्शन आणि मेहनत महत्त्वाची ठरली. त्याच्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.ऋतुराजच्या पुढील विभागीय स्पर्धेतील यशासाठी सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या आहे.



## जुगार अड्ड्यावर वलगाव पोलिसांची धाड; दोघे ताब्यात

### १ लाख २ हजारांचा मुद्देमाल जप्त; १० ते १२ जण अंधाराचा फायदा घेत पसार

**टाकरखेड़ा संभू/वार्ताहर**

साऊर येथील शिवाजी चौक परिसरात गणेश मंडळामागे कापडी कनातीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर वलगाव पोलिसांनी पहाटेच्या सुमारास कारवाई केली. या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून रोख रक्कम, दुचाकी व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख २ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांना २० सप्टेंबर रोजी रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास साहूर परिसरात अवैध जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पंचांसह पोलिसांचे पथक शिवाजी चौकातील गणेश मंडळामागे पोहोचले. तेथे कापडी कनातीत काही जण जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांची चाहूल लागताच सुमारे १० ते १२ जण अंधाराचा व गल्लीबोळीचा फायदा घेत पसार झाले. या कारवाईत मनोज प्रल्हाद आमटे (४७, रा. प्लॉटजवळ, साहूर) आणि उदय हिमचंद बोंडे (४४, रा. चक्की चौक, साहूर) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून १,३०० रोख, टीव्हीएस कंपनीची ज्युपिटर १२५ दुचाकी (एमएच २७-डीआर-२१६१), जुगाराचे साहित्य, सीलबंद पत्त्यांची १० पाकिटे, काही खुले पत्ते व प्लास्टिक कॅन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. रात्री १ ते २.१० वाजेदरम्यान ही कारवाई करण्यात आली. ताब्यात घेतलेल्या तसेच फरार झालेल्या व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये कारवाई करण्यात येत आहे. पोलीस आयुक्त पोलीस उपायुक्त परी-१ यशवंत सोळंके आणि सहाय्यक पोलीस आयुक्त गाडगेनगर निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रिता उईके यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक आकाश वाठोरे, हेड कॉन्स्टेबल इशय खांडे, अझहर शेख, पंकज येवले व सोमनाथ घोलप यांच्या पथकाने ही कारवाई केली.



### ओझोन दिन वृक्षारोपणाने साजरा

**चांदुर रेल्वे**-राजर्षी शाहू सायन्स कॉलेज चांदुर रेल्वे येथे सिग्नेचर क्लबद्वारे आंतरराष्ट्रीय ओझोन दिन वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी. आर. वडनेरकर यांच्या शुभहस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी आय.क्यू.ए.सी.कॉर्डिनेटर प्रा. सुरेंद्र वाणी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. डॉ. जी.बी. संतापे समन्वयक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाचे आयोजन सिग्नेचर क्लबचे समन्वयक डॉ. जी.बी. संतापे व सह समन्वयक डॉ.एस.पी.पाथरकर यांनी केले.

## संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्थेद्वारे शालोपयोगी वस्तूंचे वाटप



**अमरावती**-'संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्था, अमरावती' यांच्या वतीने गणेशोत्सवाचे औचित्य साधून महाजनपुरा परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शालोपयोगी वस्तू वाटप कार्यक्रम आणि 'ज्ञानसाधना मासिक सराव चाचणी क्र. २' चे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. हा विशेष उपक्रम महाजनपुरा येथील गजानन महाराज मंदिरात पार पडला.सर्व विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तू म्हणून प्रत्येकी एक रजिस्टर आणि एक आकर्षक स्टेशनरी पाउच वाटप करण्यात आले.संस्थेचे सचिव प्रा. रुपेश पद्माकर नांदुरकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने हा सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला मदत व्हावी, या उद्देशाने गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ही संस्था आपल्या परिसरात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी दर शनिवारी शैक्षणिक व्याख्यानांचे आयोजन करते. या व्याख्यानांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले जाते, ज्यामुळे त्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडत आहे. तसेच दरमहा या शिकवलेल्या विषयांवर आधारित एका चाचणीचे आयोजन केले जाते आणि त्यामध्ये उत्तीर्ण होणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना विशेष बक्षीस देऊन गौरवले जाते. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्याकरिता संस्थेचे अध्यक्ष शुभम सावरकर यांच्या नेतृत्वाखाली मुकेश बोरकर, कुणाल नांदुरकर, मनोज विजयकर, नयन विजयकर, आयुष सावरकर, धनराज नांदुरकर, चेतन नांदुरकर, अतुल बोरकर,जय सावरकर, विकी गायकवाड, सागर बोरकर आदींनी विशेष सहकार्य केले. संस्थेच्या या स्तुत्य व शैक्षणिक उपक्रमाचे महाजनपुरा परिसरातील नागरिकांनी व पालकांनी मनःपूर्वक कौतुक केले.

## चिखलदऱ्याची कॉफी पुन्हा चर्चेत; रोजगार आणि पर्यटनाला मिळू शकते नवी दिशा

## ब्रिटिशकालीन कॉफी बाग आजही देत आहे उत्पादन; आदिवासी युवकांना रोजगाराची संधी

**मेळघाट/वार्ताहर**

महाराष्ट्रात कॉफीचे उत्पादन होते आणि तेही विदर्भातील चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणी, ही बाब अनेकांसाठी आजही आश्चर्याची आहे. मात्र, ब्रिटिशकालापासून चिखलदऱ्यात अस्तित्वात असलेल्या कॉफीच्या बागा आजही या परिसराची वेगळी ओळख कायम ठेवून आहेत. शासनाचे अधिक लक्ष आणि नियोजनबद्ध प्रयत्न झाल्यास या कॉफी लागवडीचा विस्तार होऊन स्थानिक आदिवासी युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

विदर्भातील उष्ण वातावरणापासून सुटका मिळविण्यासाठी ब्रिटिश अधिकारी चिखलदऱ्याकडे आकर्षित झाले. येथील थंड आणि पोषक हवामान कॉफी लागवडीसाठी अनुकूल असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी येथे कॉफीची लागवड सुरू केली. ब्रिटिशकालीन अधिकारी रॉबिन्स यांनी सन १८३५ मध्ये चिखलदऱ्यात सुमारे १०० ते १५० हेक्टर परिसरात कॉफीची लागवड केल्याचा उल्लेख आढळतो. या बागेतील उत्पादनाची परंपरा आजही सुरू आहे.



कॉफीची झाडे थेट कडक उन्हात चांगली वाढत नाहीत. त्यामुळे मोठ्या झाडांच्या सावलीत त्यांची लागवड केली जाते. चिखलदऱ्यातील कॉफी बागांमध्ये आंबा, वड तसेच विविध सदाहरित वृक्षांच्या सावलीखाली कॉफीची झाडे वाढताना दिसतात. सध्या या झाडांना लालबुंद फळे लागली असून, पर्यटकांचे लक्ष या बागांकडे वेधले जात आहे.विशेष म्हणजे, ब्रिटिशांनी सुरू केलेल्या या कॉफी बागेमुळे आजही परिसरातील आदिवासी युवकांना रोजगार मिळत आहे. त्यामुळे कॉफी उत्पादन केवळ शेतीपुरते मर्यादित न राहता स्थानिक रोजगार, पर्यटन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे माध्यम ठरू शकते. चिखलदऱ्यातील कॉफीचा उल्लेख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमातही केला आहे. त्यामुळे या वैशिष्ट्यपूर्ण कॉफी उत्पादनाकडे राज्य शासन आणि संबंधित विभागांनी अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. कॉफी लागवडीचा विस्तार, शेतकऱ्यांना मार्गदर्शन, प्रक्रिया केंद्रे, बाजारपेठ आणि पर्यटनाशी जोडणी यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न झाल्यास चिखलदऱ्याच्या कॉफीला स्वतंत्र ओळख मिळू शकते. आज लालबुंद कॉफी फळांनी बहरलेल्या या बागा पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. 'मेळघाटची कॉफी' ही केवळ ऐतिहासिक आठवण न राहता भविष्यात रोजगार आणि पर्यटनाचे नवे केंद्र बनू शकते, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात 'सेवा संकल्प' अभियानाचा जागर

**दर्यापूर**-विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले जात व उत्पन्न प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना सुलभतेने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय,अमरावती,तहसील कार्यालय दर्यापूर आणि पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे तालुकास्तरीय शिबीर घेण्यात आले.



तहसीलदार डॉ. रवींद्रकुमार कानडजे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात समाज कल्याण निरीक्षक रवींद्र माहुलकर यांनी विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती देत आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी नंदकुमार जाधव यांनी विद्यार्थ्यांनी उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले.शिबिराच्या आयोजनासाठी आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मनोज देशमुख यांच्यासह तहसील कार्यालयातील तलाठी पूजा चेंडीकापूरे, अंजली वसु, आकांक्षा ढोके तसेच महसूल सेवक अमोल नवलकर व गजानन आमझरे यांनी विशेष सहकार्य केले.

दरम्यान, तालुक्यातील सेतू संचालक व तालुकाध्यक्ष सत्यपाल इंगळे यांच्यासह सचिन देशमुख, सुमित होले, शैलेंद्र दुधंडे व प्रणव पतिंगे यांनी विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र काढण्याच्या प्रक्रियेत सहकार्य केले.त्यामुळे शिष्यवृत्तीसाठी आवश्यक प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांसह पालकांची होणारी धावपळ कमी झाली.शिबिरास तालुक्यातील विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. प्रशासनाच्या विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली.शिबिराचे संचलन व आभार गटसमन्वयक सुनील स्वर्गीय यांनी केले.



### एकवीरा पतसंस्थेची वार्षिक सभा

**अंजनगाव सुर्जी**-येथील एकवीरा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अंजनगाव सुर्जी (र. नं. ४८४, जि. अमरावती) या संस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे मुख्य कार्यालय अंजनगाव सुर्जी येथे अध्यक्ष मधुसुदनजी गुजर यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या प्रारंभी एकवीरा देवीच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष, संचालक व सरव्यवस्थापक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरव्यवस्थापक नितीन बंड यांनी वार्षिक अहवाल व विषयसूचीचे वाचन केले. अहवाल वाचनात संस्थेचे वसूल भागभांडवल, स्वनिधी, कर्ज वाटप क्षमता, कर्ज वसुली व ठेवी यांचा वाढता आलेख सभेपुढे मांडण्यात आला. संस्थेची थकबाकी कमी झाल्याचे नमूद करीत कर्जदार सभासदांनी नियमित कर्ज भरणा करावा, अशी विनंती यावेळी करण्यात आली. सभासदांचा संस्थेवर दृढ विश्वास असल्यामुळेच संस्थेला प्रगती करणे शक्य झाल्याचे मत संचालक मंडळाने व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष मधुसुदन गुजर, उपाध्यक्ष विजय जयस्वाल यांच्यासह संचालक मनोहर मुरकुटे, दिलीप धोटे, प्रकाश अकर्ते, किशोर बोरोडे, डॉ. प्रमोद येऊल, ॲड. पद्माकर सांगोळे,उषा गुजर, बबीता पोटदुखे उपस्थित होते. सभेला बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

# सेवा संकल्प अभियान : जनमनाचे समाधान

**राज्य शासनाचा प्रत्येक विभाग १७ सप्टेंबरपासून 'सेवा संकल्प अभियान' या लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अग्रेसर झाला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. 'सेवा संकल्प अभियान' विषयी ही माहिती.**

**विशेष लेख**

देशाचे प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच निमित्ताने महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या महिनाभराच्या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हे अभियान म्हणजे कार्यक्रमांची फक्त रेलचेल नसून, शासकीय सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ आणि दारापाशी नेण्याचा हा जोरकस प्रयत्न आहे.

'सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. राज्यातले प्रशासन १७ सप्टेंबरपासून 'सेवा संकल्प अभियान' या लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अग्रेसर झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

### लोकाभिमूख प्रशासनाची कास

गावातील सामान्य नागरिकाला प्रमाणपत्र हवे असेल, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असेल किंवा एखाद्या गरीब कुटुंबाला शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा असेल, अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये फे-या माराव्या लागु शकतात. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे. महसुली विभागामार्फत प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

### शिबिरांमुळे कामे गतीमान

'सेवा सेतू' शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा जनतेला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.ज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या सेवा संकल्प अभियानातून होणार आहे.

### गावातच सेवा आणि समाधान

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार 'सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यामध्ये सहभागी करून घेतले जाणार आहे. गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

### शासन, सेवा आणि समाजविकास

शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो. ही वस्तुस्थिती आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत. त्याचे महत्त्व प्रत्येकाच्या आयुष्यात खुप जास्त आहे. वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण जनतेची दैनंदिन गरजांची पूर्तता या अभियानात प्रामुख्याने केली जात आहे.




### अंगणवाडीत मुख्य उत्सव

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याच्या उपक्रमाचा समावेश या अभियानात करण्यात आला आहे. ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता माता, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

### नव्या कल्पनांना व्यासपीठ

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. 'विकसित भारत' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर शिक्षण विभागामार्फत चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच त्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना भविष्यातील भारताच्या उभारणीशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

### लाभार्थ्यांच्या घरी 'आशीर्वादाचा दिवा'

शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात समाविष्ट करण्यात आला आहे. विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या निवडक लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. शासकीय योजनांचा लाभ एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला प्रकाशमान करणारा हा उपक्रम या अभियानात आयोजिला जात आहे.

### सकारात्मक बदलाची गोष्ट

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, एखाद्या विद्यार्थ्याला संधी मिळाली किंवा एखाद्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही. ती इतरांसाठीही प्रेरणा बनते. म्हणूनच 'बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

### सेवा संकल्पाचे खरे उद्दिष्ट

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहे-सामान्य नागरिकाला सेवा मिळविण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे. योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळावा, शासन अधिक लोकाभिमुख व्हावे आणि शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. 'माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये', ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. या अभियानाला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद त्याच्या यशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. शासनाचे सर्व विभाग अत्यंत उत्साहाने आणि पुढाकाराने उपक्रमशील झाले आहेत. गाव - तालुका - जिल्हा या सर्वच पातळ्यांवर सेवा संकल्प अभियान लोकहिताचे आणि जनसामान्यांचे जीवनमान अधिक सुकर करण्यासाठीचे शासनाचे लोकाभिमुख अभियान ठरणार आहे यात शंका नाही.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

---

# 'एआय'च्या वेगाची जगाला धास्ती




भारतीय महाकाव्यात 'समुद्रमंथना'ची कथा आहे. समुद्राचे मंथन केल्यावर त्यातून अमृत बाहेर पडेल असे समजल्यावर देव आणि दानव आपले वैर विसरून एकत्र आले. अमृत तर निघाले, पण त्याआधी 'हलाहल' नावाचे विष बाहेर आले. यामुळे सर्वत्र त्राहिमाम उडाला आणि शेवटी भगवान शिवाला स्वयं नीलकंठ व्हावे लागले. काहीशी अशीच परिस्थिती सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'च्या बाबतीत निर्माण झाली आहे. ओपनएआयपासून ते मेटा आणि ॲमेझॉनपर्यंतच्या बड्या कंपन्या एआयचे मंथन करण्यात व्यस्त होत्या, एकच घाई गडबड उडाली होती. तरीही अनियंत्रित एआय ते बनवणाऱ्यांवर उलटवार करू शकते, असा इशारा सातत्याने दिला जात होता. कंपन्यांनी सुरुवातीला प्रत्येक इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले, पण आता सर्वांचेच भान सुटले आहे. काही आठवड्यांपूर्वीपर्यंत कोणतीही भीती न बाळगता अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करणाऱ्या कंपन्या आता म्हणत आहेत की, एआयच्या वाढत्या वेगाला आवर घालायला हवा. सॅम आल्टमन, इलॉन मस्क आणि डारिओ अमोदेई यांसारख्या दिग्गजांचे मानणे आहे, की एआयवर नियंत्रण असायला हवे आणि त्यावर कडक नजर ठेवली पाहिजे.

या हृदयपरिवर्तनाचे कारण म्हणजे अनियंत्रित एआयचा वाढता धोका. काही दिवसांपूर्वीच ॲन्थ्रोपिकचे संशोधक जेसन कॉक्स यांनी आपल्या राजीनाम्यानंतर 'एक्स'वर हा धोका उघड केला होता. एआयमध्ये आता स्वतः विचार करण्याची क्षमता विकसित होत आहे. एआय आता निर्णय घेण्यासही सक्षम झाले आहे. तसेच त्यात संवेदनशीलता नगण्य असल्याने ते काय उद्रेक घडवू शकते, याची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. नुकतेच ओपनएआयच्या 'ॲस्ट्रा' या मॉडेलच्या लाँचनंतर, 'कृत्रिम सामान्य बुद्धिमत्ता' अर्थात 'एजीआय'चे आगमन झाले असल्याचा दावा एनव्हिडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नवीन जेन्सन हुआंग यांनी केला आहे. त्यांच्या या विधानामुळे एआय क्षेत्रातील हे अंतिम ध्येय खरोखरच साध्य झाले आहे का, यावर नवीन वादविवाद सुरू झाला आहे.

आता 'एजीआय' म्हणजे काय? तर, मानवी बुद्धिमत्तेची बरोबरी करणाऱ्या किंवा मानवापेक्षाही अधिक हुशार असणाऱ्या एआय प्रणालीला 'एजीआय' म्हटले जाते. एकीकडे आणि चीन यांच्यात अमेरिका तंत्रज्ञानाची शर्यत तीव्र होत असताना, चीनमधील प्रमुख एआय कंपन्यांनी एजीआय साध्य करण्याचे आपले उद्दिष्ट जाहीर केले आहे. दुसरीकडे, बीजिंगमधील धोरणकर्ते मात्र या संकल्पनेबाबत अजूनही अजूनही सावध भूमिका घेत असल्याचे दिसून येते.

एआयचा धोकादायक चेहरा जुलै महिन्यात समोर आला, जेव्हा अनेक एआय एजंट्सनी हगिंग फेस नावाच्या प्लॅटफॉर्मवर अचानक हल्ला केला. या एआय एजंट्सनी सुरक्षेचे अनेक प्रोटोकॉल तोडून अशी कामे केली, ज्यावरून एआय उपद्रव माजवू शकते हे सिद्ध झाले. जर असा कोणताही एजंट हल्ला एखाद्या बँकेवर किंवा रुग्णालयावर झाला असता, तर प्रचंड जीवित आणि वित्तहानी झाली असती. जगभरातील जवळजवळ सर्व महत्त्वाची माहिती, लोकांच्या ईमेलपासून ते सरकारी दस्तऐवज आणि प्रचंड प्रमाणात पैसा ऑनलाइन उपलब्ध आहे. जागतिक राजकारणामुळे 'एआय'वरील नियंत्रण कमकुवत झाले आहे. अनेक तज्ज्ञांचे मानणे आहे की, जर वेळेत योग्य पावले उचलली गेली नाहीत, तर एआय एजंट्स संपूर्ण इंटरनेटवर आपला ताबा मिळवू शकतात. मशीनची विचार करण्याची पद्धत माणसांपेक्षा खूप वेगळी आहे. एआयची हीच उपद्रव करण्याची क्षमता पाहून इंडस्ट्रीतील दिग्गजांनी नियंत्रणाची मागणी केली आहे; परंतु त्यांच्या या मागणीशी अनेकजण सहमत नाहीत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे की, एआय ही एका शर्यतीसारखी आहे आणि अमेरिका जर यात थांबली, तर चीन त्यांच्यापुढे निघून जाईल. चीनसुद्धा एआयचा ९१७३ विकासदर कमी करण्याच्या बाजूने नाही. उलट, तो याला पाश्चिमात्य देशांचा असा कट मानत आहे, ज्याचा उद्देश चीनला एआयमध्ये पुढे जाण्यापासून रोखणे हा आहे. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, एआयवर नियंत्रणाची मागणी प्रामुख्याने पाश्चिमात्य देशांतील कंपन्यांकडूनच आली आहे. एआयचा विकास आतापर्यंत खूप कमी नियमावलींच्या अंतर्गत झाला आहे. अशा परिस्थितीत, काही कंपन्या या नियंत्रणाच्या मागणीला बड्या कंपन्यांची चाल मानू शकतात. एआय हे असे क्षेत्र आहे जिथे थांबणे किंवा मागे हटणे म्हणजे थेट प्रतिस्पर्ध्यांना पुढे जाण्याची संधी देणे होय. काही बाबतीत हे 'शीतयुद्धा'सारखे आहे, जेव्हा दोन्ही गटांना अणुवस्त्रांच्या धोक्यांची माहिती होती, पण कोणीही मागे हटायला तयार नव्हते. तेव्हा तंत्रज्ञानावर सरकारांचे थेट नियंत्रण होते, तर एआयच्या बाबतीत जगातील सर्वात शक्तिशाली तंत्रज्ञान काही खासगी कंपन्यांच्या हातात आहे आणि यामुळेच हा विषय अधिक गुंतागुंतीचा बनतो. सहसा कंपन्या सरकारकडून कमी नियंत्रणाची मागणी करतात,पण इथे चित्र उलटे झाले आहे.

एआयच्या धोकादायक असण्याच्या शक्यतेला कोणीही नाकारत नाहीये, पण कंपन्या आणि सरकारांमधील विश्वासाच्या अभावामुळे याच्या नियंत्रणाच्या उपायांवर एकमत होऊ शकत नाहीये. शीतयुद्धाचा अंतही परस्पर विश्वासातूनच झाला होता आणि आज एआयच्या जगालाही याच विश्वासाची गरज आहे. मंथन सुरू झाले आहे आणि हलाहल बाहेर पडू लागले आहे. वेळेत याला रोखले नाही, तर हे विष प्राशन करणारा कदाचित कोणीही उरणार नाही.

**- विवेक कांबळे**

---

## त-ड-का

### बळीच्या मनोवेदना ..!

हे वरुण राजा -
तुझी किती केली विणवणी
आश्रु आटले डोळ्यातले
तरी
दिलीस तू हुलकावणी ...!

पंचमी गेली, पोळा गेला
गौराईच्या स्वागताला
थोडासा बरसला ...!

हे ही नसे थोडके
पण बळीला करून ठेवले
घर के नाघाटके ...!

अतिवृष्टीमुळे -
कुठे जमीनी गेल्या खरडून
अन इकडे पाण्याविणा
उभी पिके चालली वाळून

आम्ही सारी तुझीच लेकरे
मग का बरे करतो पक्षपात ?
समतोल बरसून -
सर्वांना ठेव ना आनंदात ..!



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

---

# स्वत:थांबले, दुसऱ्याला पुढे जाण्याची संधी दिली!

कौन बनेगा करोडपतीच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी घटना घडली की ज्यामुळे अमिताभ बच्चनही शॉक झाले.कधी कधी थांबणे हे सुद्धा एक मनाला विलक्षण समाधान देऊन जाते.'कौन बनेगा करोडपती'च्या सीझन १६ मधील एपिसोड क्रमांक ४९ मधील एका भागात डॉ. नीरज सक्सेना यांनी 'फास्टेस्ट फिंगर फर्स्ट' फेरीत सर्वात जलद उत्तर देत हॉट सीटवर स्थान मिळवले.

विशेष म्हणजे, हॉट सीटवर पोहोचल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर ना उत्साहाचा गोंधळ, ना नाचणे, ना आरडाओरड, ना भावनिक प्रदर्शनष्ठ ते अगदी शांतपणे बसले होते.डॉ. नीरज सक्सेना हे शास्त्रज्ञ, पीएच.डी. धारक आणि एका विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. त्यांना डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली होती. कलाम साहेबांच्या सहवासामुळे त्यांच्या विचारांमध्ये झालेला बदल ते स्वतः मान्य करतात.'सुरुवातीला मी फक्त माझा विचार करायचो; पण कलाम साहेबांकडून इतरांचा आणि राष्ट्राचा विचार करायला शिकलो.'

खेळ सुरू झाला आणि नीरजजींनी अत्यंत शांतपणे, आत्मविश्वासाने प्रश्नांची उत्तरे देत ३,२०,००० जिंकले. त्यांना बोनस रक्कमही मिळाली. त्यांच्या हातात अजूनही अनेक लाईफलाईन्स शिल्लक होत्या आणि पुढे मोठी रक्कम जिंकण्याची संधी होती. कार्यक्रमाला ब्रेक झाला. ब्रेकनंतर अमिताभ बच्चन म्हणाले,'चला डॉ. साहेब, पुढे जाऊया. हा आहे अकरावा प्रश्न' तेवढ्यात नीरजजी शांतपणे म्हणाले-'सर, मला खेळ सोडायचा आहे.क्षणभर अमिताभ बच्चनही थक्क झाले.इतकी चांगली कामगिरी करणारी व्यक्ती, अजून लाईफलाईन्स शिल्लक असताना आणि करोडपती होण्याची मोठी संधी असताना अचानक खेळ का सोडते?अमिताभजींनी विचारले, 'असे तर आधी कधीच घडले नाही '

नीरजजींचे उत्तर मात्र मनाला स्पर्शून जाणारे होते.'सर, इतर लोकही वाट पाहत आहेत. ते माझ्यापेक्षा लहान आहेत. त्यांनाही संधी मिळायला हवी. मी आधीच भरपूर पैसे जिंकलो आहे. माझ्याकडे जे आहे, ते माझ्यासाठी पुरेसे आहे. मला यापेक्षा जास्त काही नको.'किती साधे उत्तर पण किती मोठा विचार!जिथे प्रत्येकजण 'आणखी थोडें अजून थोडे ' या हव्यासाच्या शर्यतीत धावत आहे, तिथे एखाद्या व्यक्तीने स्वतःहून म्हणावे 'माझ्यासाठी एवढे पुरेसे आहे; आता दुसऱ्याची पाळी.'यापेक्षा मोठे समाधान कोणते?

नीरजजींनी खेळ सोडल्यानंतर पुढची स्पर्धक हॉट सीटवर आली. तिने आपली कहाणी सांगितली. ती म्हणाली की, 'आम्ही मुली आहोत, या एका कारणामुळे माझ्या वडिलांनी आम्हा तिन्ही बहिणींना आणि आईला घरातून काढून दिले. आता आम्ही अनाथाश्रमात राहतो'हे ऐकल्यावर मनात एक विचार आला.नीरजजींनी जर खेळ सोडला नसता, तर कदाचित त्या मुलीला त्या दिवशी हॉट सीटवर बसण्याची संधीच मिळाली नसती.एका व्यक्तीने स्वतःसाठी मिळू शकणारी संधी सोडली आणि दुसऱ्याच्या आयुष्यात संधी निर्माण झाली.



हीच खरी श्रीमंती आहे!आज आपण पैशाच्या, मालमत्तेच्या आणि अधिकाधिक मिळवण्याच्या शर्यतीत इतके पुढे आलो आहोत की, 'आपल्याकडे किती आहे?' यापेक्षा 'दुसऱ्याकडे आपल्यापेक्षा जास्त का?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे. वारसाहक्काच्या एका पैशासाठी नाती तुटतात. मालमत्तेसाठी भाऊ-बहिणी एकमेकांचे शत्रू होतात. स्वार्थापायी प्रेम, आपुलकी आणि माणुसकी मागे पडते.पण आयुष्याचा खरा अर्थ कदाचित याच्या अगदी उलट आहे.सगळे मिळवणे म्हणजे यश नाही;कधी कुठे थांबायचे हे समजणे म्हणजे समाधान.आपल्या गरजा पूर्ण झाल्यानंतरही दुसऱ्याच्या वाट्याची संधी आपण घेत राहिलो, तर आपल्याकडे संपत्ती कितीही असो-मन मात्र गरीबच राहील.आणि जेव्हा आपण म्हणतो-'माझ्यासाठी एवढे पुरेसे आहे.आता दुसऱ्याला पुढे जाऊ दे,'तेव्हा आपण केवळ एखादी संधी सोडत नसतो;आपण कुणाच्या तरी आयुष्यात आशेची एक खिडकी उघडत असतो.

कदाचित म्हणूनच देव मंदिरातच नाही, तर अशा माणसांच्या विचारांत आणि कृतीतही दिसतो.डॉ. नीरज सक्सेना यांच्यासारखी माणसे आपल्याला एक अत्यंत साधा, पण विसरलेला धडा शिकवतात. जेव्हा तुमच्या गरजा पूर्ण होतील, तेव्हा थांबायला शिका कारण तुमचे थांबणे कदाचित दुसऱ्याच्या पुढे जाण्याची सुरुवात असेल. स्वार्थ कमी करा समाधान वाढवा आणि शक्य असेल तिथे स्वतःसाठी मिळालेली संधी दुसऱ्यालाही द्या.कारण आयुष्याच्या शेवटी आपण किती मिळवले, यापेक्षा आपल्यामुळे किती जणांना मिळवण्याची संधी मिळालीहेच कदाचित अधिक महत्त्वाचे ठरेल.

---

**दिवाळी विशेषांक -२०२६**

दरवर्षी प्रमाणे यंदाही 'जनमाध्यम' च्या वतीने 'दिवाळी विशेषांक-२०२६' प्रकाशित करणार आहोत.या अंकाच्या माध्यमातून नवलेखकांसह साहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे वर्तमान विषयांवरील राजकीय, सामाजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद व प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपवावा असा राहणार नसून प्रत्येक वाचकाने संग्राह्य ठेवावा असाच राहणार आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश या अंकात करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फे विनंती. आपले साहित्य atimadhyam@gmail.com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सॲप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम' कडे राखीव राहील. इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.२० ऑक्टोंबर २०२६ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.ठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम' कडे राखीव राहील. इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.२० ऑक्टोंबर २०२६ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.

# सार्वजनिक गणेशोत्सव समाज संघटन आणि राष्ट्रजागृतीचे महाप्रतीक- आ.सुलभा खोडके

**अमरावती/प्रतिनिधीः-** हिंदू धर्म आणि संस्कृतीत भगवान श्रीगणेश हे प्रथम पूजनीय, विघ्नहर्ता, बुद्धी आणि समृद्धीची देवता मानले जातात. कोणतेही शुभ कार्य पूजा किंवा नवीन आरंभापूर्वी श्री गणेशाची पूजा केली जाते. यामुळे कामात येणारे सर्व अडथळे दूर होतात. बाप्पा आपल्या भक्तांचे सर्व संकट आणि विघ्ने दूर करतात, म्हणूनच त्यांना ' विघ्नहर्ता ', किंवा विघ्ननाशक म्हणतात. गणेशजी हे बुद्धी विवेक आणि विद्या देणारे दैवत आहेत. विद्यार्थी आपल्या अभ्यासाची सुरुवात त्यांच्या आशीर्वादाने करतात. अध्यात्मिकदृष्ट्या गणपती हा आपल्या सर्व इंद्रियांचा अधिपती मानला जातो. कार्य सुरु करण्यापूर्वी मनाची एकाग्रता साधणे म्हणजे गणपती बाप्पाची पूजा करणे होय. महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणण्याचे आणि स्वातंत्र्य लढ्यात जनजागृती करण्याचे मोठे कार्य केले. हा उत्सव समाज प्रबोधन, एकता, संस्कृती जोपासणी आणि सलोख्याचे प्रतीक आहे. असे प्रतिपादन आमदार सुलभा संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

गुरुवार दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी त्या छत्रसाल नगर - महेंद्र कॉलनी - न्यू हनुमान नगर येथे गणेशोत्सव - २०२६ निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.' टाळ मृदूंगाची वारी, ढोल ताशांची मंगल स्वारी ' या थाटात गणरायाचे संपूर्ण देशभरात नुकतेच आगमन झाले आहे. अशातच आमदार सुलभा खोडके व यश खोडके यांनी छत्रसाल नगर - एकता गणेशोत्सव मंडळ, महेंद्र कॉलनी - एकदंत गणेशोत्सव मंडळ, शोभा नगर - गजराज गणेशोत्सव मंडळ, सरस्वती नगर येथील शिव नवयुवक गणेशोत्सव मंडळ व सरस्वती बाल गणेशोत्सव मंडळ तसेच जय गुरुदेव बाल गणेशोत्सव मंडळ या मंडळ स्थळी भेट दिली. यासोबतच त्यांनी आपल्या पूर्व निर्धारित कार्यक्रम अंतर्गत न्यू हनुमान नगर स्थित निळकंठ गणेशोत्सव मंडळ तसेच जय भोले गणेशोत्सव मंडळ स्थळी सुद्धा भेट दिली. यादरम्यान आमदार सुलभा खोडके व यश खोडके यांनी सर्वांच्याच लाडक्या गणपती बाप्पाच्या प्रतिमेस नमन - पूजन - वंदन करून माल्यार्पण केले.यादरम्यान त्यांनी दुर्वांची जुडी तसेच लाल जास्वंद पुष्प व गणरायाला सदैव प्रिय असे मोदक अर्पण केले.याप्रसंगी आमदार खोडके व यश खोडके यांच्या हस्ते महादेव पुत्राची आरती करण्यात आली. हा देव सकळ विघ्न यांचा हर्ता व मंगलमूर्ती असा मानला जात असल्यामुळे या देवाचे पूजन सर्वांच्या घरी होते. श्री गणपती बाप्पाची भक्ती माणसाला मानसिक शांतता, बुद्धी आणि संकटांवर मात करण्याची शक्ती देते. मनातील चंचलपणा कमी करून स्थिरता आणि एकाग्रता मिळवण्यासाठी श्री गणेशाची उपासना केली जाते. आपल्या सगळ्यांचे लाडके गणपती बाप्पा आपल्या बुद्धीला विवेकाची साथ देण्यासाठी मनाला श्रद्धेचा आधार देण्यासाठी आणि विघ्न्यांचे रूपांतर सुखात करण्यासाठी घरोघरी अवतरले आहेत. या शब्दांत यश खोडके यांनी भालचंद्राची महती विशद केली. गणरायाची आराधना उपासना करतांना सुलभा खोडके व यश खोडके यांनी सर्व भाविकभक्तांच्या बुद्धीला विवेकवादी बनवण्याचे साकडे घालत सर्वांच्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी प्रार्थना केली. याप्रसंगी सर्वच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आमदार सुलभा खोडके व यश खोडके यांचे स्वागत करीत यथोचित सत्कार सुद्धा करण्यात आला. यावेळी छत्रसाल नगर, महेंद्र कॉलनी, शोभानगर,सरस्वती नगर न्यू हनुमान नगर, लक्ष्मी नगर येथील भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आ.प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा वाढदिवस साजरा

## -भाजपा खासदार, आमदारांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आ. प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात वाढदिवस केक कापून व विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाजप नेते तथा खासदार डॉ. अनिल बोंडे, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रवीण तायडे, आमदार उमेश यावलकर, आमदार केवलराम काळे, माजी प्रदेश सचिव जयंत डेहणकर, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांच्यासह प्रभूदास भिलावेकर, तुषार भारतीय, नितीन गुडधे पाटील, चेतन पवार, राजेश पड्डा साहू, प्रदीप गौरखेडे, बलदेव बजाज तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रवींद्र चव्हाण यांनी पक्ष संघटनेतील विविध जबाबदाऱ्या सांभाळताना संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागाला महत्त्व दिले आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणूनही ते संघटनेच्या विविध स्तरांवरील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत असून, पक्ष संघटना अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी संघटनात्मक समन्वय आणि कार्यकर्त्यांच्या सहभागावर नेहमी भर देत असून त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात भाजपा मजबूत झाल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.



वाढदिवसानिमित्त झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी रवींद्र चव्हाण यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमामुळे जनसंपर्क कार्यालयात उत्साहाचे वातावरण होते.

# लोकसंवाद उपक्रम; निळकंठ गणेशोत्सव मंडळात नागरिकांनी मांडले स्वानुभव

## -जलयुक्त शिवार आणि गाळयुक्त शिवार योजनेचा शेतकऱ्यांना दिलासा; लाभार्थ्यांची प्रतिक्रिया

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने अंबागेटमधील निळकंठ व्यायाम मंडळ गणेशोत्सवात आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात शेतकरी जयंत सगणे यांनी 'जलयुक्त शिवार' योजनेच्या माध्यमातून जमिनीत वाढलेला जलस्तर तसेच 'गाळयुक्त शिवार' योजनेद्वारे जलसाठ्यांची पाणी साठवण क्षमता वाढून शेतातील माती सुपीकतेत झालेला सुधार याबद्दल आपला अनुभव कथन केला.



गौरव केवले यांनी छतावरील पावसाचे पाणी शोच खड्ड्यात मुरविण्याचा केलेला अभिनव प्रयोग कथन केला.महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाने 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम शहरातील प्रदीर्घकालाची गौरवशाली परंपरा असणाऱ्या निळकंठ व्यायाम गणेशोत्सव मंडळात आयोजित केला.

जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी रितेश भुयार यांनी गणरायांच्या दर्शनासाठी आलेल्या नागरिकांना 'लोकसंवाद' कार्यक्रमाविषयी माहिती दिली. त्यानंतर मृद व जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी भूषण जावकर यांनी विभागाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती दिली. यानंतर उपस्थित नागरिकांनी या योजनांच्या माहितीबद्दल आणि विभागाच्या कार्याबद्दल देण्यात आलेल्या माहितीसाठी समाधान व्यक्त केले. कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागाचे प्रतिनिधी आशिष येवले यांनी विभागाच्या वतीने बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्याबद्दल माहिती दिली. दोन्ही विभागांची माहिती ऐकून घेत नागरिकांनी आपले उत्स्फूर्त मतही मांडली. विविध योजनांच्या माध्यमातून शासन जनतेपर्यंत पोहोचते. जनतेला त्याचा फायदाही होत आहे.यावेळी लोकसंवाद कार्यक्रमात योजनांची माहिती देण्याबरोबरच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला आणि लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांसोबतच निळकंठ व्यायाम मंडळ गणेशोत्सवाचे अध्यक्ष अनंत साऊकर,सचिव ऐश्वर्य खेडकर, मार्गदर्शक दीपक उंडीकर, अभिनंदन पेंढारी, निळकंठ व्यायाम मंडळाचे अध्यक्ष दीपक गुल्हाने, पंकज लुंगीकर यांनीही यावेळी विचार मांडताना गणेशोत्सवात 'लोकसंवाद' उपक्रमातमत व्यक्त करून सक्रिय सहभाग घेतला.

# रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालयात संस्कृत विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अमरावती येथे कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचा २९ वा वर्धापन दिन उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या गौरवशाली वाटचालीचे स्मरण करून भारतीय संस्कृती, संस्कृत भाषा आणि भारतीय ज्ञानपरंपरेचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या ध्वजाला सलामी देण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन केले. या वेळी संपूर्ण परिसरात विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचा उत्साह आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्णा माकोडे सर यांच्या प्रमुख उपस्थितीसह प्रा डॉ. अनिल नागदेवते, प्रा. पूनम पाटील, प्रा. अमृता पांडव, प्रा. कीर्ती डहाणे, प्रा. रुपेश गोंडाणे, संजय वानखडे, लेखापाल रोहित खोबरागडे, अरबाज मोनावले, सागर सिरसाट तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय बी.एड. प्रथम व तृतीय वर्षाचे प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.



यावेळी प्राचार्य डॉ. कृष्णा माकोडे यांनी विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. भारतीय संस्कृती आणि ज्ञानपरंपरेमध्ये संस्कृत भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण असून, विद्यार्थ्यांनी आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जपणूक करावी, असे त्यांनी सांगितले. शिक्षणाच्या माध्यमातून संस्कार, मूल्ये आणि भारतीय परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी शिक्षकांची असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान प्रशिक्षणार्थींनी शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदवून विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचा आनंद साजरा केला. विद्यापीठाशी असलेले महाविद्यालयाचे शैक्षणिक नाते आणि विद्यापीठाच्या कार्याविषयीची बांधिलकी यावेळी अधोरेखित झाली.

कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचा २९ वा वर्धापन दिन हा भारतीय संस्कृती, संस्कृत भाषा, ज्ञानपरंपरा आणि शिक्षणाच्या मूल्यांची आठवण करून देणारा ठरला.

# जुगाराच्या अड्डयावर पोलिसांचा छापा

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** हिरुळपूर्णा येथील पांदण रस्त्यावर सुरू असलेल्या 'एक्का बादशहा' जुगाराच्या अड्डयावर चांदूर बाजार पोलिसांनी धाड टाकून जुगाराचा डाव उधळून लावला. बुधवारी १६ सप्टेंबर रोजी झालेल्या या कारवाईत पाच जण पोलिसांच्या ताब्यात सापडले, तर पोलिसांची चाहूल लागताच सात जण पसार झाले. घटनास्थळावरून ११ दुचाकी, पाच मोबाईल आणि रोख रकमेसह तब्बल ८ लाख ६५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हिरुळपूर्णा बसस्थानकाच्या परिसरात पांदण रस्त्यावर ताशांच्या पत्त्यांवर पैशांची हार-जीत लावून जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीची खात्री करून पोलिस पथकाने तेथे अचानक धाड टाकली. यावेळी जुगार खेळणाऱ्यांमध्ये एकच धावपळ उडाली. पोलिसांनी गजानन देविदास पवार (४२, दहीगाव पूर्णा), मनोज अमृतराव वानखडे (३५, सर्फाबाद), रोहित नंदकिशोर भुस्कडे (२६, हिरुळपूर्णा), अनुराग विनोदराव कदम (२९, कुरळपूर्णा) आणि अक्षय बाबुराव वैद्य (३६, दहीगाव पूर्णा) यांना ताब्यात घेतले. तर अन्य सात जण कारवाईपूर्वीच पसार झाले. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या कारवाईत रोख रक्कम, पाच मोबाईल आणि ११ मोटारसायकली असा एकूण ८ लाख ६५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी चांदूर बाजार पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि सहायक पोलीस अधीक्षक इशानी आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक प्रमोदकुमार केदार, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप धोंडे तसेच रविंद्र बावणे, आशीष राउत, जितेश सावरकर, संकेत चोरे, सुहास पोटे आणि वैभव अकोटकर यांच्या पथकाचा कारवाईत सहभाग होता.

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९**
**९४२२१२०४०६**

# महिलांमुळे सक्षम कुटुंब आणि आदर्श समाजाची निर्मिती- निलेश जामठे



**प्रतिनिधी/प्रतिनिधीः-** महिलांनी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर विविध क्षेत्रांत प्रगती करून स्वावलंबी व्हावे. स्वावलंबी महिलांमुळे सक्षम कुटुंब आणि आदर्श समाजाची निर्मिती होते, असे प्रतिपादन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी केले.

परतवाडा येथील गजानन सावळे यांच्या निवासस्थानी राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे अलिषा शुभम खंडारे यांची बुलढाणा येथे शिक्षिका म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी अलिषा खंडारे यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष मनोहर कोथळकर, तालुकाध्यक्ष राम लहाळके, तालुका प्रसिद्धीप्रमुख डॉ. गजानन रेवस्कर, तालुका उपाध्यक्ष जय घोरे, परतवाडा शहरप्रमुख उमेश गायकवाड, उपशहरप्रमुख भारत वानखडे, दीपक मांगे, शुभम खंडारे, गजानन सावळे, दामोदर खंडारे, निलिमा सावळे आदी उपस्थित होते.

# सेवा संकल्प अभियानात मानवी साखळीतून साकारला संकल्पाचा दिवा

## समाज कल्याण विभागाचे महिनाभर विविध उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षपूर्तीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाची सुरुवात अमरावती विभागातील समाज कल्याण विभागाच्या कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मानवी साखळीच्या माध्यमातून 'संकल्पाचा दिवा' साकारून केली.

अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यांत समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून महिनाभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत थेट पोहोचविण्यावर या अभियानात भर देण्यात येणार आहे.

'सेवा सेतू अभियान' अंतर्गत प्रत्येक तालुक्यात शिबिरांचे आयोजन करून नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व त्यांचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे. तसेच मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांसाठी शाळा व महाविद्यालयांकडून माहिती संकलित करून पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यासाठी विशेष मोहीम राबविली जाणार आहे.

'सेवा माझे योगदान' या उपक्रमांतर्गत अनाथालय व वृद्धाश्रमांना भेटी, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी, योग-ध्यान, प्लास्टिकमुक्तीबाबत जनजागृती, महिलांच्या आरोग्याबाबत उपक्रम, वंचित मुलांना शैक्षणिक सहकार्य तसेच करिअर कौन्सिलिंग आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

'संकल्पाचा दिवा' या उपक्रमांतर्गत शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांच्या स्तरावर संकल्पाची रांगोळी काढून मानवी साखळीच्या माध्यमातून दिव्याची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. यासोबतच व्यसनमुक्तीबाबत व्याख्याने तसेच उत्कृष्ट विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात येणार आहे. शाळांमध्ये 'विकसित भारत-२०४७' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शनही भरविण्यात येणार आहे.

शासकीय योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या हस्ते 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून शासनाच्या योजनांचा लाभ मिळालेल्या नागरिकांशी थेट संवाद साधला जाणार आहे.

# भाजी विक्रेत्यावर काठी आणि धारदार वस्तूने हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** आठवडी बाजार आटोपून दुकानातील साहित्य आवरत असताना दुकानासमोर पडलेल्या दगडांवरून सुरू झालेला वाद चांगलाच पेटला. 'हे दगड कोण उचलणार?' या कारणावरून झालेल्या वादात एका भाजी विक्रेत्यावर काठी आणि धारदार वस्तूने हल्ला करण्यात आला. या मारहाणीत त्याच्या हाताला दुखापत होऊन रक्तस्राव झाला. पूर्णानगर परिसरात १८ सप्टेंबर रोजी रात्री ही घटना घडली. श्याम अरुणरावजी ढोले (रा. पूर्णानगर) हे भाजी विक्रीचा व्यवसाय करतात. पूर्णानगर येथे १८ सप्टेंबरला आठवडी बाजार असल्याने त्यांनी दुकान लावले होते. रात्री बाजार आटोपल्यानंतर ते दुकानातील साहित्य आवरत असताना रूपेष साहेबरावजी बोबडे (वय ३२, रा. पूर्णानगर) हा चारचाकी वाहन उभे करण्यासाठी तेथे आला. दुकानाजवळ काही दगड पडलेले दिसल्यानंतर बोबडे याने ढोले यांच्याकडे त्याबाबत विचारणा केली. तक्रारीनुसार, यावेळी 'मी तुझ्या बापाचा नोकर आहे काय? हे दगड कोण उचलणार?' वाद वाढताच बोबडे याने काठी आणि धारदार वस्तूने ढोले यांना मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या हल्ल्यात ढोले यांच्या हाताला दुखापत झाली असून रक्तस्राव झाल्याचे नमूद आहे. त्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. जखमी ढोले यांच्या जबानी जबाबासह वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्राच्या आधारे आसेगाव पूर्णा पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे

## वि. बि. एन. गोडबोले, दिवाणी न्यायाधीश (क स्तर), दिग्रस जि. यवतमाळ यांचे न्यायालयात.

### जाहीरनामा

दिवाणी कि. अर्ज क ७१/२०२६ नेमलेली तारीखः- १५/१०/२०२६

**अर्जदारः- ममता कालिदास पांडे व इतर**
**विरूध्द- गैरअर्जदारः- कोणीही नाही**

ज्याअर्थी **मयत - कालिदास राजेश्वर पांडे यांचा दिनांक ३०/०५/२०२६** रोजी मुक्ताई हॉस्पीटल राजगुरुनगर, ता. खेड जि. पुणे येथे मृत्यु झालेला आहे. **अर्जदार नामे- १. ममता कालिदास पांडे, २. श्री. हरिश कालिदास पांडे अर्जदार क. १ व २ रा. तुपटाकळी, ता. दिग्रस, जि. यवतमाळ, ३. सौ. वैशाली अजय सोनटक्के रा. श्री. साई राघन इनक्लेव शेगांव रहाटगांव रोड मित्रांगण रेसीडेन्सी पार्क शिवाजी नगर अमरावती ता. जि. अमरावती, ४. विशाखा नरेंद्र काजळे रा. जी.४०५, जलवायु विहार सेक्टर २० खारघर, पनवेल जि. रायगड,** यांनी सदुर्ह **मयत - कालिदास राजेश्वर पांडे,** यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणेसाठी **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम १ अन्वये** या न्यायालयाकडे अर्ज केला आहे.

त्याअर्थी याद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, सदर्हु अर्जदार ही सदर्हु **मयत-कालिदास राजेश्वर पांडे,** चे वारस नव्हे असे ज्या कोणास समजावयाचे असेल त्यांनी अथवा उपरोक्त अर्जदार व गैरअर्जदारा व्यतिरीक्त सदर्हु मयत **कालिदास राजेश्वर पांडे,** चे ईतर कोणी वारस असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून एक महिण्याचे आत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता व्यक्तीगत अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर होऊन आपला आक्षेप लेखी स्वरूपात नोंदवावा. अन्यथा कोणालाही काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून सदरचा अर्ज नियमाप्रमाणे निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक १६ माहे सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायलयाच्या शिक्यानिशी दिला.

शिक्का

आदेशानुसार
**सहायक आधिक्षक दिवाणी न्यायालय**
**क स्तर, दिग्रस**
**दि-१६/०९/२०२६**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक १८४७/२०२६ पुढील तारीख :- १९.१०.२०२६

**Vinayak Narayan Deshpande +1 Versus NIL**

### जाहिरनामा / सायटेशन

**Applicants- 1) Vinayak Narayan Deshpande, Aged about 70 yrs. Occ-Labour 2) Ritesh Vinayak Deshpande, Aged about 29 years, Occ-Service Both Appl No. 1 & 2 R/o C/o Pralhad Dandage, Kolhatkar Colony, Amravati. Tq & Dist. Amravati**

**==Versus==**

**Non-Applicant NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Pratiksha Vinayak Deshpande @ Sanjivani Purshotam Joshi** हया दि. ११.१०.२०२५ रोजी नागपूर येथे मयत झाल्या. **Vinayak Narayan Deshpande +1 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Vinayak Narayan Deshpande +1 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखवरून असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०८.०९.२०२६ रोजी सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॅाट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त




### महागाईचा भडका; शेतमालाला कवडीमोल भाव

**अंजनगाव बारी-** महागाईचा वाढता आलेख आणि शेतीमालाला मिळणारा कमी भाव यामुळे शेतकरी दुहेरी आर्थिक संकटात सापडला आहे. पेट्रोल-डिझेल, खते, बियाणे, कीटकनाशके, सिंचन, मशागत व मजुरीचे दर वाढल्याने उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे.मात्र, केळी, कांदा, टोमॅटो, कापूस, सोयाबीन, तूर ऊस, हळद, आले, भुईमूग व भाजीपाल्याला अनेकदा अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडत आहे. महागाई वाढत असताना शेतमालाच्या दरात स्थिरता नसल्याने शेती व्यवसाय अडचणीत आला असून, हमीभाव व बाजारभावातील तफावत दूर करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

### बांधकामाच्या घरातील वायर चोरीचा छडा; तिघे जेरबंद

**अमरावती-** बांधकाम सुरू असलेल्या घराला लक्ष्य करून इलेक्ट्रिक फिटिंगचे वायर चोरून नेणाऱ्या तिघांचा खोलापुरी गेट पोलिसांनी छडा लावला. तपासादरम्यान तिघांना निष्पन्न करून पोलिसांनी त्यांना जेरबंद केले. आरोपींकडून चोरीचे वायर, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि तीन मोबाईल असा एकूण १ लाख १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. केवले प्लॉट येथील रहिवासी विक्की रमेशराव पारवे यांच्या गोविंद शांती विहार, भातकुली रोड परिसरातील नवीन घराचे बांधकाम सुरू आहे. १७ सप्टेंबरच्या सायंकाळपासून १८ सप्टेंबरच्या पहाटेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात व्यक्तींनी घरातील इलेक्ट्रिक फिटिंगचे वायर कापून चोरून नेले. चोरीला गेलेल्या वायरची किंमत सुमारे २० हजार रुपये होती. याप्रकरणी पारवे यांच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढण्यात आला. त्यातून तोहीद अहेमद शेख हबीब (१९), अबरार शाह करीम शाह (२२) आणि शेख मलीक शेख अन्सार (२२) यांना निष्पन्न करण्यात आले. पोलिसांनी आरोपींकडून लाल, पिवळे, काळे व हिलवे रंगाचे इलेक्ट्रिक फिटिंग वायरचे तुकडे जप्त केले. यासोबत Hero Honda Hunk (एमएच ३१-डीआर-४३३९) ही दुचाकीही ताब्यात घेण्यात आली. तसेच तीन मोबाईल जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त शाम घुगे आणि सहायक पोलिस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक सीमा दाताळकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.



### गृहभेटीद्वारे 'वाचन समृद्धी' व पर्यावरण जागृती

**अमरावती-** गणपती उत्सवाचे औचित्य साधून श्री मन्नालाल गुप्ता विद्यालयाच्या वतीने 'वाचन समृद्धी' आणि 'पर्यावरण जागृती' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांसह त्यांच्या घरी प्रत्यक्ष भेटी देऊन पालकांमध्ये पर्यावरण संवर्धन आणि वाचन संस्कृतीविषयी जनजागृती केली.गणेशोत्सवादरम्यान निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावणे, पर्यावरणपूरक गणेश विसर्जन करणे तसेच सण-उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना संत गाडगेबाबा, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्य व विचारांची माहिती देणारी पुस्तके वितरित करण्यात आली. या उपक्रमामुळे शिक्षक-पालक संबंध अधिक दृढ होण्यास मदत झाली असून समाजातून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक नितीन कडू, शिक्षक तुषार ठाकरे, प्रकाश ठाकरे, महेंद्र मडावी, शिला कणके, साबिया पठाण, मुदस्सर शेख, सलील झोपाटे, भाग्यश्री अवघड, शरयू काळे, वैशाली गिरी, अश्विनी देशमुख, प्रशांत मकेश्वर तसेच शिक्षकेतर कर्मचारी विश्वजीत देशमुख आणि गजानन चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

## अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत घनकचरा कंत्राटावरून 'रणधुमाळी'
# लोकप्रतिनिधीच 'कुंपण' खाण्याच्या तयारीत?

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

नगरपरिषदेचा घनकचरा व्यवस्थापनाचा कंत्राट कालावधी समाप्त झाला असून, नवीन कंत्राट देण्यासाठी सध्या निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. या घनकचरा कंत्राटामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक कमाई असल्याने, हे कंत्राट पदरात पाडून घेण्यासाठी अनेक बड्या कंत्राटदारांनी कंबर कसली आहे. मात्र, यात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ज्या लोकप्रतिनिधींवर मतदारांनी विश्वास टाकून त्यांना नगरपरिषदेत पाठवले, तेच आता या मलाईदार कंत्राटावर डल्ला मारण्यासाठी पडद्यामागून हालचाली करत असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील काही धनदांडग्या नगरसेवकांनी हे कंत्राट मिळवण्यासाठी विशेष रणनीती आखली आहे. शासकीय नियमांनुसार, कोणत्याही विद्यमान नगरसेवकाला नगरपरिषदेचे कोणतेही थेट कंत्राट किंवा कंत्राटी काम घेता येत नाही. हा नियम डावलण्यासाठी आता या नगरसेवकांनी आपल्या 'भन्नाट' बुद्धीचा वापर सुरू केला आहे. स्वतःचे नाव समोर न आणता, नातेवाईक, मित्र किंवा मर्जीतील दुसऱ्या डमी कंत्राटदारांच्या नावावर हे घनकचरा व्यवस्थापनाचे कंत्राट लाटण्याचा प्रयत्न सुरू असल्याची जोरदार कुजबुज सध्या नगरपरिषद वर्तुळात आणि कार्यालयात ऐकायला मिळत आहे.घनकचरा व्यवस्थापन हे शहराच्या आरोग्याशी आणि स्वच्छतेशी थेट निगडित असलेला अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे आता ही निविदा प्रक्रिया पूर्णपणे नियमांनुसार पार पडणार की नगरसेवकांच्या दबावापुढे प्रशासन झुकणार, याकडे संपूर्ण अंजनगाव सुर्जी शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. हे कंत्राट खरोखरच एखाद्या सक्षम आणि स्वतंत्र कंत्राटदाराला मिळते की छुप्या पद्धतीने नगरसेवकांच्याच खिशात जाते, हे आगामी काळात स्पष्ट होईल.




### जनतेच्या विश्वासाला तडा; 'कुंपणच शेत खात असल्या'ची चर्चा

ज्या नगरसेवकांना जनतेने शहराचा विकास करण्यासाठी आणि पालिकेच्या कारभारावर पारदर्शकपणे लक्ष ठेवण्यासाठी निवडून दिले, तेच लोकप्रतिनिधी आता स्वतःच्या आर्थिक स्वार्थासाठी पालिकेच्या कंत्राटावर डोळा ठेवून आहेत. यामुळे 'कुंपणच शेत खात आहे' अशी तिखट प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे. जनतेच्या विश्वासाला तडा देणारा हा प्रकार असून, यामुळे पालिका प्रशासनाच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नगरपरिषदेचा घनकचरा कंत्राटची निविदा प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने राबविण्यात आली असून हा कंत्राट कोणत्याही लोकप्रतिनिधी नावावर देण्यात येणार नाही. जर लोकप्रतिनिधीने हा कंत्राट घेतल्यास त्या लोकप्रतिनिधीवर तात्काळ कारवाई करण्यात येईल.

**विजय लोहकरे,**
मुख्याधिकारी नगरपरिषद
अंजनगाव सुर्जी

## जागतिक तापमान वाढीमुळे कृषीवर होणारा परिणाम-प्रा.डोंगलवार



**नांदगाव खंडेश्वर-** प्रा. राजा देशमुख कला महाविद्यालय नांदगाव खंडेश्वर येथे भूगोल विभागाअंतर्गत जागतिक तापमान वाढीचा कृषीवर होणारा परिणाम या विषयावर व्याख्यान घेण्यात आले.

जागतिक तापमान वाढीमुळे कृषी उत्पादनावर होणारा परिणाम आजच्या काळातील मोठी समस्या निर्माण झाली आहे. याचा परिणाम अन्नधान्य,पाण्याची टंचाई,बर्फाचे वितळणे, प्राणी, इत्यादी अनेक घटकावर परिणाम होताना दिसतो.असे प्रतिपादन प्रा. डोंगरवार एस एस जयस्वाल कॉलेज अर्जुनी मोरगाव यांनी केले. प्रा. योगेश्वर बुवा यांनी जागतिक तापमान वाढीची कारणे त्यावरील उपाय योजना यावर मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. यामुळे वातावरणातील प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. निलेश गोरे, भूगोल विभाग प्रमुख डॉ. राजेश मेश्राम तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## नटराज गणेशोत्सव मंडळात आरोग्य तपासनी शिबीर



**अमरावती -** विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व (आयुषमान भारत) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना श्रीगणेशा आरोग्याचा अंतर्गत नटराज गणेशोत्सव मंडळ, रवि नगर, अमरावती येथे आरोग्य तपासनी शिबिराचे आयोजन डॉ. अमोल नराट व डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदशनाखाली करण्यात आले.मोफत आरोग्य तपासनी शिबिरामध्ये कर्करोग, हृदयरोग, मेंदुरोग संबंधित आजार, लघवी संबंधित आजार, किडणीरोग संबांधित आजार, किडणी प्रत्यारोपन, बालरोग संबंधित आजार, प्लास्टीक सर्जरी संबंधित आजार कान, नाक घसा (कॉकरियल) संबंधित रुग्ण तपासनी करुण एकुण ५७ रुग्णांपैकी २३ रुग्ण विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे पुढील उपचाराकरीता संदर्भित करण्यात आले. मोफत आरोग्य शिबिरमध्ये तपासनी करीता विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील तज्ञ वैद्यकीय चमुमध्ये डॉ. मयुरेश्वर पुरी,भुपेंद्र जेवडे, अभिजीत करवाडे, सुरज देशमुख, लोचनसिंग गौबंसे तसेच नटराज गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष पंकज बेलुरकर,अमोल कवटकर, निकेश उंबलकर,शाम सानखोडे, ऋषिकेश बिजवे तसेच मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## टीईटी नियमांची केंद्राकडून व्यापक समीक्षा
# सेवेत असलेल्या शिक्षकांच्या पात्रतेवरही विचार

**अमरावती/का.प्र.**

शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी परीक्षेसंदर्भातील नियम आणि सेवेत असलेल्या शिक्षकांच्या पात्रतेबाबत केंद्र सरकारने व्यापक समीक्षा करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. शिक्षक, शिक्षक संघटना, शैक्षणिक संस्था तसेच अन्य हितधारकांकडून प्राप्त झालेल्या विविध निवेदने व मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर ही समीक्षा करण्यात येणार असल्याचे शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने स्पष्ट केले आहे. टीईटी आवश्यक करण्यासंदर्भात शिक्षक आणि विविध संघटनांकडून सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विशेषतः मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत येणाऱ्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षेची आवश्यकता, सेवेत असलेल्या शिक्षकांवरील त्याचा परिणाम आणि शिक्षक पात्रतेची विद्यमान चौकट याबाबत केंद्र सरकारकडे निवेदने प्राप्त झाली आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने टीईटीच्या आवश्यकतेसंदर्भात दिलेल्या निर्देश व केलेल्या निरीक्षणांचाही शिक्षण मंत्रालयाने विचार केला आहे. शिक्षक पात्रतेसाठी अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि व्यवहार्य व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने सध्याच्या व्यवस्थेची व्यापक समीक्षा करण्याचा प्रस्ताव केंद्राने मांडला आहे. टीईटी नियमांमध्ये कोणतेही व्यापक बदल करण्यापूर्वी राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेश, एनसीटीई, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक संघटना आणि अन्य संबंधित घटकांशी सल्लामसलत करणार आहे. त्यामुळे आगामी काळात शिक्षक पात्रता परीक्षेच्या स्वरूपापासून ते सेवेत असलेल्या शिक्षकांच्या प्रश्नांपर्यंत विविध बाबींवर चर्चा होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने विचार विनिमयासाठी सहा महत्त्वाचे मुद्दे निश्चित केले आहेत. त्यामध्ये सध्या लागू असलेल्या टीईटीच्या पात्रता निकषांसह शिक्षक पात्रतेची संपूर्ण चौकट योग्य आहे का, याची तपासणी करण्यात येणार आहे. जे शिक्षक आधीपासूनच सेवेत आहेत आणि ज्यांना पात्रता प्राप्त करणे आवश्यक आहे, त्यांच्या संदर्भातील विविध प्रश्न आणि अडचणींचा आढावा घेतला जाणार आहे.



शिक्षकांना पात्रता मिळविण्यासाठी परीक्षा नियमितपणे आणि योग्य अंतराने आयोजित करता येतील का,याबाबतही उपाययोजनांचा विचार करण्यात येणार आहे. पात्रता मिळविताना सध्या सेवेत असलेल्या शिक्षकांना कोणत्या व्यावहारिक अडचणींचा सामना करावा लागतो, याचे परीक्षण केले जाणार आहे. राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद, शिक्षणतज्ज्ञ आणि अन्य हितधारकांशी चर्चा करण्यात येणार आहे. व्यापक जनहित लक्षात घेऊन संबंधित कायदेशीर तरतुदींमध्ये काही सुधारणा किंवा बदल आवश्यक आहेत का, याचाही अभ्यास केला जाणार आहे.

## लोकनृत्य स्पर्धेत श्रीराम हायस्कूलच्या विद्यार्थी तालुकास्तरावर प्रथम तर जिल्हास्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

आसरा येथे राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प २०२६-२७ अंतर्गत तालुकास्तरीय लोकसंख्या शिक्षणावर आधारित भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत श्रीराम हायस्कूल,टाकरखेडा संभूच्या विद्यार्थिनींनी लोकनृत्याचे उत्कृष्ट सादरीकरण करीत प्रथम क्रमांक पटकावला.

त्यानंतर जिल्हास्तरीय लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती येथे करण्यात आले. या स्पर्धेतही श्रीराम हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी प्रभावी सादरीकरण करीत तृतीय क्रमांक मिळविला. लोकनृत्याच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी लोकसंख्या शिक्षणाचा संदेश प्रभावीपणे मांडला. या स्पर्धेत संजना सोळंके, खुशी यावले, कार्तिकी शेंडे, कार्तिका वानखडे, श्रावणी वानखडे आणि अक्षरा शेंडे यांनी सहभाग घेतला. विद्यार्थिनींना रिता धनैया व अतुल घुरडे यांचे मार्गदर्शन लाभले.



या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा नीलंबरी देशमुख, उपाध्यक्ष विशाल देशमुख, सचिव स्वाती देशमुख, सभासद इंदु देशमुख व प्रदीप देशमुख, प्राचार्य उमेश सोलव, शिक्षक सविता बेलसरे, शैलेश डहाके, सुनील प्रांजळे, नरेंद्र सांगोले,संतोष देशमुख,सुरज देशमुख, संगीता लोहेकर व प्रशांत मालवे, शिक्षकेत्तर कर्मचारी दीपक हंबर्डे व सुनंदा देशमुख यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले. तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक आणि जिल्हास्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवित विद्यार्थिनींनी श्रीराम हायस्कूलच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

## नशेविरोधी लढ्याला शॉर्ट फिल्मची जोड
# जितेश शर्मा यांच्या उपस्थितीत 'नॉट नॉर्मल'चा ट्रेलर लॉन्च

**अमरावती/का.प्र.**

अमली पदार्थांचे सेवन आणि तस्करीविरोधात अमरावती ग्रामीण पोलिसांकडून राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन कवच' अभियानाला आता शॉर्ट फिल्मच्या माध्यमातून जनजागृतीची जोड मिळाली आहे. सोशल मीडिया कलाकारांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या 'नॉट नॉर्मल' या शॉर्ट फिल्मचा ट्रेलर शनिवारी जोग स्टेडियम येथे मान्यवरांच्या उपस्थितीत लॉन्च करण्यात आला.

कार्यक्रमाला भारतीय क्रिकेटपटू जितेश शर्मा, पोलिस अधीक्षक निकेतन कदम, माजी पालकमंत्री सुनील देशमुख आणि विभागीय आयुक्त नयना गुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शॉर्ट फिल्ममधील कलाकारांसह ग्रामीण पोलिस दलातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. अमली पदार्थांच्या सेवनामुळे व्यक्तीच्या आयुष्याबरोबरच त्याच्या कुटुंबावर आणि सामाजिक जीवनावर होणारे परिणाम युवकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न 'नॉट नॉर्मल'च्या माध्यमातून करण्यात आला आहे. नशेच्या आहारी जाण्यापूर्वीच युवकांमध्ये जागृती निर्माण करणे आणि त्यांना सकारात्मक दिशेने वळविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी यावेळी अमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याबाबत जनजागृतीची गरज व्यक्त केली. पोलिसांची भूमिका केवळ गुन्हा घडल्यानंतर कारवाई करण्यापुरती मर्यादित नसून, गुन्हे व व्यसनाला प्रतिबंध करण्यासाठी समाजात जागृती निर्माण करणेही महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. युवकांनी नशेपासून दूर राहून शिक्षण, क्रीडा आणि सकारात्मक उपक्रमांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित युवक, नागरिक, पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना अमली पदार्थांपासून दूर राहण्याची आणि नशेविरोधी जनजागृतीत सहभागी होण्याची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी केले, तर आभार पोलिस उपअधीक्षक दत्ता तोटेवाड यांनी मानले. ग्रामीण पोलिस दलातील अधिकारी, कर्मचारी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाकूचा धाकावर रोख रक्कम-मोबाईल लुटला

**अमरावती-** पहाटेच्या अंधारात कामावर निघालेल्या रेल्वे कर्मचाऱ्याला तिघांनी रस्त्यात अडवून चाकूचा धाक दाखवत लुटल्याची घटना बडनेरा शहरात घडली. बडनेरा महापालिका कार्यालयाच्या गेटजवळ घडलेल्या या प्रकारात आरोपींनी कर्मचाऱ्याजवळील रोख रक्कम आणि मोबाईल असा २४ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल हिसकावून नेल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी बडनेरा पोलिसांनी तीन अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यांचा शोध सुरू आहे. उमेश पांडुरंग बनसोड (४०, रा. मिलचाळ, नवी वस्ती, बडनेरा) हे रेल्वेच्या मध्यवर्ती यांत्रिक विभागात कार्यरत आहेत. १७ सप्टेंबर रोजी पहाटे ते नेहमीप्रमाणे कामावर जाण्यासाठी घराबाहेर पडले. मात्र, त्यांच्या दुचाकीला पंचर झाल्याने ते दुचाकी पायी घेऊन जात होते. याचदरम्यान महापालिका कार्यालयाच्या गेटजवळ तिघा तरुणांनी त्यांचा रस्ता अडविला. आरोपींनी चाकूचा धाक दाखवून बनसोड यांच्याकडील ४ हजार ४५० रुपये रोख तसेच २० हजार रुपये किमतीचा Motorola Edge मोबाईल जबरीने हिसकावून नेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.तक्रारीनुसार, तिन्ही आरोपी अंदाजे २० ते ३० वर्षे वयोगटातील आहेत. ते दुचाकीवरून आले होते. वाहन चालविणाऱ्या तरुणाने कथिया रंगाचा शर्ट, मधल्या तरुणाने काळा शर्ट, तर मागे बसलेल्या तरुणाने काळ्या रंगाचा टी-शर्ट घातला होता. या वर्णनाच्या आधारे पोलिसांकडून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

## ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा ३० सप्टेंबरपर्यंत सुरळीत सेवा करण्याची मागणी

**अंजनगाव बारी/का.प्र.**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सातारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत मांजरी म्हसला येथील आरोग्य उपकेंद्रात आवश्यक मनुष्यबळाअभावी आरोग्यसेवा प्रभावित झाली आहे. मागील तीन महिन्यांपासून उपकेंद्रातील आरोग्य यंत्रणा ठप्प असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. मांजरी म्हसला येथे मुख्यालय असलेले वैद्यकीय अधिकारी व परिचारिका सातारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत करण्यात आल्याने उपकेंद्रातील नियमित आरोग्यसेवेवर परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना प्राथमिक उपचार व आरोग्यसेवेसाठी इतर ठिकाणी धाव घ्यावी लागत आहे. दरम्यान, सातारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातही वैद्यकीय अधिकाऱ्यासह चार परिचारिकांची पदे रिक्त आहेत. परिणामी उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असून, ग्रामीण आरोग्यसेवेवर त्याचा परिणाम होत असल्याचे चित्र आहे.मांजरी म्हसला उपकेंद्रात आवश्यक वैद्यकीय अधिकारी व परिचारिका उपलब्ध करून देण्यासह सातारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी होत आहे.३० सप्टेंबरपर्यंत दोन्ही ठिकाणी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून आरोग्यसेवा सुरळीत न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# शेतक-यांच्या अडचणी संवेदनशीलतेने सोडवा -कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

## अमरावती विभागातील पीक परिस्थितीचा आढावा

**अकोला/प्रतिनिधीः-** एलनिनो संकटामुळे पावसात खंड पडला आहे. त्यामुळे शेतकरी बांधव संकटात सापडला आहे. शासन शेतक-यांच्या खंबीरपणे पाठीशी असून, भरीव मदत करण्यात येईल. सर्व सरकारी यंत्रणांनी शेतकऱ्यांच्या अडचणी संवेदनशीलतेने सोडवाव्यात,





बैठकीत ते बोलत होते. कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, विभागीय आयुक्त नयना गुंडे, कृषी आयुक्त परिमल सिंह, विभागातील खासदार, आमदार, पाचही जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर ☞(पान २ वर)

### ‘फेक’ बातमीविरोधात कारवाई करणार

कुणीतरी खोडसाळपणे दुष्काळग्रस्त तालुक्यांची फेक यादी करून समाजमाध्यमांद्वारे प्रसारित केली. अशी कुठलीही यादी शासनाने अद्याप जाहीर केली नाही. कुणीही शेतकऱ्यांच्या भावनांशी कुणी खेळू नये. याबाबत कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल, असे कृषी मंत्र्यांनी सांगितले. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. प्रत्येक नुकसानग्रस्ताला न्याय मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

# बंड सन्स पेट्रोल पंपावर मध्यरात्री तोडफोड

## मशीनच्या काचेच्या स्क्रीनसह साहित्याचे नुकसान; सीसीटीव्हीत संशयित कैद

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातूर्णा जवळील पेट्रोल पंपावर १९ सप्टेंबरच्या मध्यरात्री सुमारे १.४५ वाजता तोडफोड झाल्याचे समोर आले आहे. पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तोंडाला कापड बांधलेली व्यक्ती मशीनची तोडफोड करताना दिसत असल्याचा दावा व्यवस्थापनाने केला आहे. या घटनेप्रकरणी पेट्रोल पंप व्यवस्थापनाने राजापेठ पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

२० सप्टेंबरच्या सकाळी पेट्रोल पंपाचा चौकीदार ड्युटीवर पोहोचला असता मशीन क्रमांक एक व दोनच्या काचेच्या स्क्रीनसह अन्य साहित्याचे नुकसान झाल्याचे त्याच्या निदर्शनास आले. त्याने तत्काळ याची माहिती व्यवस्थापक पांडे यांना दिली. त्यानंतर व्यवस्थापकांनी घटनास्थळी पोहोचून सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये रात्री सुमारे १.४५ वाजता तोंडाला कापड बांधलेली व्यक्ती पेट्रोल पंपावरील मशीनची तोडफोड करताना दिसल्याचे व्यवस्थापनाने पोलिसांना सांगितले. दरम्यान, १८ सप्टेंबरच्या रात्री एका ग्राहकाने पल्सर मोटारसायकलमध्ये पेट्रोल भरले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संबंधित ग्राहकाने पेट्रोलमध्ये पाणी असल्याची तक्रार केली होती. तक्रार करताना त्याच्या हातात लोखंडी पाइप असल्याचे व्यवस्थापकांच्या निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले. व्यवस्थापनाने संबंधित मशीनमधून पेट्रोलचा नमुना बाटलीत काढून दाखविला. तसेच ग्राहकाने २४० रुपयांचे पेट्रोल भरल्याने काही समस्या असल्यास तेवढ्याच किमतीचे पेट्रोल पुन्हा देण्याची तयारी दर्शविण्यात आली. ☞(पान २ वर)

# बिबट्याचा वावर आता अमरावती-वर्धा बायपासकडे

## शिवणी खदान परिसरात पायांचे ठसे; भीतीचे वातावरण

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे तालुक्यातील शिरजगाव–तुळजापूर परिसरात काही दिवसांपूर्वी आढळून आलेल्या बिबट्याचा वावर आता अमरावती–वर्धा बायपासलगतच्या शिवणी खदान परिसराकडे झाल्याची माहिती समोर आली आहे. शनिवारी सकाळी शेतात मजुरीसाठी गेलेल्या शेतमजुरांना बिबट्याचे पायांचे ठसे आढळून आले, तर एका प्रत्यक्षदर्शी शेतकऱ्याने बिबट्या नाल्याच्या भागातून खाली उतरताना दिसल्याचे सांगितले. त्यामुळे शहरालगतच्या या परिसरातील शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



काही दिवसांपूर्वी तुळजापूर रोडवरून जाणाऱ्या वाहनचालकांना बिबट्याचे दर्शन झाले होते. त्यानंतर वनविभागाने परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले होते. तसेच बिबट्याला जेरबंद करण्यासाठी त्या भागात पिंजराही लावण्यात आला होता. दरम्यान, शनिवारी सकाळी अमरावती–वर्धा बायपासलगतच्या शिवणी खदान परिसरातील शेतात गेलेल्या मजुरांना बिबट्याच्या हालचालींचे पुरावे आढळून आले. याबाबत शेतकऱ्यांनी वनविभागाला माहिती दिली. वनविभागानेही या घटनेची माहिती मिळाल्याचे ☞(पान २ वर)

चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी शीतल घुटे यांनी सांगितले की, बिबट्या हा प्राणी एकाच ठिकाणी दीर्घकाळ थांबत नाही. शिरजगाव–तुळजापूर परिसरात आढळून आलेला बिबट्याच आता शिवणी खदान परिसरात दिसून आल्याची माहिती शेतकऱ्यांकडून मिळाली आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचा वावर असून, त्यांचा भक्ष्य म्हणून शोध घेत बिबट्या या भागात फिरत असण्याचा अंदाज आहे.

# नापिकी-कर्जाच्या कोंडीत शेतकऱ्याचा मृत्यू

## आईच्या उपचारांचा खर्चही सुरू, अमझरे कुटुंबावर संकट

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** शेतीतील सततची नापिकी, कर्जाचा भार आणि आईच्या उपचारांचा खर्च अशा आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर चिंचोली शेतशिवारात ४० वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली. सुरेश देवराव अमझरे (रा. चिंचोली) असे मृताचे नाव आहे. त्यांच्या मृत्यूमुळे चिंचोली आणि जानकापूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अमझरे कुटुंबाची उपजीविका संयुक्त कुटुंबाच्या दोन एकर शेतीवर अवलंबून होती. मात्र, मागील काही काळापासून शेतीत अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने आर्थिक परिस्थिती बिकट झाली होती. त्यातच कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी सुरेश यांनी कल्पतरू महिला बचत गटाकडून २५ हजार रुपयांचे कर्ज घेतल्याची माहिती आहे.



कुटुंबातील त्यांच्या आईला पक्षाघाताचा आजार असल्याने उपचारासाठीही नियमित खर्च होत होता. एकीकडे शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नसताना कर्जाची परतफेड आणि आईच्या उपचारांचा खर्च अशी दुहेरी आर्थिक कसरत सुरू होती. या परिस्थितीमुळे सुरेश तणावात असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.

शनिवार, १९ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास ते शेतशिवारात गेले होते. तेथेच त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पुलगाव येथील रुग्णालयात ☞(पान २ वर)

# बेपत्ता युवकाचा मृतदेह विहिरीत आढळला

**मोर्शी/ प्रतिनिधीः-** चार दिवसापासून घरातून बेपत्ता असलेल्या एका ३० वर्षीय युवकाचा मृतदेह जीभ बाहेर पडलेल्या अवस्थेत विहिरीत आढळून आला. सदर युवकाचा मृत्यू पाण्यात बुडून झाल्याचे शवविच्छेदन दरम्यान निष्पन्न झाले. ही घटना आज दि.२० सप्टेंबर रोजी उघडकीस आली आहे.मृतक युवकाचे नाव अमोल केशवराव माथनकर (वय ३० वर्ष रा.अंबाडा) असे आहे.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मोर्शी तालुक्यातील अंबाडा गावात अमोल केशवराव माथनकर व त्याची आई हे दोघेच आपल्या स्वतःच्या घरात राहतात.अमोल हा नेहमी आपल्या घरात व बाहेर सुन्न अवस्थेत राहत होता. दि.१७ सप्टेंबर रोजी अमोल हा घरून निघून गेला होता.तेव्हापासून तो घरी परत न आल्यामुळे त्याच्या नातेवाईकांनी व गावातील काही मंडळींनी त्याचा शोध घेणे सुरू केले असता आज दि.२० सप्टेंबर रोजी अमोलचा मृतदेह अंबाडा गावालगतच असलेल्या एका विहिरीत जीभ बाहेर पडलेल्या अवस्थेत आढळून आला. याबाबतची माहिती मोर्शी पोलिसांना दूरध्वनीवरून प्राप्त होताच मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची एक पोलीस अधिनस्त चमू यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतक युवकाचे प्रेत विहिरीबाहेर काढले. मृतदेह हा संपूर्ण कुजलेल्या अवस्थेत असल्यामुळे उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी थेट अंबाडा येथे जाऊन मृतकाच्या पार्थिवावर घटनास्थळीच शवविच्छेदन केले. याप्रकरणी मोर्शी ☞(पान २ वर)



# मेळघाटातील शिवसेना संघटन विस्ताराला वेग

## धारणीत बच्चू कडूंच्या मार्गदर्शनाखाली मन्ना दारशिंबे यांच्या अध्यक्षतेत बैठक

### -२८ सप्टेंबरच्या अभियानाच्या आरंभासाठी गावागावात तयारी

**धारणी/ प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील शिवसेना संघटन विस्तार अभियानाच्या आरंभाची तयारी वेगाने सुरू झाली असून, मेळघाटातही संघटन विस्ताराच्या नियोजनाला गती आली आहे. सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या अभियानाच्या आरंभाच्या पार्श्वभूमीवर मेळघाटातील प्रत्येक तालुका, विभाग आणि गावपातळीवर बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला जात आहे.





याच पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे जिल्हा संघटक मन्ना दारशिंबे यांच्या अध्यक्षतेखाली धारणी येथे मेळघाटातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. २८ सप्टेंबरच्या संघटन विस्तार अभियानात मेळघाटातून मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी व्हावेत, तसेच आगामी काळात शिवसेना संघटन गावागावात अधिक मजबूत करण्यासाठी ठोस नियोजन करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली.गावागावात संघटनात्मक संपर्क वाढविणे, प्रत्येक जिल्हा परिषद सर्कलमध्ये कार्यकर्ता मेळावे घेणे आणि नागरिकांच्या प्रश्नांशी थेट जोडले जाण्यासाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे नियोजन करण्यात आले. संघटन विस्तारासोबतच मेळघाटातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करण्याची भूमिकाही बैठकीत मांडण्यात आली. मेळघाटातील शेतकऱ्यांसाठी वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव हा गंभीर प्रश्न बनला असून, पिकांचे मोठ्या प्रमाणात ☞(पान २ वर)

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज शहरात

## ’जनसंवाद’ कार्यक्रमात स्वीकारणार नागरिकांची निवेदने



**अमरावती/ प्रतिनिधीः-** महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे सोमवार, २१ सप्टेंबर रोजी अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेण्यासाठी ’जनसंवाद’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा जनसंवाद कार्यक्रम दुपारी २ ते ३ वा. दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या वेळेत पालकमंत्री नागरिकांना भेटीसाठी उपलब्ध राहतील.या कार्यक्रमादरम्यान नागरिकांकडून त्यांच्या समस्या, मागण्या आणि तक्रारींबाबतची लेखी निवेदने थेट स्वीकारली ☞(पान २ वर)

# भरधाव चारचाकी वाहन पलटी एक ठार, एक जखमी

**वर्धा/ प्रतिनिधीः-** हिंगणघाट तालुक्यातील दारोडा पेट्रोल पंपासमोर भरधाव चारचाकी वाहन पलटी झाले. या भीषण अपघातात वडनेर येथील एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. तर दुसरा युवक गंभीर जखमी झाला. ही घटना शनिवारी (दि.१९) दुपारी घडली.




सुमित कुमरे (वय ३७ रा. वडनेर) असे मृताचे नाव आहे. तर सागर शेंडे (वय २५ रा. वडनेर) हा जखमी झाला आहे. दोघेही चारचाकी क्रमांक एमएच ४० एसी ९१०३ ने हिंगणघाटहून वडनेरकडे जात होते. दारोडा पेट्रोल पंपासमोर भरधाव वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ते महामार्ग क्रमांक ४४ वर चार वेळा पलटी झाले.

अपघाताची तीव्रता एवढी होती की वाहनाच्या समोरील भागाचा अक्षरशः ☞(पान २ वर)

# फोटो- व्हिडिओच्या धमकीने तरुणीला केले ब्लॅकमेल

## अत्याचार व १.३२ लाख उकळल्याचा आरोप

### -वसतिगृहात विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**अमरावती/ प्रतिनिधीः-** फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तरुणीला सातत्याने ब्लॅकमेल केल्याचा गंभीर प्रकार शहरात समोर आला आहे. या धमकीच्या दबावातून तरुणीकडून १ लाख ३२ हजार रुपये घेतल्याचा आरोप असून, मानसिक त्रासाला कंटाळून तिने वसतिगृहात विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. प्रकृती बिघडल्याने तिला डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सिटी कोतवाली पोलिसांनी २६ वर्षीय संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, पीडित तरुणी बी.एस्सी. द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. संशयिताने तिचा स्वाधार योजनेचा अर्ज भरून दिल्याने दोघांची ओळख झाली. पुढे मोबाईलवरून संवाद वाढला आणि त्यातून मैत्री निर्माण झाली. ८ जानेवारीच्या रात्री संशयिताने तरुणीला राधानगर परिसरात बोलावून घेतले. तेथून दुचाकीवरून तिला इर्विन चौक परिसरातील एका हॉटेलमध्ये नेल्याचे तक्रारीत नमूद आहे. तेथे तिच्या ☞(पान २ वर)

# कार डिव्हायडरवर चढली; चालक पसार

### -कुथे हॉस्पिटलसमोरील घटना

**अमरावती/ प्रतिनिधीः-** राजापेठ परिसरातील कुथे हॉस्पिटलसमोर भरधाव कार थेट रस्त्याच्या डिव्हायडरवर चढल्याची घटना रविवारी (दि.२०) रात्री घडली. अपघातानंतर कार घटनास्थळीच सोडून चालक पसार झाल्याने काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, कुथे हॉस्पिटलसमोरील रस्त्यावरून कार जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. कार थेट डिव्हायडरवर जाऊन आदळली आणि डिव्हायडरवर चढली. या घटनेत कारचे नुकसान झाले असून, अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली.



दरम्यान, घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थितीची पाहणी करून अपघातग्रस्त कार ताब्यात घेतली. मात्र, कार डिव्हायडरवर चढवल्यानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाल्याचे समोर आले.

चालकाचा शोध ☞(पान २ वर)

# रोडवर पडलेल्या खचक्यामुळे दुचाकीचा भीषण अपघात

## एकाचा जागी मृत्यू तर दोन महिला गंभीर जखमी

**चांदुर रेल्वे/ प्रतिनिधीः-** तालुक्यातील टेंभुर्णी गावाजवळ रोडवर पडलेल्या खचक्यात दुचाकी वाहन गेल्याने गाडीवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे झालेल्या अपघातात दुचाकी वाहन चालक प्रज्वल डहाके याचा जागीच मृत्यू झाला तर दोन महिला गंभीर जखमी झाल्या असून त्यांना जिल्हा रुग्णालयात उपचाराकरीता रेफर करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार प्रज्वल विजय डहाके (वय २३ वर्ष रा गवळा तालुका बाबुळगाव जिल्हा यवतमाळ) हे रविवार



(दि.२०) दुपारी वेळ अंदाजे १ वाजून २५ मिनिटाने दुचाकी वाहन क्रमांक एमएच २९ बीएक्स ९०२० ने आपल्या आई कल्पना विजय ☞(पान २ वर)

# रॉयल्टीविना रेती वाहतूक; पाच लाखांचा टिप्पर ताब्यात

### -फुबगाव फाट्यावर पोलिसांचा सापळा

**चांदूर बाजार/ प्रतिनिधीः-** पूर्णा नदीपात्रातून रॉयल्टी न भरता रेती घेऊन निघालेला टिप्पर पोलिसांच्या जाळ्यात अडकला. पोलिसांनी आसेगाव रोडवरील फुबगाव फाट्यावर कारवाई करीत टिप्पर थांबवला. तपासणीदरम्यान वाहनात अंदाजे एक ब्रास रेती आढळली. या कारवाईत टिप्पर आणि रेती असा एकूण ५ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कुरळपूर्णा परिसरातील पूर्णा नदीपात्रातून गौण खनिजाची बेकायदा वाहतूक होत असल्याची माहिती चांदूर बाजार पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी आसेगाव रोडवरील फुबगाव फाटा परिसरात लक्ष केंद्रित केले. काही वेळात एमएच २७ बीएक्स ७५२५ क्रमांकाचा पिवळ्या रंगाचा टिप्पर तेथे येताना दिसला. पोलिसांनी वाहन अडवून तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळून आली. चालक अशफाक अहमद अब्दुल निसार (रा. थुगाव) याच्याकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक रॉयल्टीची कागदपत्रे मागण्यात आली. मात्र, त्याच्याकडे ☞(पान २ वर)